२३ इतिहास

…ाइतील धामधूम

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ५२८
३-११-१९०९

( [illegible]रिस दिलेला ग्रंथ. )

# पेशवाईंतील [illegible] देखावा

अथवा

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन

## यांचे पराक्रम.

आर्यभूषण प्रेस, पुणें.

सन १८९१.

# विक्रीस तयार.

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत विकत मिळतील.

**सार्थवाग्भट**—अष्टांगहृदय (संस्कृत मूळ व मराठी भाषांतर यांसह) डा॰ गणेश कृष्ण गर्दे यांनीं केलेलें भाग दोन. पृष्ठें १६००. बांधणी मजबूत. जाड पुठ्ठा कपड्याचा. नांव सोनेरी अक्षरांनीं कोरलेलें. टाईप स्वच्छ व सुवाच्य. कागद जाडा. पहिल्यानें मूळ श्लोक (वाक्यार्थ पुरा होईपर्यंत) त्याचेखालीं सुबोध मराठी अर्थ, ठिकठिकाणीं स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा अखेरीस परिशिष्टाखालीं अवशिष्ट टिपा व स्पष्टीकरणें, (रोगांचीं नांवें वगैरे) दुर्बोध शब्दांचा अर्थ समजण्याकरितां एकंदर पारिभाषिक शब्दांचा एक वर्णानुक्रम कोश, वैद्य नसणारांनाही ग्रंथाचा क्रियेमध्यें उपयोग व्हावा ह्मणून सर्व ग्रंथाचें एक वर्णानुक्रम सूचिपत्र,—इत्यादींच्या योगें ग्रंथ अत्यंत मूल्यवान् व उपयुक्त झाला आहे. शिवाय यंत्रादिकांचीं चित्रेंही जोडलीं आहेत. प्रस्तावना (८५ पानें) फारच महत्वाची आहे. तींत आर्यवैद्यकाचा अगदीं पुरातन कालापासून तों आजपर्यंतचा इतिहास, ग्रंथकर्त्याचा इतिहास. प्रस्तुत ग्रंथाचें पृथक्करण (ह्मणजे त्याचा अंगप्रत्यंगविचार) व आपल्या वैद्यकांतील मूलतत्वें याविषयीं साधारण व सरळ पद्धतीनें विवेचन केलें आहे. ही प्रस्तावना वाचून एका विद्वान् डाक्टरांनीं आह्मांस असें लिहिलें कीं तिची किंमतच ग्रंथाच्या हल्लींच्या किंमतीइतकी आहे.

आजपर्यंत संस्कृत वैद्यकाच्या कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत; पण त्यांत अनेक दोष असून कांहीं ग्रंथ अर्वाचीन व एकदेशीय आहेत व कांहींत नव्याजुन्यांचें मिश्रण आहे. वाग्भटानें आपल्या अष्टांगहृदय ग्रंथांत चरक आणि सुश्रुत यांतील उपयुक्त भाग लेवढा घेतला असल्यानें व वैद्यकाच्या अंगप्रत्यंगांची संगतवार व पद्धतवार जुळणी केली असल्यानें हाच एक ग्रंथ वाचल्यानें सर्व विषयांची माहिती पूर्णपणें व चांगल्या प्रकारें होऊन अनेक ग्रंथ वाचण्याचें फल अल्पायासानें मिळतें. सारांश "सर्वांगसुंदर" हें नांव अरुणदत्तानें आपल्या अष्टांगहृदयावरील टीकेस जें दिलें आहे तें या सार्थवाग्भट ग्रंथासच विशेष शोभतें.

मत रुपये १२ ह० रु० १ रु०

३-१९०

**निबंधमाला**—आग आर. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर [illegible] सतत सात वर्षें जिच्यावर अत्यंत परिश्रम घेतले त्या निबंधमालेंतील सर्व निबंध एकत्र छापले आहेत. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांच्या लेखांवर टीकात्मक पत्रें जीं निबंधमालेंत प्रसिद्ध झालीं तींही यांत सामील केलीं आहेत. सुरस, सालंकार, सुबोध मराठी भाषा, पोक्त, उदात्त व उन्नत विचार, चमत्कृतिजनक व तर्कशास्त्रानुयायी कोटिक्रम, नम्रपरिहास तसाच कडक शब्दप्रहार, दंभस्फोट, सत्यनिरीक्षण, नानाग्रंथावलोकनाच्या योगें परिप्लुत विविध माहिती,—इत्यादिकांच्या गुणांच्या योगें शास्त्रीबोवांची ही प्रियकन्या अज्ञानध्वंसास, ज्ञानवृद्धीस व महाराष्ट्र भाषेच्या परिपोषास किती कारणीभूत झाली हें येथें सांगण्याची जरूर नाहीं. हा ग्रंथ प्रत्येक देशहितेच्छूनें व स्वभाषेच्या उत्कर्षाविषयीं उत्कट इच्छा बाळगणारानें अवश्य संग्रहीं ठेविला पाहिजे. पुस्तकाच्या आरंभीं शास्त्रीबोवांची तसबीर घातली आहे. किं० ३ रु० ट० हं० ८ आणे.

## सरदार परशुराम भाऊ पटवर्धन यांचे पराक्रम. अथवा पेशवाईतील धामधुमीचा देखावा.

रचणार— धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे, हा ग्रंथ दक्षिणाप्राइज कमिटीनें पसंत करून त्याबद्दल बक्षिस दिलें आहे.

पटवर्धन हे ब्राह्मण सरदार असून प्रसिद्ध वृद्ध पुरुष निझामअल्ली ह्यानें ज्याप्रमाणें पेशवाईची अव्वल अखेर झाडून सारी पाहिली. त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चार पांच पेशवे होऊन गेले. तितक्या अवधींत पेशव्यांच्या दरबारांत राजकारस्थानाची जी विलक्षण दंगल उडाली होती व नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतींचा जो बाहादरीचा सामना चालला होता, त्याविषयींचे चित्तवेधक वर्णन या ग्रंथांत विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा, इंग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य स्थलीं दिली आहे.

मिळमिळीत व बखरीभाषेला नाकें मुरडून इतिहास वाचनाचा जे कंटाळा करीत असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण म्हणजे मूळचे नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असे-

ल, अशा लोकांस पुढील चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी उमेद आहे; कारण ऐतिहासिक कादंबरीच्या धर्ती-वर रचलेल्या ह्या पुढील ग्रंथाच्या जोरदार व हृदयद्रावक भाषे-खेरीज प्रत्येक ऐतिहासिक स्थलाची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

सारांश रा॰ मोडक, काव्येतिहासकार, व मांट डफ यांनीं सांठवून ठेविलेल्या सामुग्रीची ही पुढील वीररसप्रचुर पाकनिष्पत्ति आबालवृद्धांस रुचकर, खमंग व चटकदार अशीच लागेल, अशी आशा आहे. किंमत ८१२; ट॰ ८२.

**विलायतचा प्रवास**—भाग पहिला. हल्लींच्या काळीं महाराष्ट्र भाषेंत जो ग्रंथसंग्रह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. अगोदर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे. त्यांतूनही मार्मिकपणानें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प—हजारांत एखादा सांपडल्यास भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या व वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृहस्थास विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फल हें पुस्तक होय. यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवांचें मार्मिक वर्णन असून, एडन, तांबडा समुद्र, कैरो, ईजिप्तमधील मनोरे, आलेक्झांड्रिया, आथेन्स, स्मर्ना, कान्स्टान्टिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर व मनोरमवर्णन असून प्रसंगोपात्त ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्शन उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे. किंमत १२ आणे टपालहांशील २ आणे.

**चार्लस ब्राडला, एम्. पी.**—यांचें चरित्र 'विलायतचा प्रवास' या पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांनीं लिहिलें. पूर्णस्वातंत्र्यभक्त. दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, धीरोदात्त पुरुषांत अग्रणी, या दुर्दैवी आर्यभूचा परम उपकारी मित्र अशा या अलौकिक पुरुषाचें बोधपर चरित्र वाचल्यापासून मनावर सुसंस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. किं॰ ४ आणे टपालहांशील ६ पै.

कैलासवासी

[illegible]राम नि[illegible]

यांचे [illegible]

(बुक्सप्राइझकमिटीनें बक्षिस दिलेला ग्रंथ.)

# पेशवाईंतील धामधुमीचा देखावा

अथवा

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम.

—◯✻◯—

धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे

यानीं रचिला,

तो

पुणें "आर्यभूषण" छापखान्याचे म्यानेजर

यानीं छापून प्रसिद्ध केला.

---

प्रसिद्धकर्त्यानें सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.

---

सन १८९१.

पुणें
" आर्यभूषण " छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

२६-५-११०३

लष्करी शिक्षण देण्याचें सरकारानें कांहीं हिंदूंना नाकारावें व तें लोकांनीं जांभया देत ऐकावें ही शोचनीय स्थिति नव्हे काय? आमच्या लोकांच्या, स्वामिभक्ति, शौर्य इत्यादि गुणांकडे सरकार डोळेझांक करील तर ती गोष्ट स्वतंत्र आहे, पण यामुळें आम्हीं आपला प्राचीन इतिहास न विसरतां आमच्यांत जे थोर पुरुष होऊन गेले त्यांच्या महत्कृत्यांचा यशोदुंदुभी जितक्या तऱ्हेनें व जितका वेळ आमच्याकडून दणाणून दणदणेल तितक्या प्रकारानें तो दुमदुमिला पाहिजे; व केवळ प्राचीन थोर पुरुषांकडे बोट दाखवून फुशारकी मिरविण्याचें बायकी ब्रीद न संपादितां प्रत्येक कालांत तत्कालीन पाणिनी, पतंजली, भीष्म, द्रोण, गोखले निपजविण्याचा प्रयत्न जारीनें सुरू ठेविला पाहिजे. आणि याच कारणामुळें रामकृष्णादिकांच्या शौर्यादि गुणवर्णनांत वसिष्ठ, वाल्मिकी, व्यास ह्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें असतांही कालिदासा सारख्यांनीं सुद्धां त्याच वीरवरांचा पोवाडा पुन्हां पुन्हां गाइला; व अगदीं अर्वाचीन मयुरानेंही तत्संबंधानें टाहो फोडिला!

पटवर्धन हे ब्राह्मणसरदार असून प्रसिद्ध वृद्ध पुरुष निझामअली ह्यानें ज्याप्रमाणें पेशवाईची अव्वल अखेर झाडून सारी पाहिली, त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ पटवर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चार, पांच पेशवे होऊन गेले. तितक्या अवधींत पेशव्यांच्या दरबारांत राजकारस्थानाची जी विलक्षण दंगल उडाली होती त्या दंगलीच्या देखाव्याचें हुबेहुब वर्णन पुढील ग्रंथांत देण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें, या ग्रंथास 'पेशवाईंतील धामधुमींचा देखावा' किंवा 'सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम' हें नांव दिलें आहे.

त्या भयंकर प्रसंगीं भाऊंच्या समशेरीप्रमाणेंच नानाफडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतींचा जो बहारीचा सामना चालला होता, त्या विषयींचें चित्तवेधक वर्णनही या ग्रंथांत विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकरावमामा, इंग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य स्थलीं दिली आहे.

मिळमिळीत व बखरीभाषेला नाकें मुरडून इतिहास वाचनाचा जे कंटाळा करीत असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण ह्मणजे मूळचे

नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असेल, अशा लोकांस पुढील चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी उमेद आहे. कारण ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर रचलेल्या ह्या पुढील ग्रंथाच्या जोरदार व हृदयद्रावक भाषेखेरीज प्रत्येक ऐतिहासिक स्थलाची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

सारांश रा० मोडक, काव्येतिहासकार, व ग्रांटडफ यांनीं साठवून ठेविलेल्या सामुग्रीची ही पुढील वीररसप्रचुर पाकनिष्पत्ति आबालवृद्धांस रुचकर, खमंग व चटकदार अशीच लागेल अशी आशा आहे.

ग्रंथप्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| भाग | विषय | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ ला— | कुलवृत्त, बाल्यावस्था आणि शिक्षण | १-१३ |
| २ रा— | पटवर्धनांच्या लढाया व त्यांत भाऊंचा अंशतः संबंध ... | १४-२५ |
| ३ रा— | भोंसल्याबरोबर लढाई. पटवर्धनांवर हैदराचा छापा. ... | २५-४० |
| ४ था— | हैदरअल्लीबरोबर लढाया व त्या वेळचे भयप्रद प्रसंग ... | ४१-६४ |
| ५ वा— | पुण्यांतील दंगल, आणि राघोबा भरारी... ... ... | ६४-८४ |
| ६ वा— | बोर घाटांतील लढाया आणि कप्तान स्टुअर्ट यांचा मृत्यु ... | ८४-१०० |
| ७ वा— | बदामीचा वेढा व टिपु सुलतानावर स्वाऱ्या. ... ... | १००-१४० |
| ८ वा— | खडर्याची लढाई ... ... | १४०-१५६ |
| ९ वा— | चिमाजी माधवराव पेशवे आणि परशुरामभाऊ पटवर्धन मुख्य दिवाण... ... ... | १५६-१८१ |
| १० वा— | छत्रपतींचा पराजय आणि पट्टणकुडी येथें राजा शिवाजीबरोबर झालेली घोर लढाई. ... | १८२-२०६ |

# पेशवाईंतील धामधुमींचा देखावा

किंवा

# सरदार
# परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम.

## भाग पहिला.

### कुलवृत्त, बाल्यावस्था आणि शिक्षण.

रत्नांगिरीपासून सुमारें अडीच कोसांवर कोतवडें ह्मणून एक टुमदार गांव आहे. त्या ठिकाणीं हरभट्ट बिन बाळंभट्ट पटवर्धन या नांवाचा एक सदाचारसंपन्न कर्मनिष्ठ ब्राह्मण रहात असे. हरभट्टजींची पत्नी लक्ष्मीबाई ही शेंडे यांची मुलगी. हीं उभयतां देवदेवनार्चनांत व ईश्वरोपासनेंत आपला काळ घालवीत, आणि वडिलोपार्जित थोड्याशा जमिनीवर व भट्टभिक्षुकीवर जी काय थोडी प्राप्ति होई, त्यांवर निर्वाह करून समाधान मानून असत.

हरभट्टजींची ही स्वस्थता फार दिवस राहिली नाहीं. त्यांच्या प्रपंचाचा विस्तार उत्तरोत्तर अधिकाधिक होत चालला, व कोतवड्यासारख्या लहान गांवांत अधिक प्राप्ति होण्याचीं मुळींच साधनें नसल्या-

मुळें हरभट्टजींस पूर्ण दरिद्रावस्था येऊन त्यांच्या कुटुंबाच्या माणसांस तटातट् उपास पडूं लागले. या जगांत 'गाड्यावर नाव आणि नावेवर गाडा' हे दोन्ही प्रकार कधीं कधीं दृष्टीस पडतात. त्याप्रमाणें हरभट्टजींस आपल्या दुसऱ्या दोन मुलांच्या मुंजी कर्तव्य होत्या त्यासाठीं त्यांनीं आपले उपाध्ये वझे यांजपाशीं कांहीं मदत व्हावी ह्मणून गोष्ट काढिली! उपाध्यांनीं यजमानांस स्पष्ट 'नाहीं' ह्मणून सांगितलें. तेव्हां ह्या मुलांच्या मुंजी होऊन आतां हा प्रपंचाचा गाडा कसा हांकतो ह्मणून बिचाऱ्या हरभट्टजींस रात्रंदिवस घोर लागला. त्यांनीं कैक लोकांजवळ तोंड वेंगाडावें, ज्याच्या दाराचा उंबरठा पाहूं नये, त्याचे जवळ याचना करावी, परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां भट्टजींची मानहानी व अप्रतिष्ठा मात्र व्हावी.

इतक्यांत असें झालें कीं हरभट्टजींची आका ह्मणून एक बहीण भुदरगडास दिली होती. तिला आपल्या भावाच्या अडचणींची बातमी लागून तिनें दांडेकर म्हणून कोणी सधन भिक्षुक तिचे घरीं रहात असत, त्यांचेकडून आपल्या भावास मदत करविली; व अशा रीतीनें हरभट्टजींच्या मुलांच्या मुंजीची अडचण दूर झाली.

कोनवड्यांत एवढा प्रपंच चालविणें कठीण आहे असें पाहून एक ईश्वराराधनेखेरीज हे पांग फिटण्यास दुसरें साधन नाहीं असें हरभट्टजींस वाटलें; आणि

जवळच पुळें ह्मणून गणपतीचें जाज्वल्य स्थान आहे, त्या ठिकाणीं गजाननाची उपासना करण्याचा हरभट्टजींनीं निश्चय केला, व त्याप्रमाणें एकनिष्ठपणानें हेरंबोपासना सुरू केली. ह्या निःसीम गाणपत्त्यानें एक तपपर्यंत केवळ दूर्वांच्या रससेवनानें ही अघोर तपश्चर्या केल्यावर एके दिवशीं गजाननाची चतुर्भुज मूर्ति स्वप्नांत येऊन तिनें हास्यवदन करून आशीर्वाद दिला कीं ' तुझ्या एकनिष्ठ भक्तिप्रभावानें मी संतुष्ट झालों; तर आतां उपवास न करितां देशावर जा आणि जो पुरुष प्रथम तुझ्या दृष्टीस पडेल, त्यास तूं आपला यजमान कर; म्हणजे त्याचे हातून तुझा अभ्युदय होईल व तोच हरिवंशाची कीर्ति दिगंतरीं होण्यास कारण होईल.' असा आशीर्वाद देऊन स्वारी अंतर्धान पावली, व इतक्यांत हरभट्टजी जागे झाले !!

गजाननाच्या प्रत्यक्ष दर्शनाचा अलभ्य लाभ, व उन्नति होण्याविषयींचा आशीर्वाद ह्या गोष्टी पाहून हरभट्टजींस पराकाष्टेचा हर्ष झाला, व आजपर्यंत देह झिजविल्याचें सार्थक झालें असें समजून त्वरित देशावर जाण्याची त्यांनीं तयारी केली.

कुटुंबाचा निरोप घेऊन भट्टजी घाट चढून माथ्यावर येतात इतक्यांत एक ७।८ वर्षांचा सुकुमार मुलगा उन्हानें तोंड लाल झालेला व घामानें थबथबलेला, हुश्श करीत झाडाच्या छायेखालीं बसलेला भट्टजीं-

च्या दृष्टीस पडला, आणि त्याचे जवळच सुस्कारा टाकीत बसलेली एक तरुण विधवा स्त्री दृष्टीस पडली. घाटमाथ्यावर प्रथम दर्शनींच तें लहान मूल दृष्टीस पडतांच हरभट्टजींची कंबर खचली; व कपाळाला हात लावून 'या अर्भकाचे हातून माझी दैना ती काय फिटणार' ह्मणून त्यांनीं मोठ्यानें सुस्कारा टाकिला. नंतर डोळ्यांपुढें आलेली अंधेरी जाऊन त्या मुलाच्या तोंडाकडे नीट न्याहाळून पहातात तों त्याचे पाणीदार डोळे, तरतरीत मुद्रा व शरीराची कांति यांवरून हा कोणी भाग्यशाली पुरुष पुढें होईल असें हरभट्टजींस वाटूं लागलें; व त्या मुलाच्या सामुद्रिक चिन्हांव-रूनही त्याच्या राजतेजाची भट्टजींस खात्री झाली. मग 'न जाणों, कदाचित् या बालकाचे हातून सो-न्याचे दिवस दाखविण्याची प्रभूची इच्छा असेल' असें ह्मणून भट्टजींनीं आपल्या मनाचें समाधान केलें, व 'प्रभूची लीला अगाध आहे' असें ह्मणत त्या मुलाची पूसतपास करण्याकरितां पडशी पुनः खांद्यावर टा-कून काठी टेंकीत टेंकीत त्या झाडाकडे हरभट्ट गेले.

विचारपूस करतां हरभट्टजींस कळलें कीं ह्मापण गांवची ती एक गरीब बाई असून मुलाच्या मुंजीची कांहीं सोय व्हावी ह्मणून देशावर जात आहे. आप-लाही असाच कांहीं उद्देश आहे असें हरभट्टजींनीं त्या उभयतांस सांगितलें; व बरोबरच संगतीसोबतीनें

इतिहास १२३

जाऊं असें ह्मणून तीं त्रिवर्ग देशांतर इचलकरंजीस आलीं.

इचलकरंजीस आल्यावर तेथील घोरपडे ह्मणून कोणी मराठे सरदार मुख्य होते, त्यांच्याकडे त्या मुलास घेऊन भट्टजी गेले. त्या मुलाचें नांव नारायण व त्याचे बापाचें नांव महादेव. उभयतांची हकीकत ऐकून घोरपड्यांनीं त्यांना आपले पदरीं राहून घेतलें व नारायणाची मुंज करून त्याला दरबारांत येण्याजाण्याची मोकळीक दिली.

नारायण हा स्वभावानें गरीब, मनमिळाऊ व उमदा असल्यामुळें घोरपड्यांची त्याच्यावर पूर्ण मर्जी बसली. नारायणानें पागेंत जाऊन तेथील स्वार शिपायांशीं परिचय पाडला, व घोड्यावर बसणें, घोडा भरधांव फेंकणें, भाला फेंकणें इत्यादि सरदारबाण्याच्या अवश्यक गोष्टी शिकून त्यांत लवकरच तो तरबेज झाला.

नारायणाच्या आंगचे हे गुण घोरपड्यांचे दृष्टीस कधीं कधीं पडत व लोकांकडूनही त्याच्या सौजन्याची व शौर्याची वाहवा त्यांचे कानावर जाई. या गुणांमुळें ते त्याला पोटच्या मुलाप्रमाणें वागवीत; आणि हा सर्व उपकार स्मरून नारायण सुद्धां घोरपड्यांना केवळ पित्याप्रमाणें मानीत असे. एके दिवशीं घोरपडे भोजन करीत असतां नारायणराव

अकल्पित कांहीं कामाकरितां वाड्यांत गेले. त्यांस पाहून घोरपडे विनोदानें ह्मणाले, 'कां नारायणा, तूं आमचा मुलगा ह्मणवितोस तर आमचे ताटांत ये जेव पाहूं!' हें ऐकतांच नारायणरावांनीं आंगरख्याच्या अस्तन्या लागल्याच मागें सारल्या व ते जेवण्यास तयार झाले!

नारायणरावांच्या आंगचे शौर्यादि गुण व त्यांची श्रद्धा पाहून घोरपड्यांनीं त्यांला आपल्या पागेचे पूर्ण अधिकार दिले, व घोरपड्यांचेमागें 'नारो महादेव ह्मापणकर' हेच इचलकरंजीचे मुख्य अधिकारी होऊन हरभट्टजी हे इचलकरंजीकर घोरपड्यांचे उपाध्याय बनले.

अशा रीतीनें ज्या अर्भकाला पाहून हरभट्टजींची घाटमाथ्यावर निराशा झाली होती, त्याच अर्भकाचे हातून त्यांची दैना फिटून त्यांस सुदिन दिसूं लागला व त्यांनीं आपला सर्व परिवार कोनवड्याहून इचलकरंजीस आणून ते सुखानें काळ घालवूं लागले.

नारायणराव अंमळ मोठे झाल्यावर सातारकर व कोल्हापूरकर ह्यांच्या उपयोगीं पडून त्यांनीं कांहीं आणखी जहागिरी व इनामें मिळविलीं. नारायणरावांस फार दिवस मुलबाळ नव्हतें ह्मणून हरभट्टजी त्यांचे कुटुंबास घेऊन व्यंकटेशाची आराधना करण्याकरितां गिरीवर जाऊन राहिले होते. पुढें व्यंक-

टेशाच्या प्रसादानें नारायणरावांस पुत्र झाला. त्याचें नांव व्यंकटेश ठेविलें. व्यंकटराव मोठे झाल्यावर त्यांचा व्रतबंध झाला. त्यावेळीं हरभट्टजीच घोरपड्यांचे उपाध्याय होते. व्यंकटरावही आपल्या बापाप्रमाणेंच सुशील, शूर व समंजस असून तेही पुढें मोठी कीर्ति मिळवितील असा सुमार दिसूं लागला.

हरभट्टजींस एकंदर सात मुलगे होते. रामचंद्र, महादेव, भास्कर, गोविंदा, कृष्णा, त्रिंबक आणि बाळकृष्ण. यांत महादेव हा लहानपणींच वारला. बाकीच्यापैकीं त्रिंबक हरि, गोविंद हरि, आणि रामचंद्र हरि यांचें तेज कांहीं अलौकिक असून, त्यांची इभ्रत, त्यांचें धारिष्ट, व त्यांच्या मर्दुमकीच्या बालक्रीडा ह्यांवरून जो तो भाकीत करी कीं, हे तिघे मुलगे पुढें अप्रतिम धारिष्टाचे व विलक्षण शौर्याचे होतील. त्या भाकिताप्रमाणेंच पुढें प्रकार घडून आला. ह्या तिघां मुलांनीं पटवर्धनांचें घराणें नांवारूपास आणिलें—ह्याच तिघांच्या वंशजांनीं आपले प्राण स्वामिकार्यार्थ धारातीर्थीं अर्पण केले—ह्याच तिघांच्या घराण्यावर पंत प्रतिनिधींनीं शाबासक्यांची वृष्टि करून त्यांस ‘सरदार’ हा जवानमर्दीचा किताब दिला—व जो अजब तारा ह्या भूमंडलावर पुढें थोड्या दिवसांनीं चमकून आपल्या अतर्क्य शौर्यानें सर्व महाराष्ट्रप्रदेश ज्यानें दणाणून सोडिला असा जो ह्या प्रस्तुत चरित्राचा

नायक परशुरामभाऊ, तोही याच तीन शूर लढवय्यांपैकीं तिसरा जो रामचंद्र हरि त्याचे पोटीं श्रावण शुद्ध ८ शके १६६२ या दिवशीं अवतरला !

अशा रीतीनें घोरपड्यांचे छायेखालीं हरभट्ट आपल्या परिवारासहवर्तमान आयुष्याचा चवथा प्रहर सुखानें घालवीत असतां एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. ती अशी कीं बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या अनुबाई ही व्यंकटराव घोरपडे यांस देण्याचें ठरलें. त्या कामांत हरभट्टजी मध्यस्थ होतेच. यामुळें त्यांचा पेशव्यांशीं चांगलाच परिचय पडून हा शरीरसंबंध झाल्यावर हरभट्टजींच्या मुलांस पेशवेदरबारांत शिरण्यास चांगलीच संधि सांपडली. त्या वेळीं थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांची कारकीर्द असून तो प्रसंग धामधुमीचा व खऱ्या लढवय्यांच्या मर्दुमकीचें चीज होण्याचा होता. रामचंद्र हरि व गोविंद हरि यांची दाद अनुबाईचे मार्फत बाजीरावसाहेबांपर्यंत लागून त्यांनीं त्यांस इंद्रोजी कदम म्हणून एक शूर सरदार होता, त्याच्या पागेचे फडनविशीचें काम सांगितलें.

हे दोघे बंधु स्वरूपानें खुपसुरत, स्वभावानें नम्र असून अर्जवी, व कामाकाजांत हुषार असल्यामुळें दरबारांत ते सर्वांचे आवडते झाले. फडनविशीवर असतां रामचंद्र हरीनीं व गोविंद हरीनीं तें काम

फार उत्कृष्ट रीतीनें बजाविलें. त्यांनीं त्या शूर कदमाबरोबर घनघोर युद्धसंग्रामांत जावें, कदमाच्या तर्फेनें शत्रूबरोबर मोठ्या हिय्यानें लढावें, व कधीं कधीं कदमसाहेबांवरही नोड करावी! इंग्रोजी कदम हा फार सज्जन सरदार होता. त्यास पुत्रसंतान नव्हतें. त्यानें पटवर्धनांच्या मर्दुमकीची नेहमीं तारीफ करावी व आपल्या मागें आपल्या पागेची सरदारी चालविण्यास हे दोन पुरुष योग्य आहेत अशी त्यानें श्रीमंतांपाशीं शिफारस करावी. कदम मृत्यु पावल्यानंतर त्याची पागा गोविंद हरीच्या दिमतींत दिली व रामचंद्र हरीस चिमणाजी आप्पा यांनीं आपले खासगी स्वारांच्या पथकांत घेतलें.

चिमणाजी आप्पाच्या स्वारींत रामचंद्र हरि राहिल्यानंतर त्यांनीं फारच वाहवा मिळविली. सवाई जयसिंग याचा एक मदोन्मत्त झालेला हत्ती बाजीरावासमक्ष मोठ्या शूरपणानें व धूर्ततेनें रकमीस आणून त्यांनीं शाबासकी मिळविली. इ० सन १७३५ त जंजिऱ्याचे शिद्याबरोबर चिमाजी आप्पांची मोठी भयंकर लढाई चालली असतां रेवदंड्याचा बळकट किल्ला रामचंद्र हरीनीं शिद्द्यापासून शौर्यानें लढून घेतला. या वेळीं रामचंद्र हरींचे उजवे हातास गोळी लागून मोठी जखम पडली. त्याप्रमाणेंच पुढें इ० सन १७३७ त फिरंग्यांपासून

वसईचा किल्ला घेण्याकरितां चिमाजी आप्पाच्य सैन्याचा दारुणसंग्राम चालला असतां त्यांत किल्ला काबीज करण्याचें यश रामचंद्र हरींनींच संपादिलें, आणि अशा रीतीनें हा पटवर्धन—सरदार, सरदारमालिकेंत अग्रासनीं चमकूं लागून चिमाजी आप्पांनीं आपलें २४०० स्वारांचें सर्व खासगी पथक याच वीर पुरुषाच्या नांवानें करून दिलें.

रामचंद्ररावांची वाहवा याप्रमाणें चोहोंकडे होत असतां शके १६७१ त पटवर्धनांच्या घराण्यावर एकाएकीं आकाशाची कुऱ्हाड पडली. रामचंद्र हरि, आपल्या पथकासह पेशव्यांबरोबर अहमदशहा अबदाली व बुंदेल खंडांतील राजे यांशीं लढून अंतर्वेदींतील बंदोबस्त करीत असतां एकाएकीं उदराची भावना होऊन ब्रह्मवर्तानजीक शिवराजपूर येथील छावणींत अश्विन शुद्ध ७ स मृत्यु पावले, व त्यामुळें पेशवाईंतील एक अमोलिक वीररत्न गमावलें!

रामचंद्रराव वारले त्यावेळीं परशुरामभाऊंचें वय केवळ १० वर्षांचें होतें. रामचंद्ररावांच्या मृत्यूची हृदयस्फोटक वार्ता पटवर्धनांच्या घरीं कळतांच मोठा आकांत माजला. पतिवियोगाच्या असह्य दुःखवेगानें रामचंद्ररावांची पत्नी जानकीबाई विव्हळ होऊन गडबडा लोळूं लागली. 'माझ्या परशुरामाला आतां कोण संभाळील! मी आतां कोणाच्या जिवावर काळ

कंठावा ! हा सर्व संसार स्वप्नाप्रमाणें झाला ना ! अशा प्रकारच्या हृदयद्रावक आक्रंदनानें सर्व वाडा दणाणून गेला. परशुरामालाही हुंदका आवरेनासा होऊन तो ओंकसाबोंकशी रडूं लागला. *पुरुषोत्तमराव ह्मणून जे रामचंद्ररावांचे जवळ त्यांचे पुतणे होते, त्यांस रामचंद्ररावांनीं पोटच्या मुलापेक्षांही जास्ती वागविल्यामुळें ह्या आकस्मिक घाल्यामुळें त्यांची कंबरच खचली. तथापि त्यांनीं आपला दुःखावेग आवरून सर्वांचें शांतवन केलें, व 'आप्पांनीं ज्याप्रमाणें माझा प्रतिपाल केला त्याप्रमाणें मीही भाऊचा प्रतिपाल करीन, तुह्मांला यत्किंचित् ही अंतर देणार नाहीं' अशा चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांनीं जानकीकाकूंची समजूत घातली.

पुरुषोत्तमरावांनीं आपला शब्द पुढें खरा करून दाखविला. त्यांनीं भाऊंना त्यांचे वडील वारले असें वाटूं दिलें नाहीं, व पोटच्या मुलाप्रमाणें भाऊंचा प्रतिपाल करून रामचंद्ररावांचें जें पथक पुरुषोत्तमरावाकडे पेशव्यांनीं दिलें होतें, तें कोल्या समजुतीनें आपल्याकडे न ठेवितां आप्पांनीं केलेल्या प्रतिपालास स्मरून तें पथक त्यांनीं मोठ्या संतोषानें व प्रेमानें

* हरभटजींचे कृष्णंभट ह्मणून बंधू होते, त्यांचे हे चिरंजीव. रामचंद्र हरीस फार दिवस मूल नसल्यामुळें त्यांस त्यांनीं जवळ बाळगिलें होतें.

परशुरामभाऊंचे स्वाधीन केलें! चालत आलेल्या लक्ष्मीस न भुलून कृतज्ञतेनें आणि औदार्यानें वागणारे पुरुषोत्तमरावांसारखे अद्वितीय पुरुष जगांत कितीकसे सांपडतील बरें? असो.

पुरुषोत्तमरावांच्या शिक्षेंत परशुरामभाऊंस सरदारी बाण्याचें व खऱ्या वीराचें योग्य वळण चांगल्या रीतीनें लागलें. त्याप्रमाणेंच पुरुषोत्तमराव स्वतः फरडा कारकून असल्यामुळें अनामत, तसलमात, दुबेर्जा, तेरजा इत्यादि कारकुनी लिहिण्याची व दरबारच्या कायदेकानूंची सर्व माहिती त्यांस लवकरच झाली. त्याप्रमाणेंच निशाण मारणें, भाला फेंकणें, घोडा भरधांव टाकणें, दांडपट्टा वगैरे सर्व प्रकारच्या हुन्नरांमध्यें सुद्धां भाऊ फार लवकर तरबेज झाले, आणि त्यांच्या शौर्यरूप वृक्षास पुरुषोत्तमरावांसारख्या मार्मिक व लढवय्या पुरुषाचें शिक्षणरूपी विपुल जल योग्य वेळीं मिळत गेल्यामुळें तो इतक्या झपाट्यानें वाढला कीं या पटवर्धन-बच्चास पुरें चवदावें वर्ष टेंकतें न टेंकतें तोंच श्रीमंतांच्या स्वारीबरोबर कर्नाटकांत सावनूरकरांशीं सामना करण्याकरितां त्यानें हट्ट घेतला!!

परशुरामभाऊंचा तरवार पडताळण्याचा हा केवळ ओ-ना-मा असतांही या प्रसंगीं त्यांनीं विलक्षण शौर्य आणि अप्रतिम साहस करून दाखविलें. ही

लढाई, मुजफरजंग म्हणून पुण्यांतून पळून गेलेल्या इसमाला सावनूरच्या नबाबानें आश्रय दिल्यामुळें उपस्थित झाली होती. ही लढाई एकसारखी ३ महिनेपर्यंत घनचक्कर चालली होती. भाऊ व पुरुषोत्तमराव हे अघाडीस असून श्रीमंतांची स्वारी युद्धचमत्कार व विशेषेंकरून भाऊंचें हस्तकौशल्य पहात अंमळ मागच्या बाजूस उभी होती. या लढाईंत गोपाळराव गोविंद मिरजकर यांस डाव्या दंडावर व पायावर अशा दोन जखमा लागल्या. ह्या लढाईंत पटवर्धनांनीं आपल्या शौर्याची कमाल करून सोडिली व त्यांत भाऊंचें वय अगदीं लहान असूनही त्यांनीं विलक्षण रीतीची कत्तल उडविल्यामुळें सावनूरकरांचा मोड झाला व 'शाबास परशुरामा शाबास' असा चोहोंकडून ध्वनि गर्जूं लागला. श्रीमंतांची मर्जीही या होतकरू वीराचा अतुल पराक्रम पाहून खुष झाली आणि त्यांनीं भाऊंची पाठ थोपटून त्यांस पोषाख व कोरेगांव बक्षिस दिला.*

---

* रा० रा० निगुडकरकृत भाऊंचें चरित्र व पटवर्धनांच्या घराण्यांतील जुन्या लोकांकडून मिळालेली माहिती.

२

## भाग दुसरा.

---

## पटवर्धनांच्या लढाया व त्यांत भाऊंचा अंशतः संबंध.

इ० स० १७६०।६१ ह्या वर्षापासून परशुरामभाऊंच्या स्वामिसेवेस व महत्कृत्यास त्यांच्या इतर भावांसह विशेष रीतीनें सुरवात झाली. ह्या वर्षापासून पेशव्यांच्या* इतिहासांत ह्या पराक्रमी पुरुषाच्या नांवाचा उल्लेख पटवर्धनमंडळांत जागोजाग होऊं लागला. ह्या वेळीं युद्धकौशल्याविषयीं, शौर्याविषयीं व राज्यनीतीविषयीं पुढें गाजलेला माधवराव बल्लाळ पेशवा हा गादीवर असून त्याच्या सुखावह व न्यायी कारकीर्दीस नुकनीच सुरवात झाली होती. इ० स० १७६१ मध्यें श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं मुद्दाम जंगी फौज ठेवण्याकरितां पटवर्धनांस

---

* इ० स० १७६० मध्यें ५००० फौजेनिशीं दवलताबाद किल्ल्यावर परशुरामभाऊंनीं व गोपाळरावांनीं पटवर्धन-भाऊबंदांसह हल्ला करून दोन महिने मोठ्या निकराची लढाई केली व तो किल्ला मोठ्या शहामतीनें हैदराबादकरांकडून घेतला. याप्रमाणें या पराक्रमी पुरुषाच्या यशोदुंदुभी १७६० या वर्षापासून दुमदुमूं लागला. असतां व पटवर्धनांच्या कागदोपत्रीं या वीराचें (परशुरामभाऊंचें) नांव प्रत्येक लढाईचे प्रसंगीं झळकत असतां, ग्रांटडफ साहेबांच्या इतिहासांत १७७९ पर्यंत एकदांही या शूर पुरुषाच्या नांवाचा उल्लेख केलेला नाहीं, ही मोठ्या अचंब्याचीच गोष्ट आहे!

मिरजेचा* किल्ला दिला. त्याप्रमाणेंच दुसरीं कांहीं ठाणीं व जकात वगैरेचें उत्पन्न, हीं पटवर्धनांस दिलीं. पुढें इ० स० १७६५ त ८००० स्वार ठेवण्याकरितां २५ लाख उत्पन्नाच्या मुलखाचा सरंजाम मिळाला. त्यापैकीं २४०० स्वार खुद्द परशुराम भाऊंनीं ठेवून बाकीचे स्वार अवांतर पटवर्धन मंडळींनीं मिळून ठेवावे, असा पेशव्यांनीं ठराव केला होता. पेशव्यांनीं दिलेला हा पटवर्धनांचा मुलूख एकत्र नसून कांहीं गांव येथें, कांहीं तेथें असे होते. कित्येक गांव पंढरपूरच्या उत्तरेस होते आणि कांहीं तुंगभद्रा नदीचे समीप, दक्षिण दिशेस होते.

या सर्व प्रदेशांत मिरजेच्या आसपासची जमीन व कोल्हापूरच्या पूर्व हद्दीवरील प्रांत अत्यंत सुपीक होता. पटवर्धनांचीं रहाण्याचीं ठिकाणें ही याच भागांत होतीं.

इतकी मोठी जहागीर पटवर्धनांस ह्याच प्रांतांत देण्यामध्यें पेशव्यांचा काय उद्देश असावा अशी आशंका कदाचित् आमचे वाचक घेतील. परंतु ही जहागीर देण्याचें कारण अत्यंत महत्वाचें असून राजकीय होतें. त्यावेळीं कोल्हापूर आणि म्हैसूर येथील राजांपासून पेशव्यांस फार त्रास सोसावा लागे.

* मोडकफ़ृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पान ३१-पॅरा २ रा, व पटवर्धनांचे तैनात जाबते.

कोल्हापूरचे राजे शिवाजीच्या वंशजांपैकीं असून स्वतंत्र होते. ते पेशव्यांस जुमानीत नसून पेशव्यांच्या शत्रूशीं आंतून स्नेह ठेवीत; व प्रसंगोपात पेशव्यांवर उठण्यासही मागें पुढें पहात नसत! त्याप्रमाणेंच म्हैसूरचा हैदरखान* हाही प्रबल होऊन आपल्या प्रचंड सैन्यसमूहानें आसमंतात भागचे प्रदेश उध्वस्त करून इतर संस्थानिकांस जर्जर करून सोडूं लागला; एका मागून एक स्वाऱ्या करून त्यानें आपल्या राज्यवृक्षाच्या शाखा बऱ्याच विस्तृत केल्या. प्रांता मागून प्रांत देशामागून देश त्याचे वशांत उतरूं लागले.

अशा रीतीनें ह्या भुजबल गर्विष्ट हैदरखानाची गर्दन दाबण्यास व कोल्हापूरकरांची कंडु शमन करण्यास पटवर्धन-सरदार-मंडलच योग्य आहे, अशी पेशव्यांची पक्की खात्री होऊन त्यांनीं ह्याच मुलुखांत पटवर्धनांचीं ठाणीं स्थापित केलीं, व तेणेंकरून पेशव्यांच्या राज्याची दक्षिण सीमा सुरक्षित होऊन हैदरखानासारख्या लांडग्याचा धुव्वा उसळून देण्याकरितां गोविंद हरि, गोपाळराव गोविंद, परशुरामभाऊ, यांसारखे सिंहाचे बच्चे एकामागून एक सुटूं लागले.

ह्या ठिकाणीं आमच्या वाचकांस आम्हीं हेंही सांगून ठेवितों कीं, ह्या चरित्राचा मुख्य नायक जो

---

* हैदर अल्लीलाच हैदरखान असें जुन्या लेखांत ह्मटलेलें आहे, सबब ह्या चरित्रांत दोन्ही नांवांचा अर्थ एकच समजावा.

परशुरामभाऊ ह्याचा एकंदर पटवर्धनमंडळाशीं अत्यंत निकटचा संबंध असल्यामुळें, ह्या चरित्रांत प्रसंगोपात सर्व पटवर्धन सरदारांचाही उल्लेख जागोजाग होणार आहे. कारण श्रीमंतांचीं आज्ञापत्रें मोहिमेस जाण्याकरितां आलीं ह्मणजे ह्या एकनिष्ठ पटवर्धनलढवय्यांस वीरश्री चढून ते सर्वजण मिळून श्रीमंतांबरोबर जात, व हातावर शीर घेऊन जिवाची पर्वा न करितां मर्दुमकीनें लढत, ह्मणून प्रसिद्ध बापू गोखल्यांचें नांव निघालें ह्मणजे दादासाहेब व आप्पासाहेब हे जसे यावयाचेच, त्याप्रमाणें परशुरामभाऊबरोबर गोपाळ गोविंद, वामन गोविंद, नीलकंठ त्रिंबक इत्यादि वीरांच्या नांवांचा उल्लेख होणें अगदीं यथान्याय आहे. अस्तु.

म्हैसूरच्या हिंदू राजास पदभ्रष्ट करून आपणच त्याची गादी बळकावून बसलेला हैदरखान ह्यानें इ० स० १७६४ मध्यें अत्यंत धामधूम सुरू केली. त्यानें कित्येक पाळेगारांपासून जुलमानें खंडणी घेऊन आसपासचीं संस्थानें तो एकामागून एक गट्ट करूं लागला. ह्या त्याच्या भयप्रद जुलमानें त्या प्रांतांतील सर्व लोकांस त्राहि त्राहि होऊन हा हैदरअली नव्हे तर प्रत्यक्ष कृतांतच अवतरला कीं काय, असें त्यांस भासूं लागलें ! त्या जुलमी हैदरअलीनें बेदनूर संस्था-

त्यावर झडप घालून तें घेतलें व पुढें लवकरच तो सावनूराजवळ येऊन थडकला!

सावनूरचा नवाब हैदरअल्लीकडून कोंडला गेल्यामुळें अत्यंत भयभीत होऊन गेला; आणि ह्या संकटांतून पार पाडणारा एक पेशवा मात्र दिसतो आहे, दुसरा कोणी हैदराबरोबर टक्कर मारण्यासारखा समर्थ पुरुष दिसत नाहीं, असा सुमार पाहून श्रीमंत माधवराव साहेब पेशवे यांस एक काकुळतीचें पत्र त्यानें पाठविलें. त्यांत हैदरअल्लीचा जुलूम व आपणावर ओढवलेलें संकट हीं हृदयभेदक रीतीनें नवाबानें वर्णन केलीं होतीं.

माधवरावांसारख्या वीरश्रेष्ठ पेशव्यास म्हैसूरकराचा तो अपराध कोठून सहन* होणार? हैदरअल्लीचें

---

* माधवरावसाहेब पराकाष्ठेचे ताष्ट होते. त्यांच्या ह्या स्वभावाच्या व अकलेच्या गोष्टी पेशव्यांच्या बखरींत सांपडतात त्या अशा:—

१ होळकराचा दिवाण गंगोबा तात्या हा पेशवे लहान असतां कांहीं अधिक उणें बोलला, सबब त्याचे पाठीवर या खासे स्वारींनीं सपासप छड्या ओढिल्या!

२ त्याप्रमाणेंच दिनकर महादेव जोशी हे भरपंक्तींत कांहीं टाकून बोललें तें माधवराव साहेबांस सहन न होऊन श्रीमंतांनीं तेथल्या तेथेंच जोशीबोवांची बत्तिशी रंगविली!!

३ एवढा थोरला साडे तीन शहाण्यांपैकीं शहाणा सखाराम बापू वकील, परंतु त्याच्याही कुरबुळांतील खुणा ओळखणार व सुतानें स्वर्गास जाणारा माधवराव त्याचीं सर्व कारस्थानें बाहेर काढी व आपण स्वतः सुरक्षित राहून सखाराम बापूंचीच फजिती वारंवार करी!! हा सर्व प्रकार काव्येतिहाससंग्रहांतील माधवराव पेशव्यांचे बखरींत पान ८३–९६ यांत सुरस व सविस्तर दिला आहे तो वाचण्यासारखा आहे.

दुराचरण श्रवण करून पेशव्यांच्या तळव्यांची आग मस्तकास जाऊन पोहोंचली; आणि पटवर्धन, रास्ते मोरो बल्लाळ, आनंदराव भिकाजी, वगैरे तमाम लोकांस मोहिमेवर जाण्यासाठीं पेशव्यांकडून पत्रें गेलीं, व हैदरअल्लीवरील स्वारीची तयारी जारीनें सुरू झाली.

पेशव्यांकडील आज्ञापत्र पोहोंचतांच गोपाळराव गोविंद, भाऊंसह व इतर आपल्या भाऊबंद पटवर्धनांसहवर्तमान एकदम कर्नाटकांत उतरले. त्रिंबकराव मामा आणि आनंदराव रास्ते हेही त्यांस येऊन मिळाले. एकंदर फौज ४०००० पर्यंत जमली! शिवाय सावनूरकर वगैरे संस्थानिकांच्या फौजाही अल्लीची पायमल्ली होण्याची वाट पहात होत्या, त्या फौजाही मोठ्या आनंदानें पटवर्धनांस येऊन मिळाल्या!

मागून लवकरच श्रीमंत माधवराव साहेब पेशवे यांची स्वारी २०००० स्वार आणि १५००० पायदळ घेऊन कर्नाटकांत येऊन पोहोंचली. पेशव्यांची व रघुनाथरावांची, स्वारीसंबंधानें पुण्यास थोडी बोलाचाली झाल्यामुळें माधवराव पेशव्यांस, पटवर्धनांना येऊन मिळण्यास थोडा विलंब लागला. इतक्यांत परशुरामभाऊ, गोपाळराव गोविंद वगैरे मंडळी कृष्णा उतरून पलीकडे गेली तों हैदरअल्लीकडील फझल्‌उल्लाखान सरदार पटवर्धनांवर चालून

आला. पेशव्यांकडील सैन्य अद्याप येऊन मिळालें नव्हतें ह्मणून पटवर्धनांच्या सैन्यानें थोडी माघार घेतलीसें दाखविलें. मग कुमक येऊन पोहोंचतांच पटवर्धनांचें सैन्य मोगलांवर एकदम तुटून पडलें; आणि खानसाहेबाच्या सैन्याची भयंकर कत्तल उडवून त्यास 'या अल्ला! या खुदा! तोबा! तोबा!!' ह्मणत पिटवून लाविलें.

* पटवर्धन व रास्ते हानगल मुक्कामीं असतां त्यांस कळलें कीं हैदरअल्ली २०००० स्वार व ४०००० पायदळ घेऊन तुंगभद्रा उतरला; व पुढें हरिहराजवळ येऊन राहिला आहे. तेव्हां ते तिरासारखे त्याचे तोंडावर चाल करून गेले. मराठे लोक आपल्यावर येतात असें पाहून हैदर रट्टेहाळीहून निघून अलूरास गेला. त्या वेळीं श्रीमंतांची फौज सोंडुरावर असून त्यांस व हैदरअल्लीस ३० कोसांचा छट्टा होता. पुढें ती फौज सावनुराजवळ वर्धानदीसमीप येऊन पोहोंचली.

हैदरअल्लीच्या लोकांकडून सावनूरकरांस फारच ताप होऊं लागला. त्या वेळीं आपला दिवाण खंडेराव यास अल्लीकडे पाठवून खंडणी देण्याविषयींचें बोलणें लावावें असा नवाबसाहेबाचा विचार ठरला.

---

* आण्णासाहेब मिरजमळेकर यांनीं केलेली पटवर्धनांची बखर, पटवर्धनांचें कागदपत्र आणि बाळाजी प्रभाकर मोडककृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास पान ४३-४४ पहा.

परंतु ही बातमी पटवर्धनांस कळतांच त्यांनीं सावनूरच्या नबाबास सक्त ताकीद दिली कीं, 'तुह्मी आपला दिवाण एकदम माघारा बोलावून आणा, व खंडणी देण्याविषयींचें बोलणेंही तहकूब ठेवा. या दोन गोष्टी जर तुमचे हातून न होतील तर एका हैदरअल्लीचें पारिपत्य तर काय पण तुम्हींही सर्व सावनूर संस्थानास आंचवाल !!' पटवर्धनसरदारांचा हा जरबीचा निरोप ऐकून नबाबानें तें बोलणें तसेंच तहकूब केलें. व पटवर्धनांची आणि मराठ्यांची फौज अगदीं सावनुराजवळ येऊन ठेपल्यामुळें हैदरअल्लीचेंही धाबें दणाणून तो उपद्रव देईनासा झाला.

गोपाळराव गोविंद, परशुरामभाऊ वगैरे सरदारमंडळींनीं चिक्बाळापूर, नंदगड, दोड्डबाळापूर, चन्नरायगड वगैरे ठिकाणें हस्तगत केलीं. नंतर चिक्बाळापुराहून निघून पटवर्धन सरदार कैवारास आले.

* त्या ठिकाणीं त्यांस बातमी लागली कीं, हैदरअल्लीचा सरदार चंद्रोजी जाधव व बाळाजीपंत हे मोठ्या सैन्यासुद्धां येळुरीवर आहेत; तेव्हां गोपाळराव गोविंद अकस्मात् येळुरीवर उतरून अल्ली-

*आण्णासाहेब पटवर्धन मिरजमळेकर यांनीं केलेला इतिहास, बाळाजी प्रभाकर मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास पान ४४-४५.

च्या दोन्ही सरदारांस त्यांनीं मागें हटविलें; व पुढें मोठ्या निकराची लढाई होऊन त्यांत चंद्रोजी जाधव व बाळाजीपंत हे पटवर्धनांच्या हातीं जिवंत सांपडले !

पटवर्धनसरदार अलीच्या सरदारांस याप्रमाणें इकडे जर्जर करून सोडीत आहेत, इतक्यांत हैदर-अली सावनुराजवळ सात कोसांवर येऊन श्रीमंतांच्या सैन्याची व अलीच्या सैन्याची गांठ पडली. तेव्हां त्रिंबकरावमामांनीं गोपाळराव, परशुरामभाऊ वगैरे सरदारांस एकदम येऊन मिळण्याविषयीं पत्र लिहिलें.

पटवर्धनसरदार श्रीमंतांच्या सैन्याला येऊन मिळतांच उभय सैन्यांच्या भयंकर लढाया सुरू झाल्या.

हैदरखान हाही महान् योध्यांपैकीं असून त्याचें जवळ २०००० स्वार आणि ४०००० पायदळ होतें. त्यांत २०००० लोक युद्धकौशल्यांत प्रवीण असे होते. आजपर्यंत हैदरअली, समोर येऊन न लढतां निवळ टाळाटाळच करी; परंतु ह्या वेळीं मराठे व मुसलमान ह्या दोन्ही सैन्यांचा सामना होऊन दोन्हीकडले लोक जिवाची परवा न धरितां एकमेकांवर चवताळून गेले ! एकाएकीं घनघोर

युद्धसंग्राम माजून धुळीनें, धुरानें व गोळिबारानें, दश दिशा धुंद होऊन दणाणून गेल्या. कोणी कोणांस दिसेनासे झाले, दोन्हीं सैन्यें एकत्र झालीं. माधवराव पेशवा स्वार होऊन स्वकीय सैन्यासमोर विजेसारखा चमकत होता. हैदरअल्लीही आपल्या सैन्यास उत्तेजन देत हिकडून तिकडे भरधांव घोडा फेंकीत होता. पटवर्धनमंडल 'हरहर महादेव!' असा गंभीर ध्वनि करीत व्यूहाच्या अंतर प्रदेशांत घुसून शत्रुकडील लोकांचीं शिरकमलें कंठनालापासून छटाछट दूर करीत होतें. गोपाळराव आपल्या भ्रातृवर्गास उत्तेजन देत मधून मधून 'चला, हाणा, मारा, कापा' असा गंभीर ध्वनि गर्जत होते. परशुरामभाऊ चित्त्यासारखा तुटून पडून असंख्य शिरकमलें खपाखप उडवीत होता! परशुरामभाऊचा तरवार पडनाळण्याचा हा नवीन अभ्यास असतांही त्याच्या अप्रतिम युद्धकौशल्यानें साश्चर्य होऊन 'शाबास परशुरामा शाबास' असा उद्गार ज्येष्ठ भ्रात्याच्या (गोपाळराव) मुखांतून निघूं लागला. त्या दिवशीं पटवर्धन उत्तम प्रकारें लढले. हैदराकडचे लोकांनींही बहुत पराक्रम केला; परंतु मराठ्यांच्या सैन्यापुढें त्यांचा निभाव न लागून ते लोक रंजीस आले. शेवटीं हैदरअल्ली तहकरण्यास कबूल झाला. तेव्हां श्रीमंत माधवराव पेशव्यांनीं

हैदराशीं * तह करून लढाईचा खर्च घेतला. व सावनूरकरनबाबाबरोबर नरशिंगराव धायगुडे यांस देऊन नबाबास त्याचे राजधानींत स्थानापन्न केले. आणि मुलुखाचे बंदोबस्ताकरितां फौज ठेवून पटवर्धनसरदार परत गेले व श्रीमंत माधवराव साहेब पुण्यास आले.

आतां नागपूरकर भोसल्यांशीं लढाई, हैदरअ-

---

* माधवराव पेशव्यांनीं केवळ स्वपराक्रमावर हा हैदरावर जय मिळविला असतांही राज्यांत स्वस्थता रहावी व घरांतल्या घरांत तंटेबखेडे असूं नयेत म्हणून आपल्या चुलत्याला खुषी ठेवण्याकरितां रघुनाथरावांना पुण्याहून बोलावून आणून त्यांकडूनच हा तह हैदराशीं करविला. कारण त्यावेळीं आपणास अर्धे राज्य प्राप्त व्हावें अशी कुबुद्धि रघुनाथरावास झाली होती, व तो आंतून द्वेष करीत होता, माधवरावांच्या ह्या वर्तनावरून त्यांचा मोठेपणा, निरभिमान, समयसूचकता आणि उत्तमप्रकारचें राज्यकारस्थान, हीं व्यक्त होतात. असें असून डफसाहेबांनीं ह्या वर्तनाबद्दल माधवराव पेशव्यांस दोष दिला आहे!! असो. उत्तरोत्तर ह्या गुणाचा अभाव झाला म्हणूनच देशाला अशी दशा प्राप्त झाली!

(काव्येतिहाससंग्र० पेशव्यांची बखर, पान ९७, टीप ४२)

रघुनाथरावांकडून करविलेल्या ह्या तहाचीं कलमें ३ होतीं तीं अशीः-

१ हैदरअलीनें पेशव्यांस ३२००००० रुपये द्यावे.

२ घोरपडे यांचा हैदरानें घेतलेला मुलूख त्यांचा त्यांस परत द्यावा.

३ सावनूरच्या नबाबापासून हैदरानें खंडणी वगैरे कांहीं एक घेऊं नये.

(मरा० बख० भा० २०, कल० १३)

ल्यावर पेशव्यांची दुसरी मोहीम व पटवर्धनसरदारांची निःसीम स्वामिभक्ति आणि त्यांचें अप्रतिम शौर्य, हे सुरस कथाभाग पुढील प्रकरणांत क्रमानें येतील.

---

## भाग तिसरा.

---

### भोंसल्यांबरोबर लढाई. पटवर्धनांवर हैदराचा छापा.

श्रीमंत माधवराव बल्लाळ हे थोरल्या बाजीरावांप्रमाणेंच शूर असून त्यांस गुणपरीक्षणही फार चांगलें होतें; आणि ह्याच कारणानें पाटिलबोवासारखे, पटवर्धनासारखे, गोखल्यासारखे अजब हिरे वीरमालिकेंत चमकून पेशव्यांचे कारकीर्दींत गोरे, काळे, शिर्के, साळवी, रास्ते, फडके, पालकर, आठवले, वाडीकर, देशमुख, इचलकरंजीकर, घोरपडे इत्यादि शेंकडों वीर आर्यजननीच्या पोटीं अवतरले ! गुणिजनांचा चहाता असला म्हणजे गुणवान् व गुणग्राहक ह्या दोघांचाही उत्कर्षच होत असतो. तो योग, प्रौढ प्रताप शिवाजीच्या मागें पेशवाईमध्यें आला होता पेशवाईंत कुलदीपक बाजीरावापासून तों शेवटच्या कुलांगार बाजीरावाप-

येत गेलेला काल, हा भारतीयांचा पौरुष पर्वकाल ( heroic-age ) होय.

हैदराबरोबर झालेल्या संग्रामांत पटवर्धनांनीं दाखविलेलें शौर्य व त्यांनीं चालविलेली तलवार हीं पाहून माधवराव बल्लाळ पेशवे यांची मर्जी पटवर्धनांवर विशेष सुप्रसन्न झाली; आणि त्यांनीं ८००० फौजेचा सरदारीचा *बेहेडा पटवर्धनांस करून दिला; व फौजेचे खर्चास, नौबतखान्यास, आणि जातीचे तैनातीस कांहीं अधिक मुलूख मिळून, इ० स० १७६८ मध्यें पटवर्धनसरदारांकडे एकंदर ( २५-४१९०० ) पंचवीस लक्ष एकेचाळीस हजार नऊशें रुपयांचा मुलूख झाला ! !

ई० स० १७६९मध्यें नागपूरचे सेनासाहेब सुभे जानोजीराव भोंसले ह्यांचा व श्रीमंत माधवराव बल्लाळ ह्यांचा किंचित् बेबनाव झाला. तो द्वेष पुढें बराच वाढत जाऊन परोत्कर्षासहिष्णु जानोजीराव भोसल्यानें श्रीमंतांबरोबर दोन हात करून पेशव्यांचा उत्कर्ष कुंठित करावा, ह्या उद्देशानें कडेकोट तयारी करून पेशव्यांच्या राजधानीकडे चाल केली; आणि पुण्यानजीक नगराजवळ येऊन आसपासच्या मुलुखांत त्यानें धुमश्चक्री मांडली !

* पटवर्धनाचे तैनात जाबते-सुरुसन्न सब्बास सित्तैन मयातैन व अलफ-( इ० स० १७६५-६ ) पहा.

*भोसल्यांची कृतघ्नपणाची व उद्दामपणाची वर्तणूक पाहून श्रीमंत माधवराव बल्लाळ यांस अत्यंत क्रोध आला, आणि त्यांनीं जानोजीस कृतकर्माचें पूर्ण प्रायश्चित्त मिळावें म्हणून ३०००० तीस हजार निवडक स्वार व कांहीं सडी फौज देऊन पटवर्धन-मंडलास नागपूरकरांच्या सैन्यांत तलवारी पडताळ-ण्याविषयीं आज्ञा दिली ! ( ह्या लढाईंत खुद्द माधवराव पेशवेही सैन्यासह भोसल्यांचे मुलूख काबीज करीत होते. )

धन्याची आज्ञा होतांच गोपाळराव, परशुरामभाऊ, गंगाधर गोविंद, नीलकंठ त्रिंबक, आदिकरून वीरवर सिद्ध झाले. इतक्यांत त्यांस निझामअलीचा दिवाण रुक्नुद्दौला हाही येऊन मिळाला. हा दिवाण येण्याचें कारण असें झालें कीं, कांहीं दिवसांपूर्वी भोसले व निझाम यांचा 'परस्परांनीं परस्परांस युद्धप्रसंगीं सहाय करावें' असा करार मदार झाला असतां जानोजी भोसल्यानें निमक हराम होऊन एका लढाईंत निझामास मदत न करितां त्याला तोंडघशीं पाडिलें ! त्यामुळें तो बेदिल होऊन सम-

---

* पटवर्धनांचे कागदपत्र-कैलासवासी अण्णासाहेब मळेकर यांनीं केलेली बखर, व मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास पान ४७-४८-हें वर्णन ग्रांटडफ यांच्या पुस्तकांत लिहिलेल्या वर्णनाहून बरेंच निराळें आहे. तें वाचून पहाण्याविषयीं शिफारस करितों. ( मराठ्यांची बखर, भाग २१, कलम ८ पहा. )

रामींत जानोजीची आहुती कधीं पडेल, व भोसल्यांस कधीं भाजीन असें अलीस होऊन गेलें होतें. तो योग अनायासेंच घडून आल्यामुळें, व त्यावेळीं पेशव्यांचा आणि निझामाचा स्नेहभाव असल्यामुळें, अलीनें दिवाणसाहेबांची रवानगी केली.

गोपाळराव, परशुरामभाऊ, रुन्कुद्दौला आदिकरून जवान सैन्यसमूह घेऊन कोठें बाहेर पडतात न पडतात तों काय बहार उडाला पहा! पटवर्धनमंडल छातीनें आणि उत्साहानें येत आहे, अशी बातमी पेशव्यांचे दरबारीं असलेल्या भोसल्यांच्या वकिलानें जानोजीस कळवितांच, भोसला भयभीत होऊन त्याची छाती दडपून गेली, आणि पटवर्धनसिंहांच्या केवळ गर्जनेनेंच धाबें दणाणून, जानोजीस जान जातो कीं काय अशी दहशत पडली व तो नागपुराकडे पळत सुटला !!!

पटवर्धनांच्या फौजेनें तोफांचा भडिमार करून भोसल्यांचा चांदा किल्ला सर केला आणि ते नागपुरकराचा पाठलाग करीत पंचवीस पंचवीस कोसांच्या मजला करीत चालले !

भोसल्यांची त्रेधा तिरपिटी उडून त्यांला कृतकर्माचा पश्चात्ताप होऊं लागला. पटवर्धनांनीं त्यांच्या सैन्यास जर्जर करून सोडिल्यामुळें, त्यांस 'दे माय धरणी ठाय' असें झालें; आणि ते सैरावैरा रानो-

माळ पळूं लागले ! कैक हत्तींचे डोळे फुटून ते चीं. चीं करीत भडकूं लागले ! घोडे लंगडे होऊन त्यांच्या राशीच्या राशी जागोजाग पडूं लागल्या ! बिचारे शिपायी लोक सपासप भाजीप्रमाणें कापले गेल्यामुळें त्यांचा पर्वतप्राय प्रेतराशि पडून चंद्रपूरच्या आसमंतात् भागाचा प्रदेश भयाण आणि भेसूर दिसूं लागला ! याप्रमाणें स्वपरबलाबल न जाणून थोराशीं स्पर्धा केल्यामुळें, व प्रसंगीं एकाएकीं धैर्य सोडल्यामुळें जानोजीची व त्याच्या सैन्याची वाताहत होऊन, तो सर्व प्रकार पंतांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणेः---

॥ हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ॥

असा झाला

आपल्या बरोबरचें सर्व सैन्य गतप्राण होऊन गेलें व अजून पेशव्यांचें सैन्य आपला पिच्छा सोडीत नाहीं असें पाहून जानोजी भोंसला आपल्या अबलख घोडीस टांच देऊन गोदेच्या* काठानें अत्यंत वेगानें एकटाच धांवत सुटला. गोपाळरावही आपल्या बंधुवर्गास व रुन्कुड्डीलाला मागें ठेवून भोसल्याला पकडण्याकरितां भरधांव घोडा टाकीत त्याचे मागें लागला.

जानोजी भोसला जीव घेऊन ससाप्रमाणें पुढें पळतो आहे, आणि पटवर्धन, सिंहाप्रमाणें गर्जना क-

रील त्याजवर झडप घालण्याकरितां मार्गें लगट करून पाठीस लागला आहे, हा हृदयंगम देखावा क्षणभर अवलोकन करण्याकरितां संपूर्ण सैन्यसमूह जागच्या जागीं चित्रासारखा तटस्थ उभा राहिला; आणि गोपाळरावांचा तो वेग, तें शौर्य, तो प्रोत्साह, व तें नृसिंहस्वरूप अवलोकन करून, हा भीष्मार्जुनांचाच संग्राम आहे कीं काय असा त्यास भास झाला आणिः—

॥ शांतनव सिंह गमला, पळतां नररथहि तो पळ ससाच॥

या उक्तीची त्यास स्फूर्ति झाली.

असो. याप्रमाणें भोसल्याच्या पाठीमागें लागलेला गोपाळराव पटवर्धन जानोजीला पिटाळीत धर्मपुरीवरून येलगड परगण्यांतून जात आहे इतक्यांत भोसला भयभीत होऊन दाट झाडीमध्यें शिरला व तह करण्याविषयीं त्यानें बोलणें लाविलें. तेव्हां माधवरावांची सल्ला घेऊन पेशव्यांस अनुकूल असा तह* जानोजीशीं ठरवून विजयी पटवर्धन सरदार परत आले, व भोसले नागपुरास निघून गेले.

---

* मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास—भोसल्याबरोबर लढाई—पान ४७-४८—अण्णासाहेब पटवर्धन मिरजमळेकर यांनी रचलेली बखर—भोसल्यावर स्वारी.

१ जानोजी भोसल्याबरोबर झालेल्या या लढाईंत वर लिहिल्याप्रमाणें सर्व पटवर्धन सरदार एक विलानें, व त्यांच्या

( पुढें चालू )

*भोंसल्याचा गर्व परिहार केल्यावर हैदरअल्ली-बरोबर पुन्हा झुंजण्याचा प्रसंग पटवर्धनांस लवकरच आला. हैदरअल्ली पराकष्ठेचा मानी, महत्वाकांक्षी, शूर परंतु अविश्वासी असल्याकारणानें, त्यानें पेशव्यांबरोबर केलेले तह सर्व झुगारून देऊन

---

( मागील पृष्ठावरून )

स्वामिभक्तीस योग्य, अशा निस्सीम एक निष्ठतेनें लढले असतां. डफ साहेबांनीं ' गोपाळराव, भोंसल्याशीं आंतून स्नेह ठेवीत होते ' असा आक्षेप आणला आहे. ( मराठ्यांची बखर, भाग २१, कलम ८ पहा ) ( व मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास, पान ४८, प्यारा २ रा पहा. )

* भोंसल्याबरोबर झालेल्या तहाचीं कलमें येणेंप्रमाणें:—

१ पूर्वी ८ लक्षांचा मुलूख भोंसल्याकडे होता तो पेशव्यांनीं परत द्यावा.

२ अक्कलकोटच्या फत्तेसिंग भोंसल्याचे जमीचा कांहीं वसूल येईल तोही पेशव्यांनीं द्यावा.

३ पेशव्यांच्या दरबारांतून कोणी रुसून आल्यास त्याला भोंसल्यानें आश्रय देऊं नये.

४ इंग्लिश, रोहिले, दिल्लीचा बादशाहा, अयोध्येचा नबाब, किंवा दक्षिणी सुभेदार यांतून कोणाशींच राजकारणी मसलत भोंसल्यानें करूं नये.

५ प्रत्येक पांचवे वर्षी भोंसल्यांनीं ५०००० १ रुपये पेशव्यांस देत जावें ( मरा. बखर, भाग २१, क० ८ )

* गोविंद हरि पटवर्धन यांस लष्करांतून आलेलीं पत्रें, अण्णासाहेबकृत बखर, मोडककृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास, पान ४८-५० व मराठ्यांची बखर, भाग २१.

पुन्हा जुलूम, अन्याय, आणि अनर्थ हीं सुरू केलीं. पेशव्यांस दिलेले मुलूख परत घेण्याकरितां त्यानें भगीरथ प्रयत्न सुरू केले. पेशवेसरकारांस सहाय करणाऱ्या संस्थानिकांच्या मुलुखांत त्यानें हलकल्होळ उसळून दिला. सावनूरकरांस, माधवराव बल्लाळ सहाय झाल्या कारणानें, इ० स० १७६४त झालेली मानखंडना हैदराच्या मनांत डाचत होतीच, तें उसनें कधीं फेडीन असें त्यास होऊन, इ० स० १७७० चे सुमारास हा हैदररूपी व्याघ्र सावनूरचे भोंवतीं मातक्यान् घिरट्या घालूं लागला !! व आपली फौज हळू हळू त्या प्रांतीं जमवूं लागला !

आपला अवाढव्य सैन्यसमुद्र घेऊन हा म्हैसूरचा मरद घाट चढून येतांच त्याच्या क्रोधरूप होमकुंडांत सेनापति घोरपड्यांचा मुलुख प्रथम वळी पडला. मुरारराव घोरपडे साडे तीन महिने मोठ्या निकरानें व शूरत्वानें गुत्ती किल्ल्यावर लढला; परंतु अखेरीस धान्याचा गल्ला खल्लास झाला, त्यामुळें हैदरअल्लीचा हल्ला असह्य होऊन किल्ला म्हैसूरकरांचे स्वाधीन करणें मुरारराव घोरपड्यांस भाग पडलें.

हैदरानें गुत्तीचा किल्ला सर केल्याची बातमी माधवराव पेशव्यांस कळतांच त्रिंबकराव विश्वनाथ याजबरोबर हुजूरची फौज देऊन पटवर्धन व आनंदराव

रास्ते यांस हैदरअल्लीवर चालून जाण्याचा श्रीमंतांकडून * हुकूम झाला.

---

* ह्या स्वारींत भोसल्यांस येण्याविषयीं माधवराव साहेब यांजकडून पत्र गेलें होतें. त्याप्रमाणें भोसल्यांनीं सर्व तयारी करून नागपुराहून ते निघाले; व पुढें पेशव्यांकडे त्यांनीं आपला वकील देवाजीपंत यास पाठविलें. देवाजीपंत पुण्यास आल्यावर त्यानें 'भोसले निघून दोन मजला आले आहेत, अशी वर्दी माधवराव पेशव्यांस दिली. ह्याच सुमारास दादासाहेबांबरोबर सखारामपंत बापू हे कैदेंत होते त्यांस भेटण्याकरितां श्रीमंतांची आज्ञा घेऊन देवाजीपंत गेले. देवाजीपंत बापूस भेटले त्यावेळीं सखाराम बापू लोडाशीं टेंकून बसले होते व जवळच उपाध्याय आणि कारकून बुदबळें खेळत होते, व श्रीमंतांकडील कारकून जवळच उभा होता. सखाराम बापूंचा व देवाजीपंतांचा नमस्कार चमत्कार झाला. परंतु पेशव्यांकडील मनुष्य जवळ उभा असल्याकारणानें विशेष बोलतां येईना. इतक्यांत सखाराम बापूंनीं खेळणारांपैकीं एकास डाव सांगितला कीं " त्यांच्या राजाकडील प्याद्याची चाल पुढें झाली आहे, करितां तुह्मीं आपला पुढें आलेला राजा दोन घरें मागें न्यावा." नंतर देवाजीपंतांनीं बापूंचा निरोप घेऊन ते निघून गेले.

माधवराव पेशव्यांनीं आपल्या कारकुनास विचारिलें कीं, देवाजीपंतांचीं व बापूंचीं कांहीं बोलणीं झालीं कीं काय? कारकुनानें उत्तर दिलें कीं नमस्कार नमस्काराशिवाय कांहीं एक भाषण नाहीं. बापू स्वस्थ लोडाशीं टेंकून बसले होते व खेळणारांस त्यांनीं एक डाव मात्र सांगितला कीं, "त्यांच्या राजाचें प्यादें पुढें आलें आहे, सबब तुह्मीं आपला राजा दोन घरें मागें न्या." हें कारकुनाचें बोलणें ऐकून घेऊन तें वाक्य एका कागदावर कारकुनाच्या सहीनिशीं लिहून घेतलें, व त्यास जावयास सांगितलें.

पुढें दोन दिवसांनीं नागपुराहून सरकारची डांक आली.

( पुढें चालू )

श्रीमंतांचें आज्ञापत्र येतांच परशुरामभाऊ, गोपाळराव गोविंद, वामनराव गोविंद, गंगाधर गोविंद, नीळकंठ त्रिंबक, आदिकरून पटवर्धनमंडल खंम ठोकून आपापल्या पथकांसह बाहेर पडले ! आमचें हें पटवर्धनचरित्र वीररसप्रधान असून तें वाचीत असतां दशरथपुत्र रामलक्ष्मणांची किंवा पंडुपुत्र भीमार्जुनांची आठवण झाल्याशिवाय आमच्या वाचकांस रहावयाची नाहीं. ह्या पटवर्धनघराण्याचा अवतारच स-

---

(मागील पृष्ठावरून)

त्यांत पेशव्यांकडील वकिलांनीं लिहिलें कीं 'भोसले दोन मजला गेले होते परंतु पुन्हा नागपुरास आले.'

हें पत्र पहातांच माधवराव पेशव्यांनीं देवाजीपंतांस बोलावून आणिलें व 'दोन मजला पुढें आलेले भोसले अद्याप कां आले नाहींत ?' असें विचारिलें. देवाजीपंतांनीं उत्तर दिलें कीं 'भोसले लवकरच येतील.' हें भाषण ऐकून पेशवा नखशिखांत लाल झाला आणि त्या कपटपटु देवाजीची एका हातानें शेंडी धरून दुसऱ्या हातांत असलेली समशेर त्याचे मानेवर ठेविली, आणि भयानक मुद्रेनें त्याजकडे अवलोकन करीत माधवराव साहेब बोलले कीं 'हें कृत्य तूं बापूंचे सांगण्यावरून केलेंस कीं नाहीं ?' जर करितां असत्य भाषण करशील तर ब्राह्मण न ह्मणतां जागच्या जागींच तुझा मुडदा पाडीन.' माधवरावांचे ते खदिरांगारासारखे लाल डोळे व त्यांचें भयंकर भाषण ऐकतांच देवाजी गर्भगळित झाला; व झालेली सर्व गोष्ट कबूल करून भोसल्यास निघण्याविषयीं पत्र लिहितों असें त्यानें माधवरावांपाशीं कबूल केलें, व हातापायांपडून आपला प्राण वांचविला !

पेशव्यांची बखर पान ९३-९४.

(पुढें चालू)

मशीर गाजविण्यासाठीं झालेला असून समरभूमीवर 'तूं अधिक कीं मी अधिक' अशी स्पर्धा ह्या भावाभावांची चाले! प्रौढप्रताप हामिलकार व त्याचा पराक्रमी पुत्र हानिबाल् ह्याप्रमाणें ह्या पटवर्धनघराण्यांत एकाहून एक वरचढ असे महाप्रतापी पुरुष अवतरले!!—धन्याची भाकरी खाऊन त्याची इमानानें चाकरी करावयाची—इतकेंच ते ओळखीत; आणि ती चाकरी करण्याचा समय आला म्हणजे कांकूं, किंवा नानू करण्याचें त्यांस कधींच ठाऊक नसे. ऐहिक सुखसोहाळ्यावर व संपत्तीवर लाथ मारून ते धन्याच्या जिवाला जीव देत!! ह्या पटवर्धनांस तलवार पाजळण्याचें जणु बाळकडूच असून स्पार्टन् माउली-

---

( मागील पृष्ठावरून )

ह्या वरील आख्यायिकेवरून माधवराव पेशव्यांची धूर्तता, व तापट स्वभाव हीं व्यक्त होतात. राघोबादादाशीं स्नेह ठेविल्यामुळें सखारामबापूंस जरी माधवरावानें कैदेंत ठेविलें होतें तथापि बापूंविषयीं पूज्य बुद्धि पेशव्यांचे मनांत कमी न होतां त्यांची धूर्तता व अक्कल हीं माधवराव पूर्णपणें ओळखीत होता. पेशव्यांनीं दिवसास राज्यकारभार हांकल्यावर रात्रीं बापूंची एकांतीं गांठ घ्यावी, व मोकळ्या मनानें राज्यप्रकरणीं हकीकत बापूंजवळ सांगून त्यांची सल्लामसलत घ्यावी व त्यांत हिताहिताची कोणती गोष्ट आहे ती पाहून त्याप्रमाणें दुसरे दिवशीं वर्तन करावें!! सखारामबापूंसारख्या धूर्त, शहाण्या, ( परंतु शत्रूस अनुकूल ) अशा मुत्सद्याच्या अनुमतानें बिनधोक राज्य हांकणारा माधवराव पेशवा, हाही किती चतुर पुरुष असला पाहिजे, ह्याचा विचार वाचकांनींच करावा.

प्रमाणेंच ह्या पटवर्धनांच्या वीरमातेचा आपल्या पुत्रांस हाच उपदेश असे कीं, 'बाबा मार किंवा मर, दोहोंतून एक कर ! ! !'

---

* पेशवाईंत स्त्रिया किती धारिष्टाच्या व हिय्याच्या असत, तें खालीं लिहिलेल्या एका प्रसिद्ध आख्यायिकेवरून वाचकांच्या लक्षांत चांगलें येईल.

पटवर्धनांप्रमाणें गोखल्यांचें घराणेंही शूरत्वाविषयीं नांवाजलेलें आहे, ही गोष्ट मशहूर आहेच. त्या गोखले घराण्यांतील प्रख्यात जो बापू गोखला, त्याचा चुलता धोंडोपंत गोखला हाही मोठा पराक्रमी पुरुष होता. ह्या धोंडोपंत गोखल्याला, धोंडी वाघ या नांवाचा कोणी एक बंडवाला पेशवाईंत धामधूम करीत होता, त्याला पकडण्याकरितां पेशव्यांनीं पाठविलें होतें. धोंडोपंत गोखल्यांनीं ह्या वाघाला बराच जर्जर करून सोडला. त्यावेळीं धोंडी वाघानें प्रतिज्ञा केली कीं, 'जर नांवाचा वाघ असेन तरच धोंडोपंत गोखल्यांच्या नरडीचा घोट घेईन व गोखल्यांच्या रक्तानें मी आपल्या मिशा रंगवीन ! !'

धोंडी वाघानें हा पण केल्यावर लवकरच त्याची व धोंडोपंत गोखल्यांची गांठ पडली. त्यावेळीं धोंडोपंतांचा पुतण्या बापू गोखला हाही त्यांबरोबर होता. वाघाची व गोखल्यांची बरीच चकमक झडली. त्यांत वाघाची पीछेहाट होण्याचा समय आला. इतक्यांत दुर्दैवेंकरून धोंडोपंत गोखल्यांचा घोडा एका झाडाच्या आड सरला, तों त्या झाडाची एक मोठी फांदी धोंडोपंतांच्या छातीला लागून ते तिरमिरीसरसे घेरी येऊन खालीं पडले. ही संधी साधून वाघाच्या टोळीनें गोखल्यांवर एकदम चाल केली व धोंडी वाघानें गोखल्यांचे छातीवर बसून तरवारीनें त्यांची मान कापली, आणि धोंडोपंत गोखल्यांच्या रक्ताचा घोट घेऊन व त्यांच्या रक्तानें आपल्या मिशा रंगवून जयजयकार करीत वाघ निघून गेला ! !

( पुढें चालू )

असो, पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणें पटवर्धन व रास्ते निघाले ते त्रिंबकराव विश्वनाथ यांच्या फौजेस व तोफखान्यास घेऊन कोपाळावरून सोंडुरास गेले, आणि तेथून शिवरुद्रावरून खालीं सावनुरावर उतरले. इतक्यांत श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे ३५००० निवडक स्वारांनिशीं म्हैसुराकडे वळून बाळापूर, कोल्हापूर, नंदगड, मनवगळ, बेंगळूर, चन्नपट्टण इत्यादि ठिकाणें त्यांनीं मोठ्या हिंमतीनें सर केलीं. माधवरावपेशव्यांसारखा हिंमतदार मोहोरक्या, आणि

---

( मागील पृष्ठावरून )

बापूगोखले, पवार वगैरे मंडळींचें वाघाच्या टोळीपुढें कांहीं न चालून त्यांस त्यावेळीं पळून जाणें भाग पडलें. नंतर त्यांनीं दादांच्या प्रेतास तेथें अग्नि दिला व मंडळी पुण्यास क्रिया करण्याकरितां आली.

बापूगोखले परत आल्यावर धोंडोपंतदादांच्या मरणाची बातमी त्यांची पत्नी लक्ष्मीबाई हिला कळली. त्यावेळीं ती संतप्त होत्साती बापूस ह्मणाली "धिःकार असो तुझ्या पुरुषार्थाला तूं कोणत्या तोंडानें क्रिया करावयास आलास? त्यांची क्रिया ह्यावेळीं मुदलींच करावयाची नाहीं, ज्या वेळीं त्या अधमाधम वाघाचें शीर कापून आणशील त्याच वेळीं क्रिया कर, तोंपर्यंत करूं नको" ह्याप्रमाणें वीरमातेची आज्ञा होतांच, बापू गोखले ईर्षेनें बाहेर पडले. पुढें लवकरच धोंडी वाघाची व बापूंची झकमक होऊन त्यांत धोंडी वाघ पडला. तेव्हां बापूंनी त्याचें मुंडकें भाल्याच्या टोंकाला लावून तें लक्ष्मीबाईकडे नेलें, तेव्हां मग दादांची क्रिया केली!! ( ऐतिहासिक गोष्टी भाग १ ला. )

कोण हें धारिष्ट! काय शिक्षण! अशा आया होत्या ह्मणूनच गोखल्यांसारिखे व पटवर्धनांसारिखे वीर निपजले.

पटवर्धनांसारखे शूर शिपायी, मग त्या स्वामिसेवकांच्या प्रतापसूर्यापुढें कोण दिपणार नाहीं? एवढा थोरला हैदर बहाद्दर, परंतु तोही माधवराव पेशव्यांच्या समोर येऊन सामना न करितां, आडून आडूनच गोळागोळी करी. हैदराच्या पायदळाचा पेशव्यांच्या स्वारांपुढें अगदीं टिकाव न लागतां, मराठ्यांच्या मोठ्या मारामुळें तें सैरावैरा पळत सुटे, आणि ह्यामुळें हैदराचा मुक्काम मराठ्यांच्या सैन्यापासून नेहमीं २० कोसांच्या छट्टयानें असे.

पटवर्धनांचीं पथकें आणि पेशव्यांची फौज एकामागून एक किल्ले सर करीत चालली. १८ पहाडी* किल्ले आणि २५ भुइकोट किल्ले माधवरावांच्या ताब्यांत आले. त्यांत नंदगड आणि बाळापूर हे दोन किल्ले बिकट असल्यामुळें, ते सर करण्यास बरेच प्रयास पडले. ह्या स्वारींत गोपाळराव गोविंद, परशुरामभाऊ व इतर भाऊबंद पटवर्धन ह्यांनीं हैदराच्या सैन्यास अत्यंत जर्जर करून सोडिलें.

पेशव्यांच्या पराक्रमी सैन्यापुढें आपली मात्रा कांहींच चालत नाहीं, आणि प्रत्येक वेळीं अपयश आपल्या वांट्यास येऊन एकामागून एक किल्ले पेशव्यांचे स्वाधीन होताहेत, हें पाहून हैदर अल्ली

---

* कर्नाटक संस्थानांच्या इतिहासांतील पटवर्धनांचें कथानक पान ४९-५०.

पिसाळलेल्या वाघाप्रमाणें अगदीं चवताळून गेला, आणि आपल्या ह्या दुर्दशेस, अपकीर्तीस व पराजयास विशेष कारणीभूत जे पटवर्धन, त्यांचे बारा वाजवीन तरच नांवाचा हैदर होईन, अशी त्यानें प्रतिज्ञा केली!

हा पण केल्यावर हैदरानें आपलें सैन्य दुसरीकडे फारसें न गुंतवितां, पटवर्धनमंडल एकटें गांठून ते गैरसावध असतील त्या वेळेस त्यांच्यावर अकस्मात् गफलतीनें छापा घालावा, अशी संधी तो पाहूं लागला. कारण त्याला हें पक्कें ठाऊक होतें कीं, जोंपर्यंत पेशव्यांचें व पटवर्धनांचें सैन्य एकत्र आहे, व पटवर्धन सावध आहेत, तोंपर्यंत आपली डाळ तेथें मुदलीच शिजावयाची नाहीं.

ही संधी हैदर अल्लीला बरेच दिवस सांपडली नाहीं. त्यानें गुप्त हेरांस निरनिराळीं रूपें देऊन पटवर्धनांच्या हालचालीची बातमी काढावी, दाट झाडीमध्यें आपल्या सरदारांस एकत्र जमवून वीर-श्रीच्या व मर्दुमकीच्या भाषणांनीं त्यांस उत्तेजित करावें, व कधीं कधीं आपला इष्ट हेतु सिद्धीस जात नाहीं म्हणून निराश व नाउमेद होऊन आदळ आपट करावी, केश तोडावे, दाढी उपटावी, आणि 'या अल्ला, या खुदा, कैसा बखत लाया' इत्यादि निरुत्साहाचे उद्गार काढावे!

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं

पटवर्धन भाऊबंदांचा मुक्काम पेशव्यांच्या सैन्यापासून बऱ्याच अंतरावर आहे, पटवर्धनांच्या सैन्याचा तळ बुदिविहाळाजवळ पडला असून, गोपाळराव, परशुरामभाऊ वगैरे सरदार आपापल्या डेऱ्यांत निद्रिस्त आहेत, मध्यरात्रीचा समय असल्यामुळें कांहीं निवडक स्वार मात्र संरक्षणाकरितां हिकडे तिकडे गस्त घालीत असून पटवर्धनांच्या सैन्यांत सर्वत्र सामसूम झाली आहे,—केव्हां केव्हां रात्रीचा किर्रशब्द, केव्हां गस्त घालणाऱ्या घोड्यांच्या टापा व स्वारांच्या म्यानाचा खण् खण् शब्द, केव्हां केव्हां निद्रिस्त लोकांचें घोरणें, हीं ऐकूं येत आहेत,—मधून मधून घोड्यांचें खिंसणें व हत्ती, उंट इत्यादि जनांवरांचीं ओरडणीं कानीं पडत आहेत—अशा रीतीनें पटवर्धन व त्यांचें सैन्य हीं गैरसावध आहेत ही बातमी काढून हैदरअल्ली कडलुराहून निघाला, व बरोबर १३००० गारदी, ४००० स्वार आणि २८ तोफा इतकें सडें सामान घेऊन, मजल दरमजल करीत पटवर्धनांच्या सैन्यावर त्यानें पांच घटका रात्रीं अकस्मात् छापा घातला, आणि एकदम तोफा डागण्याचा हुकूम फर्माविला ! !

असो, विश्वासघातानें हैदरअल्लीनें जी ही अकल्पित आग पटवर्धनांवर पाखडली, त्याविषयींचें हृदयद्रावक कथानक आतां पुढील भागावर ठेवूं.

# भाग चवथा.

## हैदरअल्लीबरोबर लढाया व त्या वेळचे भयप्रद प्रसंग.

मागें सांगितल्याप्रमाणें हैदरअल्लीनें पटवर्धनांवर गफलतीनें छापा घालून, एकदम तोफांचा भडिमार व बाणांची वृष्टि सुरू केली. आधींच काळोख मिट्ट, डोळ्यांत बोट घातलें तर दिसावयाचें नाहीं, तशांत धुरानें व धुळीनें आकाश व्याप्त होऊन पटवर्धनांच्या सैन्यांत एकच धांदल उडून राहिली. हैदराकडील चाऊल कळतांच भयसूचक शिंग एकाएकीं वाजूं लागून सैन्य एकत्र जमविण्याची नौबत—तुडुम् तुडुम्—असा जोरानें शब्द करूं लागली. 'गलीम आला रे आला' अशी एकच कुई होऊन जो तो घाबरेपणानें आपलीं हत्यारें व पोषाख गोळा करूं लागला. त्या वेळीं पटवर्धनांचें सैन्य फारच अव्यवस्थित होतें. कोणी घोड्यावर जीन घालूं लागला, कोणी हत्तीवर अंबारी व नौबत लादूं लागला, कोणी चिलखत चढवूं लागला, कोणी बंदुकी भरूं लागला, अशी धामधूम सुरू आहे तों हैदराकडील तोफांच्या भडिमारानें अनर्थापात माजला! कोणाचीं आंगें होरपळूं लागलीं, तंबूराहुट्यांस आगी लागून त्यांतून—भप भप—प्रचंड ज्वाळा निघूं लागल्या! कित्येक ठि-

काणीं आगीचा एकच डोम उसळला! कांहीं तंबु जळून खाक् झाले! हजारों सैनिकांचे बळी अग्निकुंडांत पडूं लागले! जिकडे तिकडे मेलों मेलों, भाजलों भाजलों, जळालों जळालों असा भयानक ध्वनि निघूं लागला! रणभूमीवर खाक झालेल्या प्रेतांचा सडा पडला!

*ह्या अग्निप्रलयांत पटवर्धनांची होळीच व्हावयाची, परंतु 'काळ आला होता, पण वेळ आली नव्हती' याच न्यायानें केवळ त्या दिवशीं त्यांच्यावर मोठी खैर झाली. हैदराकडील तोफांचे आवाज ऐकतांच गोपाळराव गोविंद, आनंदराव रास्ते वगैरे सरदार मंडळी घोड्यावर बसून प्रथम लष्करबाजाराचे अघाडीस येऊन उभे राहिले, व नौबतीचा आवाज ऐकून जसजसे लोक जमत तसतसें त्यांस उत्तेजन देऊन पुढें चाल करण्याविषयीं हूल चालविली. परंतु गम्मत अशी होई कीं, मिट्ट काळोखांत दुसरा कांहीं सुमार न सांपडल्यामुळें, केवळ नौबतीच्या आवाजाच्या धोरणावरच हैदर अल्ली कडील तोफांचा भडिमार विशेष होई, व त्यामुळें जसजसें पटवर्धनांचें सैन्य नौबतीजवळ जमे तसतसे त्यांतील लोक हैदराकडील गोळ्यांच्या वृष्टीनें पटापट मरून

* कर्नाटक संस्थानांच्या इतिहासांतील पटवर्धनांचें वृत्त, पान ५०-५२.

पडत; अशी नाइलाजाची गोष्ट होऊन पटवर्धनांस व रास्त्यांस गोळ्यांचा मार सोशीत निमूटपणें उभें रहावें लागलें ! गोपाळरावांचें आंग तोफेचा गोळा उसळून बरेंच भाजलें, परंतु जिवास धक्का बसला नाहीं. माधवराव* कृष्ण पटवर्धनांच्या घोड्याच्या चिंधड्या उडाल्या, व मंगळवेढेकर हेही लढाईंतील तोफेच्या गोळ्यानेंच भाजून मेले. परशुरामभाऊंवर दोनदां बाणांचा व गोळ्यांचा भडिमार झाला, परंतु दोन्ही वेळां 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीप्रमाणें घोडे मात्र जळून खाक झाले, भाऊंचें आंग पुष्कळ होरपळून गेलें, परंतु खासा स्वारीच्या जिवास अपाय न होतां ते जवळच्या एका घोड्यावर बसले, आणि 'शत्रूला पाठ न दाखविणें' हें जें क्षात्रधर्मास सर्वथैव युक्त कर्म, तें आचरून स्वतःच्या वेदनांकडे लक्ष न देतां, 'हिम्मत मरदा मदत खुदा धीर धरा धीर धरा' अशीं वीरश्रीचीं भाषणें करीत हा पुरुषसिंह, तोफांच्या भडिमारांत व बाणांच्या वृष्टीमध्यें, सिंहनाद करीत राहिला !!!

कोण धारिष्ट ! काय शौर्य ! ! प्रत्यक्ष डोळ्यापुढें भाऊबंदांची आहुती समराग्नींत पडत आहे—हत्ती, घोडे, उंट, इत्यादि जनावरांचे पर्वतप्राय ढीग खाक

* हे कृष्णंभटजींचे चिरंजीव ह्मणजे भाऊंचे सख्खे चुलत बंधु असावेत.

होऊन पडले आहेत— आक्रोश, आक्रंदन, आणि आरडाओरड ह्यांच्या योगानें दश दिशा दणाणून गेल्या आहेत! अग्नियंत्राच्या भडिमारानें व बाणांच्या अमोघ वृष्टीनें मर्मस्थानें दग्ध होऊन प्राण व्याकूळ होत आहेत! अशा वेळीं बालाग्र न डगमगतां विश्व भक्षक काळाच्या जबड्यांत उडी टाकण्यास सिद्ध झालेल्या परशुरामभाऊंच्या तोंडांतून 'हिम्मत मरदा मदत खुदा, धीर धरा धीर धरा' अशीं वीरश्रीचीं अक्षरें ! ! ! धन्य त्या पटवर्धनवीरांची ! शाबास त्या वीरमातेची कीं, जिच्या उदरीं असा प्रतापी पुत्र अवतरला. परशुरामभाऊंचें हें साहस वाचीत असतां प्रख्यात जॉन् काक्रनाच्या शौर्याची आठवण झाल्या-शिवाय रहावयाची नाहीं. अशा एकनिष्ठ शूर सेव-काला लक्षून एका कवीनें ह्मटलें आहेः—

॥ स्वसुखनिरभिलाषः खिद्यते स्वामिहेतोः ॥

असो. याप्रमाणें अविश्वासानें व अनीतीनें, मध्य-रात्रीं पटवर्धनांच्या मानेवर हैदरानें तलवार ठेविली असतांही त्यांनीं सुतराम् न डगमगतां, खऱ्या क्षत्रि-यास योग्य असेंच आचरण केलें, हें त्यांस अत्यंत भूषण होय; व ह्या आचरणानेंच त्या दिवशीं पटवर्धनांची थोडीबहुत बाजू राहिली. मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत हैदराकडील बाणांची महावृष्टि होत असून पहाटच्या सुमारास अवशिष्ट सैन्याची कत्तल

उडवावी, व राहिलेल्या पटवर्धनबांधवांस कंठस्नान घालावें, या हेतूनें दिन् दिन् शब्द करीत हैदरअल्ली स्वकीय सैन्यासहवर्तमान मोठ्या वेगानें येऊं लागला; परंतु आपण मोठी चूक करीत आहों, असें त्यास लवकरच दिसून आलें. कारण कीं, पटवर्धनांच्या सैन्यांत पहातो तों—भयानक प्रेतराशींतून धुराचे लोटचेलोट जरी बाहेर पडत आहेत, बाजारबुणगें समरांगणांत नसून पटवर्धनांच्या लोकांची जरी पुष्कळ वाताहत झाली आहे, तथापि एकंदर सैन्यसमूहाचा बराच भाग सुरक्षित राहिला असून शत्रूकडील तोफा डागण्याचें काम हिमतीनें व झपाट्यानें चाललें आहे, परशुरामभाऊ, गोपाळराव वगैरे पटवर्धनमंडळ सुरक्षित असून ते सर्वजण विजलीसारखे चमकत आहेत, स्वकीय सैन्यास उत्तेजित करीत असून बाणांची अमोघ वृष्टि आपल्या सैन्यावर होत आहे व आपलीही बरीच नासाडी झाली आहे—हा प्रकार पहातांच हैदरअल्लीची कंबर खचली आणि पटवर्धनांवर चालून जाण्याचा बेत रहित करून त्यानें पूर्ववत् गोळागोळीच सुरू केली. पटवर्धनांकडूनही गोळ्यांचा भडिमार जारीनें होऊं लागला.

हा प्रकार तिसरे प्रहरपर्यंत चालला. नंतर पटवर्धनांच्या काळजामध्यें समशेर भोंसकण्याचा अवसर सांपडत नाहीं, हें पाहून हैदरअल्ली हिर्मुष्टलाहोऊन

कडूराकडे सैन्यासह निघून गेला. व पटवर्धनसरदारही, जामदारखाना सुरक्षित राहिला होता तो घेऊन पेशव्यांस येऊन मिळाले. ह्या लढाईत पटवर्धनांचा पुष्कळ नाश झाला. गोपाळरावांचे नामी नामी असे ८० घोडे *जळून गेले, व कोतवाल हत्तीच्या ठिकऱ्या उडाल्या. हैदरअल्लीचीही पुष्कळ धुळधाणी झाली. माधवरावकृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर ह्यांच्या मृत्यूनें पटवर्धनांची मोठीच हानी झाली. तथापि ह्या म्हैसुरकरांच्या समरयज्ञांत सर्व पटवर्धनांचाच स्वाहाकार होण्याचा योग आला असतां, ते सर्व सुरक्षित राहून एका मंगळवेढेकराचाच बळी पडला ही महदाश्चर्याचीच गोष्ट होय !

हैदरअल्लीच्या ह्या अकल्पित छाप्यामुळें पटवर्धनांची जी ही दुर्दशा झाली, त्या दुर्दशेस कांहीं अंशीं तेच कारणीभूत होते, असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे, तें आह्मांसही रास्त दिसतें. कारण पेशव्यांची व हैदराची कैक दिवस जुंपून राहिली असून उभयपक्षांच्या चकमकी जागोजाग झडत होत्याच; असें असतां पटवर्धनसरदार नेहमींप्रमाणें सावध न रहातां, ह्याच प्रसंगीं दुर्दैवानें ते अव्यवस्थित राहिले, ही

* कर्नाटक संस्थानांचा इतिहास-पटवर्धनांचें कथानक-पान-५१-५२.

त्यांची मोठी चूक होती, असें कोणीही मनुष्य प्रांजलपणें कबूल करील.

* अव्यवस्थितपणाचा दोष पटवर्धनांस देणें, हें ज्याप्रमाणें वाजवी ठरतें, त्याप्रमाणेंच हैदरासारख्या शूर ह्मणविणाऱ्या पुरुषानें पटवर्धनांवर छापा घालून त्यांस मारण्याचा जो यत्न केला, तसा यत्न करणें खऱ्या वीरास सर्वथैव निंद्य होय, हें ह्मणणेंही अगदीं यथान्याय दिसतें. कारण गफलतीनें नरडीला नख देणें हें मरदाचें शील नव्हे, नामर्दाचें होय. खऱ्या वीरानें समरांगणीं समशेर गाजवूनच मारलें पाहिजे किंवा मेलें पाहिजे. विश्वासघातानें उन्नति करणाऱ्या पुरुषांचा पोवाडा स्तुतिगायक इतिहासकार गातील तर खुशाल गावोत, परंतु निःपक्षपाती इतिहासकारांनीं अशा बाहदरांस नामर्दपणाचाच दोष देणें रास्त आहे. अस्तु.

पटवर्धन व पेशवे यांची फौज एकत्र होतांच दगलबाज हैदरास योग्य बक्षिस देण्याची त्यांनीं कडेकोट तयारी केली. त्रिंबकराव विश्वनाथ, आनंदराव रास्ते, परशुरामभाऊ पटवर्धन, त्रिंबकराव मामा आदिकरून वीरवरांस वीरश्री चढून, त्यांच्या सैन्यसमूहांत समरोत्साह जिकडे तिकडे दिसूं लागला,

---

* कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास. हैदराबरोबर लढाई. पान ५१—५२.

आणि गलिमांच्या रक्तानें आपल्या समशेरी केव्हां माखूं असें त्यांस होऊन गेलें.

मराठ्यांचा सैन्यसमूह आपल्या जयशाली सेनानायकानें भूषित होऊन दिग्विजयास बाहेर पडणार इतक्यांत एक अपरिहार्य संकट ओढवलें. तें असें कीं श्रीमंत माधवरावसाहेब पेशवे यांस ‘ राजयक्ष्मा ’* या नांवाचा दुर्धर रोग होऊन प्रकृति बेताल होत चालली. त्यामुळें नाइलाजाची गोष्ट होऊन ‘ आपल्या हातून हैदरअल्लीवरील मोहीम शेवटास जात नाहीं ’ म्हणून श्रीमंत कष्टी झाले, व संपूर्ण फौजेचा अधिकार त्रिंबकराव मामा, पटवर्धन भाऊबंद व रास्ते सरदार यांस देऊन पेशव्यांची स्वारी कृष्णातीराहून परत पुण्याकडे फिरली.

पेशवे परत फिरले तथापि पटवर्धनमंडल व त्रिंबकराव मामा यत्किंचित न डगतां आपल्या विस्तीर्ण सैन्यसमुद्रासह ते घे—घे—करीत हैदरामागें लागले. †प्रथम जानोजी धुळप याचा किल्ला १५०० गार्दी, २००० प्यादे, ७०० स्वार आणि ३ तोफा इतक्या सरंजामानिशी हैदरअल्लीनें १३ दिवसपर्यंत घेरला

---

* पेशव्यांची बखर पान १०३–१०४ आणि कर्नाटक प्रांतांतील राज्यांचा इतिहास, उत्तरार्ध भाग २, पान ५२.

† कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पटवर्धन सरदार—पान ५२–५३–५४.

होता; त्या सैन्यावर परशुरामभाऊ व गोपाळराव पटवर्धन बांधवासह पडतांच, त्यांनीं हैदराच्या फौजेचा धुव्वा उसळून दिला. पटवर्धनांचें सैन्य यावेळीं फार नसून तिन्हीं पथकांतील मिळून ८०० स्वार मात्र होते. तथापि अघाडीच्या टोळीनें विलक्षण शौर्य दाखविल्यामुळें हैदराच्या गारद्यांचा सप्पा उडून गेला. पटवर्धनांनीं ह्यावेळीं त्रिंबकराव मामांची व रास्त्यांची फौज येण्याची वाट न पहातां स्वतंत्र रीतीनेंच हैदरावर चाल केली होती, तथापि त्यांस यश प्राप्त होऊन हैदरअल्लीच्या छाप्याबद्दल पटवर्धनांनीं त्यास पूर्ण प्रायश्चित्त दिलें ! त्यांनीं हैदरअल्लीचा गोट लुटून फस्त केला ! किल्लया भोंवतालचा प्रदेश रक्तस्रावानें आरक्त होऊन गेला ! चोंहोंकडे यवनांचीं मुणकींच मुणकीं होऊन गेलीं. हैदराचा बेइमानपणा पटवर्धनांचे पोटांत डांचत होताच. ह्यामुळें त्यांनीं म्हैसूरकरास ह्यावेळीं, खूपच हात दाखविला. हैदराकडील महान् महान् ४०० शें योद्धे त्यांनीं कापून काढले, ५०० स्वार समरांगणीं जायबंदी करून सोडिले. त्याप्रमाणें चार तोफा, ५०० घोडे काबीज करून हैदराकडील सांपडलेली पुष्कळ लूट पटवर्धनांच्या तिन्हीं पथकांनीं वांटून घेतली.

ह्या लढाईंत पटवर्धनांकडील फक्त ५० माणसें जखमी झालीं, व यशवंतराव घाडगे कुमठेकर सरं-

जामी, हे लढाईंत मारले गेले. ह्याशिवाय दुसरें नुकसान कांहीं एक झालें नाहीं.

इतका वेळपर्यंत पटवर्धन वगैरे योद्ध्यांस एकट्या हैदराबरोबरच झुंजावयाचें होतें; परंतु धुळपाच्या किल्ल्यावर हैदराच्या सैन्याची पटवर्धनांनीं नासाडी केली, हें ऐकून हैदराचा महापराक्रमी व क्रूर पुत्र जो टिपू सुलतान तोही आपल्या पित्यास साहाय्य करण्याकरितां येऊन मिळाला.

टिपू व हैदर हे एकत्र झालेले ऐकतांच पटवर्धनमंडल व त्रिंबकराव मामा त्या पिता पुत्रांवर एकदम चाल करून गेले. पटवर्धनानीं राजापूर व राचिटी हीं ठाणीं सर करून घेतलीं! चांभारटेंकडीचा बळकट पहाडी किल्ला तोफांच्या भडिमारानें काबीज केला! त्याप्रमाणेंच गुरुमकोंडा किल्ल्यावरही पेशव्यांचें निशाण चढलें!!

अशा रीतीनें हैदर अल्लीकडील ठाणीं एकामागून एक घेऊन पटवर्धन-सरदार आपल्या धन्याची सलाबत सर्व कर्नाटकांत बसवीत आहेत, इतक्यांत परशुराम भाऊंचे चुलत बंधु गोपाळराव गोविंद यांची प्रकृति अकस्मात् नादुरस्त झाली. ह्मणून युद्ध संग्रामाची सर्व कामगिरी आपल्या बंधुवर्गावर सोंपवून २००० स्वारांनिशीं ते मिरजेस आले; व घरीं पोहोंचल्यावर तिसरे दिवशीं ह्मणजे ई० स० १७७१

त माघ शुद्ध १३ चे दिवशीं पटवर्धन कुलांतील ह्या महान् पराक्रमी पुरुषाचा उदराच्या भावनेनें काळ झाला.

---

* गोपाळराव गोविंद पटवर्धन हे मिरजेस मृत्यु पावले, याची वार्ता पुण्यामध्यें माधवराव पेशवे यांस कळतांच त्यांना अवर्णनीय दुःख वाटलें. त्यांनीं दुःखशमनार्थ मिरजेस व लष्करांत पटवर्धनांकडे पत्रें पाठविलीं. त्यांपैकीं परशुरामभाऊ आदिकरून पटवर्धनांस लष्करामध्यें, चंद्र २५ जिलकादचें जें पत्र पेशव्यांनीं पाठविलें, त्यांतील मजकूर वाचकांकरितां पुढें देतों. त्यावरून पटवर्धनांसारखे एकनिष्ट वीरवर, पेशव्यांस किती प्रिय असत, त्यांस दुःख झालें असतां पेशव्यांचा जिव्हारा कसा होरपळून जाई, व आपल्या सरदारांस निरंतर खुष ठेऊन त्यांचे कडून हिंमतीचीं कामें करून घेण्याचें अजब कसब माधवराव पेशव्यांचे अंगीं किती पूर्णपणें वसत होतें ह्या सर्व गोष्टी पुढील पत्रावरून स्पष्ट होतील:—

"राजश्री + +पटवर्धन सरदार सरसुभे प्रांत कर्नाटक गोसावी यांस.—

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य... स्नेहांकित माधवराव बल्लाळ पंत प्रधान आशिर्वाद विनंती विशेष—गोपाळराव गोविंद यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं एकनिष्ठेनें व प्रीतीनें सेवा अधिकाधिक केली. श्रीमंतांची कृपा संपादून मोठ्या योग्यतेस पोहोंचले. मातबर सरदारांत त्यांची गणना होऊन ते आबाद होत गेले. असो; झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. सरदारीचा बोजा आतां तुह्मांवर; धन्याची कृपा आतां तुह्मांवर, तुह्मीं सेवाचाकरी करून राखाविण्यास योग्य आहां. तुमचे इच्छेचा व मेहेनतीचा सर्व प्रकार त्रिंबक विश्वनाथ यांणीं लिहिल्यावरून कळून आला आहे. अतियास, प्रथमापासून सेवा होत आली त्याहून तुह्मीं अधिक कराल ही तुमची उमेद आहेच. हैदरखान या वेळेस आला आहे. चांगली सावधगिरी व खबरदारी ठेवून अ-

(पुढें चालू.)

रामचंद्र रावांच्या मृत्युमुळें जो प्रसंग वयोवृद्ध हरभटजीवर पडला होता, तोच प्रसंग गोपाळरावांच्या मृत्युमुळें प्रस्तुत त्यांचे तीर्थरूप गोविंद हरी यांजवर पडला. पुत्रशोकानें उतारवयी गोविंद हरि अत्यंत क्षीण व दुःखाकुल झाले, व त्यांचें पुढें लवकरच देहावसान होऊन त्यांचेबरोबर त्यांची महासाध्वि स्त्री, पातिव्रत्यास अनुसरून सती गेली ! !

गोविंद हरींच्या ( काकांच्या ) मृत्यूची हृदयभेदक *वार्ता लष्करामध्यें परशुरामभाऊंस कळतांच त्यांस अवर्णनीय दुःख झालें; परंतु हें पटवर्धन कुल शोक करण्यास किंवा हायहाय घेऊन हात टेंकण्यास अवतरलें नसल्यामुळें, परशुरामभाऊ, वामनराव गोविंद, नीलकंठ त्रिंबक आदिकरून बांधवांनीं व्यामोह टाकून दिला, भ्रातृशोक, सर्व गिळून जाऊन अपरिहार्य आणि असह्य अशा वियोगजन्य दुःखाग्नीचें केवळ विवेकरूप जलवृष्टीनेंच त्यांनीं उपशमन केलें, आणि

( मागील पृष्ठावरून. )
शा शत्रूचें निर्नाम करून संतोषाचें वर्तमान हुजुर लिहिणें हेंच तुमच्या कर्तव्याची तारीफ मशारनिल्हे वारंवार लिहित आहेत तें करणें." कळावें हे आशिर्वाद.

* गोविंद हरींच्या मृत्यूचे वेळीं श्रीमंत माधवराव पेशवे ह्यांनीं पटवर्धनास दुःखप्रदर्शक 'चंद्र १ रमजानचें जें' पत्र पाठविलें आहे तें वाचण्यासारखें आहे. पटवर्धनांनीं आपल्या दुःखाचा उपशम विवेकानें करावा अशाविषयीं श्रीमंतांनीं चांगला उपदेश त्या पत्रांत केला आहे.

"सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण ॥
जोंवरि हा प्राण जाय त्याचा ॥ १ ॥"

——या उक्तीस अनुसरून पंत प्रधानांच्या आज्ञेप्रमाणें हैदरअल्लीच्या छातीवर पाय देण्यासाठीं त्या पटवर्धन—वीरमण्यांनीं पुनश्च कंबरा बांधल्या ! !

आतां ह्या हैदरअल्लीवरील मोहिमेचें कथानक पुढें चालविण्यापूर्वी, परशुरामभाऊंचे ज्येष्ठ भ्राते जे गोपाळराव गोविंद पटवर्धन, ह्यांच्या मृत्यूमुळें आमच्या विषय—नायकाचे स्थितींत कोणती तफावत झाली, व ह्यापुढें चरित्रचित्रांत कोणकोणते भाग आतां प्रधानत्वेंकरून दृष्टिगोचर होत जातील ह्याविषयीं येथें दोन शब्द लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं.

येथपर्यंत परशुरामभाऊ व गोपाळराव या शूर भावांनीं आपल्या गोत्रजांसह कोणकोणतीं शौर्याचीं कृत्यें केलीं, व गोविंद हरींच्या उतार वयांत त्यांच्या पुत्रानें व पुतण्यानें कीर्तिध्वज कसा एकसारखा फडकावीत ठेवला, ह्याविषयींची हकीकत आह्मीं आपल्या वाचकांस विदित केली. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें उभयता पितापुत्रांचा भूमंडलावरील अवतार इ. स. १७७१ त संपल्यामुळें त्यांचे मागें वयानें, मानानें, शूरत्वानें व कर्तबगारीनें पटवर्धनकुलांत श्रेष्ठ जो परशुरामभाऊ, त्यांचेंच वृत्त ह्यापुढें

आह्मांस मुख्यत्वें करून द्यावें लागेल. गोपाळरावांच्या मागें आपल्या बंधुवर्गांत प्रमुख होऊन पटवर्धन वंशांत विशेष रीतीनें गाजलेला हाच पुरुष श्रेष्ठ होय. शिवाय पेशव्यांच्या घराण्यांत पुढें लवकरच जो प्रचंड कलहाग्नि भडकला, कीं ज्या कलहाच्या योगानें संपूर्ण पेशवाईत धामधुम सुरू होऊन, भरतखंडाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हजारों उलाढाली झाल्या व जबरदस्त फेरफार झाले, त्या प्रत्येक उलाढालींत व हरएक फेरफारांत परशुरामभाऊ पटवर्धन ह्या एकनिष्ठ शूर सरदाराचेंच प्रधानपात्र असून कांहीं कालपर्यंत तर तो राज्यसूत्राचाही चालक होऊन बसला होता. ह्यामुळें ह्यापुढें येणारें कथानक विशेष महत्वाचें असून त्यांत पेशवाईत घडलेल्या घडामोडी व त्यावेळीं परशुरामभाऊंनीं दाखविलेलें शौर्य, सौजन्य, सत्यप्रियत्व, स्वामिभक्ति आणि शहाणपण इत्यादि गोष्टींचें वर्णन क्रमशः वाचण्यांत येईल. इतकें सांगून आह्मीं आतां हैदरावरील स्वारीचा वृत्तांत पुढें चालवितों.

थेऊर मुक्कामीं माधवरावसाहेबांची प्रकृत दिवसेंदिवस अधिकाधिक रोगग्रस्त होत असल्यामुळें, व हैदरअल्लीशीं होत असलेला भयंकर युद्धसंग्राम कैक महिने एकसारखा चालत असल्यामुळें, श्रीरंगपट्टणावर एकच मोठा हल्ला करून हैदराचें निर्नाम करावें,

आणि पुण्यास श्रीमंतांच्या* भेटीस जावें, असा परशुरामभाऊ व त्रिंबकराव मामा यांणीं बेत केला. व त्याप्रमाणें आनंदराव रास्ते, नीलकंठ त्रिंबक, वामनराव गोविंद, गंगाधरराव गोविंद, रघुनाथराव नीलकंठ, मुरारराव घोरपडे, जानोजीराव धुळप इत्यादि वीरवरांसहवर्तमान पेशव्यांचा सैन्यसमुद्र म्हैसूरच्या राजधानीकडे लोटत चालला ! !

भाऊ व मामा आपल्या सैन्यासह श्रीरंगपट्टणावर येत आहेत हें पाहून हैदरअलीही आपल्या जय्यत फौजेनिशीं पटवर्धनांबरोबर सामना करण्याकरितां मोठ्या त्वेषानें बाहेर पडला. त्या उभयतां वीरमहावीरांची गांठ †मोतीतलावावर पडली. मामांनीं पेशव्यांकडील सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळीचें आधिपत्य परशुरामभाऊ व त्यांचे बांधव ह्यांनीं स्वीकारिलें, दुसरीवर त्रिंबकराव मामा, आणि तिसरी टोळी कृष्णराव बळवंत यांचे ताब्यांत दिली. अशा रीतीनें सर्व सैन्याची योग्य शिस्त लावून हैदराचें सैन्य कांहीं अंतरावर आहे इतक्यांत पेशव्यांच्या सैन्यानें त्याजवर एकदम तोफा सुरू केल्या. हैदरअली व त्याचा पराक्रमी पुत्र टिपू ह्यांनींही आ-

*थोरले माधवरावसाहेब यांस 'रावसाहेब' असेंही ह्मणत.

† पटवर्धन सरदारांचा इतिहास—(कर्नाटक संस्थानांचा इतिहास उत्तरार्ध भाग २ रा).

पल्या सैन्यास उत्तेजित करून बाणांची व गोळ्यांची वृष्टि अनिवार चालविली.

उभयसैन्यांचा रणसंग्राम मोतितलावावर भयंकर माजला. पेशव्यांकडील स्वारांची मांड एकदम चढाव करून गेली. घोड्यांच्या टापांनीं, खिंकाळण्यांनीं आणि तोफांच्या भडिमारांनीं दशदिशा दणाणून गेल्या! आकाश पाताळ एक होऊन गेलें! पेशव्यांचें सैन्य 'हरहर महादेव' असा सिंहनाद करीत अलीच्या सैन्य समुद्रावर तिरा सारखे-घे-घे करीत तुटून पडलें. उभयपक्षाकडील सैन्यें हातघाईवर येऊन शेंकडों माणसें पडूं लागलीं. सर्वत्र रक्तस्राव आणि प्रेतराशि दिसूं लागला. दोहोंकडील योद्धे युद्ध—कुशल असून सैन्याची तयारीही जय्यत, मग त्या धीररणधीर लढवय्यांच्या झटापटींत कोणकोणास लवकर हार जाणार? हा यवनांचा व हिंदूंचा समर—प्रसंग सारखा चार दिवस अहोरात्र चालला होता!! परशुरामभाऊंनीं ह्या लढाईंत आपल्या युद्धकौशल्याची व बाहुबलाची कमाल करून सोडिली. भाऊंनीं करोलसह घोडे चालवून हैदराच्या सैन्यास त्राहि त्राहि करून सोडिलें. त्यांनीं आपल्या बंधुजनास व सैन्यसमुदायास वारंवार उत्तेजन देऊन अनुभवशीर व खऱ्या हिम्मतदार सेनानायकाची समशेर किती अजब करतबगारी करते, ह्याची

प्रचीती सर्वांस आणून दिली. ह्याप्रसंगीं पटवर्धन वीरांनीं आपली तलवार इतक्या सफाइनें चालविली कीं, एक त्रिंबकरावमामाच भाऊंच्या हस्तकौशल्यानें थक्क झाले नसून, परशुरामांच्या परशुप्रहारानें कासावीस झालेला हैदरबहादरही भाऊंचें अमोघ सामर्थ्य पाहून तोंडात बोट घालून राहिला !

ह्याप्रसंगीं त्रिंबकरावमामा आणि कृष्णराव धायगुडे ह्यांनींही आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावलें.

कृष्णरावांनीं आपल्या सेनावलयाचा गर्रकन् दिलेला गराडा हैदराच्या सैन्यापासून चारी दिवस हालविला नाहीं. ह्यामुळें मोतितलावावरून हैदरअल्लीला आपलें सैन्य बाहेर काढतां न येऊन त्याला अघाडीस परशुरामभाऊंचा मार सोसावा लागला, व पिछाडीस त्रिंबकराव मामांचा तोफा डागण्याचा झपाटा सुरू असल्यामुळें त्याच्या सैन्याची मागची बाजू जळून खाक होऊं लागली ! अशा रीतीनें आपण अगदीं कोंडले गेलों आहों हें पाहून हैदरअल्ली फार घाबरून गेला; आणि आपले कडील हजारों * लोक माती खात पडले असून पेशव्यांच्या तिन्ही टोळ्यांतील लोक जोरावर आहेत, असें पाहून ते

* ह्या लढाईंत हैदराचें अतिशय नुकसान झालें. त्याचा सर्व तोफखाना, हत्ती, निशाणें, हौदे, घोडे, खजीना व जवाहीर हीं शत्रूचे हातीं लागलीं. हैदराचे १९०० स्वार ठार झाले, व कित्येक सरदारही पेशव्यांचे हातीं सांपडले.

उभयतां म्हैसूरकर पितापुत्र २५ स्वारांनिशीं धायगुड्याची फळी फोडून श्रीरंगपट्टणास जीव घेऊन पळाले, व दांतीं तृण धरून त्रिंबकरावमामाबरोबर त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. हा प्रकार फाल्गुन वद्य ७ रोजीं घडला.*

हैदरअल्ली आपणास शरण आला आहे त्याअर्थी आतां त्याच्यावर शस्त्र चालविणें न्याय्य नाहीं, असें जाणून भाऊ व मामा हे तह करण्यास मान्य झाले; त्यांनीं लढाई तहकूब करून श्रीरंगपट्टणाच्या पश्चिमेस कावेरीच्या उत्तरतीरीं स्वकीय सैन्याचा तळ दिला, व तहाच्या अटी हैदराकडे कळविल्या.

हैदरअल्लीच्या नेहमीच्या वर्तनाप्रमाणेंच ह्यावेळींही त्याची 'वचस्येकं मनस्येकं' अशींच वागणूक होती. कृत्रिम, कौटिल्य, आणि कापट्य ह्या दुर्गुणांचा केवळ मूर्तिमंत पुतळाच बनलेला हैदर बहादर बोलल्या

* ह्याच लढाईंत परशुरामभाऊंचे दुसरे चुलत बंधु जे नीलकंठ त्रिंबक कुरुंदवाडकर, हे शत्रूंशीं झुंजत असतां छातींत गोळी लागून ठार झाले ! स्वामिकार्यार्थ ऐन समरंगणांत समरदेवतेला देह अर्पण करणारा पटवर्धनकुलांतील हा तिसरा पुरुष होय ! पटवर्धनकुलांतील प्रत्येक पुरुष तरवार गाजवून लढाईंत, किंवा लढाईच्या संबंधानें मृत्यु पावला ! मोतितलावावरील लढाई झाल्यावर पुढें ५।६ दिवस लढाई तहकूब होऊन, तहाचें बोलणें घाटत होतें, तितक्या अवकाशांत कावेरी तीरीं जाऊन पटवर्धनांनीं नीळकंठरावांचें उत्तरकार्य उरकून घेतलें ! ! कर्नाटक संस्थानांचा इतिहास–उत्तरार्ध–भाग २–पान ५६.

बोलास कोठून जागणार? ह्या लढाईंत त्याची इतकी फटफजिती व इतकें नुकसान झालें असतांही बोललेल्या गोष्टीस हरताळ लावून त्यानें तहाच्या यादीस बत्ती दिली, आणि "स्वभावएवात्र तथातिरिच्यते । यथा प्रकृत्या मधुरं गवां पयः ॥ १ ॥" या वचनाप्रमाणें संवत्सरप्रतिपदेचे दिवशीं रात्रौ त्रिंबकराव मामा भोजन करून स्वस्थ बसले असतां, ह्या कपटपटूनें मामांच्या गोटावर पट्टणाहून तोफांचा भडिमार केला!!

परशुरामभाऊ आदिकरून पेशव्यांकडील मंडळी हैदराचा स्वभाव पूर्णपणें ओळखून होतीच. त्यांनीं हैदरअलीचा हा निमकहरामपणा पाहून पुनः त्याजबरोबर लढाई सुरू केली. परशुरामभाऊ, त्रिंबकराव मामा, व आनंदराव रास्ते ह्या मूर्तित्रयानें कावेरीच्या पैलतीरानें जाऊन हैदराची कही येत होती ती मार्गांतल्या मार्गांतच ठार केली, आणि श्रीरंगपट्टणचा किल्ला उजवा टाकून म्हैसूरच्या महिषाचा बळी पाडण्याकरितां त्या तिन्ही होत्यांनीं प्रचंड समरयज्ञ आरंभिला!

* चैत्र शुद्ध १ देपासून मराठ्यांची व हैदरअलीची पुनः निकराची लढाई सुरू झाली. श्रीरंगपट्ट-

* मोतीतलावावरील लढाई—पट्टणचा वेढा—कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पान ५६—५७.

णचा किल्ला मजबूत असून हैदराकडील ३००० स्वार व १००० पायदळ, शिवाय गारदी ह्यांची जय्यत कडेकोट तयारी, त्यामुळें पट्टणकिल्ला लवकर स्वाधीन होईना. परशुरामभाऊ व त्रिंबकराव मामा हे ४० दिवसपर्यंत किल्ल्याभोंवतीं गराडा देऊन राहिले. परशुरामभाऊंच्या व मामांच्या तोफांची महावृष्टि बेटावरून पट्टणावर जारीनें होऊं लागली. श्रीरंगपट्टणांत एकच धांदल उडून गेली. तोफांचे गोळे—धो—धो—धो—शब्द करीत शहरांतील महालावर आदळून कैक इमारती लोटांगणें घालूं लागल्या. नागरिक जनसमूह भयचकित होऊन गेला. पट्टणामध्यें एकही माणूस फिरकेनासें झालें. हैदरानें केवळ अविचार करून सर्व लोकांचे जीव धोक्यांत घातल्यामुळें त्याची प्रजा शतशः शाप देऊं लागली, अबलाजन कडकडा बोटें मोडूं लागला, आणि आतां हें अरिष्ट टळून आपले प्राण कसे वांचतात, ह्याविषयीं श्रीरंगपट्टणांत जो तो चिंतातुर होऊन गेला, व जिकडे तिकडे हाहाःकार माजला.

किल्ल्याभोंवतीं व शहराभोंवतीं पेशव्यांच्या सैन्याचा विस्तार लांबवर पसरलेला असून तोफांच्या भडिमारानें दिग्मंडळ दणाणून गेलें, व सर्वत्र धूरचधूर होऊन गेला. ह्या समराग्नीप्रमाणेंच परशुरामभाऊंचा कोपाग्नीही अनावर भडकून हैदराच्या अप-

राधपरंपरेचें पूर्ण प्रायश्चित्त आज त्यास खचित मिळतें, असें सर्वांस वाटलें, व श्रीरंगपट्टणशहराचीही धडगत दिसत नसून ह्या प्रलयाग्नींत त्याची राखरांगोळी होणार असें सर्वांस भासूं लागलें.

सेनापति परशुरामभाऊ मोठ्या त्वेषानें शरवृष्टि करीत असून आपल्या बंधुवर्गास वरचेवर धीर देत होते. 'गडे हो अवसान न सोडतां एकदिलानें एकदम हूल करा, ह्मणजे किल्ला आपलाच आहे. त्या गनिमाचें निर्नाम करण्याचा हाच प्रसंग आहे. त्या अधमाधमाची आजपर्यंत उपेक्षा केली हीच मोठी चूक झाली. तर आतां या, आणि त्या बेइमानाची मान दाबून पंतप्रधानांचें निशाण किल्ल्यावर फडकावा'. अशा रीतीनें वीरश्रीचा उपदेश करीत, व केव्हां केव्हां बंधुजनाचें हस्तकौशल्य पाहून 'वाहवा वामनराव वाहवा! शाबास रघुनाथराव! शाबास कोन्हेरराव!!' इत्यादि हिंमतीचे, व दिलदारीचे शब्द उच्चारीत, हैदरअल्लीला केवळ बाऊ होऊन राहिलेला इमानी भाऊ, आपल्या धन्याचा झेंडा पट्टण किल्ल्यावर उभारण्याकरितां एकसारखा सव्वा महिना झगडत राहिला!!

हैदरअल्ली व टिपू ह्यांनीं प्रथम बरीच मर्दुमकी दाखविली; परंतु पेशव्यांच्या पराक्रमी आणि अनुभवशीर सैन्याच्या अधिपतीबरोबर एकसारखी

सव्वा महिना चकमक झडत असल्यामुळें खानाचे लोक पुष्कळ पडले. सर्व फौज जर्जर होऊन गेली. सरदार, मानकरी त्रस्त झाले. भाऊ आतां खास वर येऊन आपणास कंठस्नान घालतो अशी हैदराला दहशत पडली. मराठ्यांच्या सैन्याकडून अगदीं घेरला गेल्यामुळें अल्लीसाहेब गांगरून गेला. युद्धप्रसंग टाकून त्याला क्षणोक्षणीं मूर्छा येऊं लागली; आणि त्याच्या सर्व सैन्याची दुर्दशा आणि धुळधाण होऊन फौज एकीकडे, टिपू दुसरीकडे आणि अल्ली भलतीचकडे, अशी पट्टणांत वाताहात झाली!! महंमदअल्ली कुमदान व फिरंगी फुलचारीकर यांचेकडेही गयावया होऊन हैदरानें सहाय मिळण्याविषयीं पत्रें पाठविलीं होतीं, परंतु सर्व व्यर्थ.

अशा रीतीनें बुरे हाल सोशीत किल्ल्यामध्यें भाऊंचा व मामांचा मार सोशीत असतां, हैदरअल्लीला कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झाला, आणि 'भीक नको, पण कुत्रा आटोप' असें त्यास होऊन तो हातापायां पडूं लागला, व मला प्राणदान देऊन मजशीं तह करा असें त्यानें पुनः बोलणें लाविलें.

पेशव्यांचे सैन्यानें तो किल्ला बहुतेक सर करून त्या मुलखाची खंडणी घेण्यासही मामांनीं सुरवात केली होती. एकदोन हल्ले करून भाऊ, पंतप्रधानांची सलाबत म्हैसूरकराच्या राज्यांत पूर्णपणें बसविणार, इतक्यां-

त थेउराहून श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे यांचीं निकडीचीं *पत्रें आलीं कीं, 'आमची प्रकृति अत्यावस्थ असून श्रीगणपतीचे पायांजवळ प्राणोत्क्रमण होण्याची वाट पहात आहोंत, अंतकाळीं आपण जवळ असून शेवटची भेट व्हावी ही इच्छा, त्यास हैदरखानाचा मोकबिला तसाच उरकून थेऊर मुक्कामीं तावडतोब येणें '

आपल्या कृपावंत, शूर, व मर्मज्ञ धन्याची ही हृदयस्फोटक शेवटची आज्ञा वाचून परशुराम भाऊंच्या व मामांच्या पोटांत भडभडून आलें, गळा दाटून आला, नेत्र अश्रुपूरित झाले, आणि थेऊरच्या गणपतीचें देवालय आणि माधवराव साहेब पेशवे हीं दोन्हीं, मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभीं राहून आपल्या स्वामिराजाचें शेवटचें दर्शन केव्हां होईल असें परशुराम भाऊंस होऊन गेलें. नंतर अशा दुर्धर प्रसंगीं दुराग्रह न धरितां हैदराच्या विज्ञप्तिप्रमाणें त्याजबरोबर आपणास अनुकूल असा तह ठरवावा, व सत्वर श्रीमंतांचे भेटीस जावें, असा भाऊंचा व मामांचा विचार झाला, आणि त्याप्रमाणें रास्ते व सेनापति यांचे विद्यमानें पुढें लिहिल्याप्रमाणें तह ठरून, हें

* कर्नाटकांतील संस्थानाचा इतिहास–पटवर्धन सरदार–पान ६७ आणि पेशव्यांची बखर–माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब–पान–१०४–१०५.

सतत चार वर्षें हैदरअल्लीचें चंदन उडविणारें, रण-कंदन, एकदाचें इ० स० १७७२त शेवटास लागलें.

*तहाचीं कलमें:—

शिवाजीचे वेळीं करनाटकचा जितका मुलुख मराठ्यांकडे होता तितका सगळा हैदराकडून त्यांनीं (पेशव्यांनीं) घ्यावा.

२ मदगिरी व गरमकोंडा हे दोन्ही किल्ले पेशव्यांचे स्वाधीन असावेत.

३ लढाईचे खर्चाबद्दल रोख ३६५०००० रुपये हैदरानें पेशव्यांस द्यावे.

४ प्रतिवर्षीं हैदरानें पेशव्यांस १४००००० रुपये खंडणीबद्दल बिनहरकत द्यावे.

५ सावनूरचे नबाबास हैदरानें यत्किंचित्‌ही इजा देऊं नये.

---

## भाग ५ वा.

---

### पुण्यांतील दंगल आणि राघोबा भरारी.†

इ० स० १७७२ त हैदरअल्लीचें पारिपत्य क-

---

* मराठ्यांची बखर–उतरार्ध भाग २१, पान ५८. कलम १२. आणि पेशव्यांची बखर पान १०३ टीप ५४. व कर्नाटक प्रांतांतील राज्यांचा इतिहास–उत्तरार्ध, भाग २, पान ५७ पहा.

† राघोबा ढाल तरवारीच्या बळकट व पळण्यांत चपल असल्यामुळें त्याला भराडी किंवा भरारी ह्मणत.

रून त्याजबरोबर तह ठरविल्यावर त्रिंबकराव मामा पेठे व परशुराम भाऊ पटवर्धन आपआपल्या सैन्यास माघारें फिरवून श्रीमंत थोरले माधवराव साहेब पेशव्यांच्या भेटीकरितां मजल दरमजल करीत मोठ्या त्वरेनें थेउरास येऊन दाखल जाहले, व प्रेमभावानें श्रीमंतांची भेट घेऊन लष्करासंबंधी सर्व कच्ची हकीकत पेशव्यांस विदित केली. तें ऐकून माधवरावास समाधान वाटलें.

आपला अंतकाल आतां अगदीं समीप येऊन ठेपला असें जाणून श्रीमंत माधवरावसाहेब पेशव्यांनीं झाडून सर्व सरदारांस व मानकऱ्यांस बोलावून थेउरास दरबार भरविला. त्याप्रसंगीं राघोबादादा, नानाफडनवीस, मोरोबादादा, परशुरामभाऊ पटवर्धन, हरिपंततात्या फडके, त्रिंबकरावमामा पेठे, सखारामबापू बोकील, महादाजीपंत गुरुजी, बाजिपंत अण्णा, गोविंद शिवराम खासगीवाले, आनंदराव जिवाजी पानसे, विंचुरकर, राजेबहादुर, वगैरे लहानमोठे सर्व लोक तमाम हजर होते.

*माधवरावांचा हा दरबार भरविण्याचा उद्देश इतकाच होता कीं, आपल्या पाठीमागें गादी सुरक्षित रीतीनें चालावी व मुत्सद्दी वगैरे लोकांच्या

* पेशव्यांची बखर-माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब-पान १०५-१०८.

मनांतील आढी जाऊन त्यांनीं एकदिलानें वागावें. त्या उद्देशाप्रमाणें, राज्यप्रकरणीं अवांतर गोष्टींची निरवानिरव झाल्यावर बाळाजी बाजिरावांच्या वंशास नेहमीं पाण्यांत पहाणारे जे दोन भयंकर पुरुष, रघुनाथरावदादा आणि सखारामपंत बापू, यांस श्रीमंतांनीं जवळ बोलाविलें, आणि नारायणरावाला दादासाहेबांचे मांडीवर बसवून त्यांचे हातांत हात घातला, व सद्गदित अंतःकरणानें सर्व मुत्सद्यांच्या समक्ष माधवरावसाहेब हृदयंगम वाणीनें चुलत्यास ह्मणाले, 'काका, मी तर चाललोंच, परंतु या बाळाचा प्रतिपाल करणें आतां तुह्माकडे आहे. ज्याप्रमाणें नानासाहेब यांनीं सर्वांचा प्रतिपाल केला, त्याप्रमाणें या मुलाला जवळ घेऊन तुह्मीं आतां राज्यकारभार करावा. झालें तें झालें. ह्यापुढें तरी मनांत आढी कोणत्याच गोष्टीची बाळगूं नये. सर्व तुमचेंच आहे असें समजून या बाळावर पुत्रप्रेम असूंद्या. परस्परांचें दिल साफ नसलें ह्मणजे राज्यास किती हानी असते हें आपण जाणतच आहां. मी लेंकरानें काय सांगावें?' असें बोलत असतां माधवरावांचा कंठ दाटून आला, नेत्र अश्रुपूरित झाले आणि तोंडांतून शब्द निघेना.

माधवरावांचें हें बोलणें ऐकून दादासाहेब डोळ्यांस पाणी आणून म्हणाले: 'बाळा तूं आतां कां

व्यर्थ कष्टी होतोस ? ह्या गोष्टीची कांहीं काळजी तूं करूं नकोस. जसें वडिलांनीं चालविलें, तसेंच पुढें चालवीन बरें. यांत तिळमात्र संदेह धरूं नकोस '

अशा रीतीनें दादासाहेबांनीं खात्री केल्यावर सखारामबापूंचे हातीं नारायणरावाला देऊन बापूंनीं शुद्ध अंतःकरणानें वर्तावें अशाविषयीं माधवरावांनीं बापूंस पुष्कळ बोध केला. बापूंनींही श्रीमंतांचे पायांवर हात ठेवून ' इतःपर माझे हातून वांकडी वर्तणूक काडीमात्र व्हावयाची नाहीं, ' अशी शपथ वाहिली. आणि माधवरावांचें समाधान केलें.

याप्रमाणें दूरदृष्टि आणि चतुर माधवराव पेशव्यानें, राज्यसंबंधी सर्व व्यवस्था जिकडल्या तिकडे लावल्यावर हा शूर, न्यायी, दयार्द्र पुरुष इ. स. १७७२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या १८ व्या तारखेस प्रातःकाळीं श्रीगणपतीजवळ परलोकवासी झाला, व त्याचेबरोबर त्याच्या *आवडत्या स्त्रीनें सहगमन केलें!

* आवडत्या–ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं रमाबाईसाहेब व माधवरावसाहेब ह्यांची परस्परांवर फारच प्रीति होती. माधवरावांची अंतकाळचीं भाषणें, रमाबाईचा पति विषयीं शोक व तिचें सती जाणें इत्यादि गोष्टी अत्यंत चित्तवेधक आहेत, व त्याविषयींचें यथातथ्य वर्णन देणें अगदीं रास्त होतें. परंतु आमच्या ह्या चरित्राचा मुख्य विषय 'माधवराव साहेब पेशवे' हा नसल्याकारणानें तें सविस्तर कथानक ह्या ग्रंथांत देतां येत नाहीं ह्या चरित्रांत, मुख्य विषयाचा जितका संबंध पेशवाईतील राज्यकारस्थानाशीं आहे. तितका मात्र स्पष्टरीतीनें साग्र दिला आहे.

अशा प्रकारानें त्या महात्म्याचा अंत झाल्यावर थेऊर मुक्कामीं और्ध्वदेहिक कृत्यें उरकून सर्व मुत्सद्दीमंडळी नारायणरावसाहेबास घेऊन पुण्यास आली.

पुढें डिसेंबर महिन्यामध्यें सखारामबापू आणि राघोबादादा यांणीं साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणून नारायणरावसाहेबास गादीवर स्थापित केलें, व परशुरामभाऊ वगैरे पटवर्धनमंडळी मिरजेकडे गेली.

नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळून पुरे आठ महिने लोटले नाहींत तोंच पुण्यामध्यें एक अनर्थाची गोष्ट घडली. ती हीच कीं राज्य प्राप्तीविषयीं कैक वर्षे धारण केलेली राघोबादादाची इच्छा अधिकाधिक दुणावत चालली, आणि तिला कर्दनकाळ राक्षसी स्वभावाच्या आनंदीबाईकडून ( राघोबादादाची बायको ), कुबुद्धि-वादाचें यथेच्छ खाजें वेळोवेळीं मिळत गेल्यामुळें, त्या राज्येच्छेचा असा भयंकर परिणाम झाला कीं, थेऊरच्या गणपतीचे देवालयांत दादांनीं व बापूनीं वाहिलेल्या शपथा, आणि माधवरावांनीं केलेला सदुपदेश, ह्या सर्वांवर विरजण घालून अधमाधम राघोबानें गारद्याकडून आपल्या पुतण्याचे शनवारवाड्यांत तुकडे तुकडे करविले, आणि आपण गादीवर† बसला ! !

---

† नारायणरावांच्या मृत्युसंबंधी हकीकत अशी आहे कीं:— राघोबाशराच्या उलाढालीमुळें नारायणरावांनीं त्यास अटकेंत

हें ब्रह्महत्येचें अघोर पातक करून राघोबादादा जरी आपणास पेशवा ह्मणवूं लागला, तथापि त्याच्या ह्या निंद्य, व लाजिरवाण्या दुष्कृतीमुळें तो केवळ पुण्याच्या दरबारांतील *मुत्सद्दीलोकांच्या मनांतून उ-

---

( मागील पृष्टावरून पुढें चालू. )

ठेविलें होतें. पुढें सखाराम बापूच्या संमत्तानें नारायणरावांस धरावा असा रावसाहेबांनीं बेत केला. परंतु जहांबाज आनंदीबाईनें 'ध' च्या ठिकाणीं 'मा' असें अक्षर घालून, सुमेरसिंग, खरगसिंग आणि महमद इसप ह्यांकडून आपल्या पुतण्यास ठार केलें! ह्या दंगलीमध्यें, १ इच्छारामपंत ढेरे गाईसुद्धां, २ आबाजीपंत, ३ चाफाजी, ४ नारोबा फाटक, ५ नारोजीनाईक ह्यांचेही बळी पडले!! नारायणरावाचें वय त्यावेळीं १८ वर्षांचें होतें. नारायणरावाला धरण्याच्या बाबतींत बापूंचें आंग होतें ही गोष्ट बरेच दिवस बाहेर पडली नाहीं.—पेशव्यांची बखर पान १०९-११६.

* माधवराव पेशव्यांचे कारकीर्दींत न्याय व निस्पृहता ह्यांविषयीं गाजलेला जो प्रसिद्ध रामशास्त्री, त्यानें नारायणरावाचा खून झाल्यावर त्यांत कोणकोणाचें आंग होतें याविषयीं बारिक रीतीनें पक्का शोध काढिला. नंतर त्याला राघोबाचा तिटकारा येऊन असल्या अन्यायी राज्यांत राहण्यापेक्षां स्वदेशीं जावें हें बरें, असा विचार करून तो जाण्यास निघणार इतक्यांत राघोबादादा त्यांस भेटण्याकरितां आले. राघोबानें शास्त्रीबोवांस पृच्छा केली कीं 'घडलेल्या पातकास कोणतें प्रायश्चित्त घेतलें ह्मणजे प्रतिकार होईल?' राघोबाचा तो प्रश्न ऐकून या न्यायमूर्तीनें स्पष्ट उत्तर दिलें कीं 'या अपराधाला देहांत प्रायश्चित्तच पाहिजे'!! राघोबादादांनीं शास्त्रीबोवांस राहण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला; परंतु त्या पुरुषानें एकच उत्तर दिलें कीं 'दादा, जोंपर्यंत आपण येथें हयात आहांत, तोंपर्यंत तर हा रामशास्त्री पुण्यांत पाउल ठेवणार नाहीं'! असें ह्मणून शास्त्रीबावा गेले ते गेलेच!!—

(पुढें चालू.)

वरला इतकेंच नव्हे, तर सर्वलोकांस तो अप्रिय होऊन कांहीं कालपर्यंत अभिशाप आणि तळतळाट ह्यांचा विषय होऊन राहिला होता !

राघोबादादा हा तरवारीचा बळकट, ह्मणूनच तो पुण्यांत असतां कोणाचीच कांहीं गडबड न चालून कांहीं दिवस मुत्सद्दी मंडळी मूग खात बसली होती. नानासाहेब पेशव्याचे वेळेपासून राघोबादादाची तलवार चमकत असून त्याची अशी प्रसिद्धि असे कीं, शत्रुसमूहावर हा चालून गेला ह्मणजे ह्यानें भर्दिशीं शत्रूची भिंवेरी उडवून टाकावी; आणि याच कारणामुळें त्याला राघोबा भरारी—डी असें नांव पडलें आहे.

राघोबादादामध्यें मुख्य दोष हेच होते कीं, तो किंचित् खैंग व अविचारी असून राज्यप्राप्तीविषयीं

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

पेशव्यांची बखर–पान ११६ टीप १९.—नारायणराव मारल्यावर त्याचें उत्तरकर्म होऊन दहावे दिवशीं त्रिंबकराव मामा पेठे, नाना फडनवीस हरिपंत फडके वगैरे सर्व मंडळी नदीवर तिळांजळीस गेली होती. त्या वेळीं मामा, नाना व हरिपंत यांनीं वाळवंटावर बसून सहजावृत्त्या वाळूचे शिवलिंगासारखे तीन ढीग केले, व राघोबादादाकडील मंडळी जवळच होती. त्यांस न कळे अशीं सांकेतिक चिन्हें केलीं व वालुकालिंगावर हात ठेवून आणक्रियेनें परस्परांस त्यांनीं असें सुचविलें कीं, अतःपर राघोबादादांस व त्यांच्या वंशास नमस्कार करावयाचा नाहीं व नानासाहेबांचाच वंश हरतऱ्हेनें गादीवर स्थापित करावयाचा ! —पेश० बखर–पा. ११९ व ऐतिहासिक गोष्टी.

त्याची अत्युत्कट इच्छा अन्यायाची होती; आणि ह्यामुळें घरांतल्या घरांत दुफळी माजून अनन्वित कृत्यें करण्यास तो प्रवृत्त झाला. त्याच्या दुष्कृतीचीं फळेंही त्याला आमरणांत भोगावीं लागलीं.

रघुनाथराव पेशव्यांचे गादीवर बसतो तोंच त्याला पुणें सोडून बाहेर स्वारी करणें भाग पडलें. कारण पेशव्यांचे घराण्यांत भडकलेला कलहाग्नि निजाम व हैदर यांच्या पथ्यावर पडून ह्या संधीस आपला हात साधून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्यांनीं सैन्याची उठावणी करून मोगलाईंत असलेलीं पेशव्यांचीं ठाणीं हुसकून लाविलीं. त्यामुळें रक्तपात करून मिळविलेल्या गादीचा उपभोग निर्वैधपणें घेतां न येऊन भराऱ्यांना लवकरच बाहेर भरारी मारणें भाग पडलें.

राघोबादादा कर्नाटकांत असतां इकडे पुण्यामध्यें कारभारी मंडळींना राज्यकारस्थान करण्यास चांगलें फावलें. ह्या कारस्थानांत †सखाराम बापु व हरीपंत तात्या हे तर होतेच. परंतु त्या सर्वांत अग्रेसर होणारा जो बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना

† पेशवाईमध्यें 'सख्या, देवा, विठला' असे साडेतीन शहाणे असत. ते येणेंप्रमाणें.

१ सखाराम बापु बोकील—पुण्याचे दिवाण.

( पुढें चालू. )

फडनवीस, ह्यांनेंही आपल्या बुद्धिबळाचा पट पसरून डाव देण्यास ह्याच वेळेपासून सुरवात केली! थो-

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

१ देवराव हिंगणे = श्रीमंतांचे दिल्लीचे वकील.

१ विठ्ठल सुंदर संगमनेरकर = हैद्राबादचे निजामाचे दिवाण

.॥. नाना फडनवीस उर्फ बाळाजी जनार्दन भानु.

३॥ ——ऐतिहासिक गोष्टी भाग १ ला. गोष्ट १८.

* नाना फडनवीस यांचें पूर्ववृत्त असें आहे कीं, त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे तीर्थरूप वारले. तेव्हां नानास फडनविशीचीं वस्त्रें दिलीं. पुढें कांहीं विकारानें नानांची प्रकृति बिघडून ते तपश्चर्या व तीर्थयात्रा करण्याकरितां गेले. नानावर नाना साहेब पेशव्यांची फार मर्जी होती. पेशव्यांना पुढें अफगाण लोकांवर मोहिमेस जावयाचें होतें. त्यांचे बरोबर नानाही मातोश्रीस घेऊन यमुनातीरीं गेले. पुढें पानिपत येथें जी भाऊ—गर्दी झाली, तींत नाना सांपडले होते. परंतु दैववशात त्यांचा जीव वांचून ते जीव घेऊन हाल अपेष्टा सोशीत गोसाव्याच्या रूपानें पळून पुण्यास आले! त्यांची मातोश्री गिलच्यांच्या हातीं सांपडली! पुढें माधवराव पेशव्यांचे कारकीर्दीत नाना कांहीं दिवस पेशव्यांचे खासगी कारकून होते व पुढें ते पुन्हा आपल्या फडनविशीच्या कामावर रुजू झाले. याप्रमाणें नानांचें आदिवृत्त असून नारायणरावांचे मृत्यूनंतर ते सर्व राज्यसूत्राचे चालक झाले.

नाना मनगटाचे ढिले पण डोक्याचे पराकाष्ठेचे मजबूत होते. ते काम ओढणारे इतके जबरे असत कीं, ते जें लिहिणें लिहीत तें नुसतें ऐकून ही छाती दडपून जाते!! नानांची धूर्तता व शहाणपण किती अजब असे ह्या विषयींच्या कीर्तीचा डंका दिनदुनियेंत दुमदुमत आहेच. त्यांच्या संबंधी ज्या आख्यायिका अद्याप फारशा प्रसिद्ध नाहींत, त्यांपैकीं कांहीं खालीं देतों:—

इ० स० १७८६।८७ सालामध्यें बदामी किल्ल्याला पेशव्यांनी वेढा दिला होता. त्या वेळीं हैदराबादचा निझामही पेशव्यास

(पुढें चालू.)

रल्या माधवरावाच्या कारकीर्दीत ज्या प्रमाणें सखाराम बापु बोकील अटोकाट शहाणपणाच्या संबंधानें प्रसिद्धीस आला, त्याप्रमाणेंच नारायणराव पेशव्याच्या मृत्यूनंतर आपल्या अतर्क्य बुद्धिप्रतिभेनें संपूर्ण जगतास दिपवून टाकणारा हा भानु उदयाच-

---

(मागील पृष्ठावरून.)

मदत करण्याकरितां आपलें सैन्य घेऊन टिपूवर चालून आला होता. त्या प्रसंगीं एके दिवशीं रात्रीं नबाब साहेब तंबूमध्यें जनान खान्यांत बक्षी बेगम हिजबरोबर एकांतांत असतां नबाबाचें म्लान वदन पाहून बेगम साहेबांनीं विचारिलें कीं 'आज तोंड हिरमुसलेलें कां?' नबाब साहेबांनीं बहुत आढेवेढे घेतले तथापि बेगम आपला हट्ट सोडीना. तेव्हां नबाब ह्मणाले 'आज आपणाला कोणत्याही गोष्टीची कमतरता नाहीं. पेशवे हीं आपल्याशीं स्नेहभावानें आहेत. तथापि एका गोष्टीनें माझें वैभव फिक्कें आहे. ती गोष्ट हीच कीं, पेशव्यांकडे जसे नानासारखे चतुर पुरुष पदरीं आहेत तसा एकही मनुष्य माझे दरबारीं नसावा काय?'

याप्रमाणें एकांतांत झालेलें उभयतांचें भाषण तसेंच राहिलें. नंतर दुसरे दिवशीं नबाब बेगमेबराबर एकांतांत आहेत इतक्यांत कोणी एकजण चिठ्ठी घेऊन आला आहे अशी नबाब साहेबांस वर्दी पोहोंचली. नंतर मनुष्याकडून चिठ्ठी आणवून पहातात तों, ती चिठ्ठी नानाफडनवीसाकडील असून त्यांत मजकूर असा होता कीं, 'आपल्या पदरीं मनुष्य नसल्या कारणानें आपली मर्जी खप्पा झाली आहे, त्यास आमची एवढीच विनंती आहे कीं, आह्मी जसे पेशव्यांचे चाकर त्याप्रमाणेंच आपलेही आहोंत, करितां खाविंदांनीं मनांत शंका न बाळगितां सेवकास खुशाल हुकूम फर्मावीत जावा. सेवा करण्यास आळस यत्किंचितही होणार नाहीं.' ही चिठ्ठी पाहून नबाब थक्क होऊन

(पुढें चालू.)

लावर झळकूं लागला ! ! पेशव्यांचे राज्यावर अरिष्टांच्या आभाळाची गर्दी जरी एकसारखी होई व घनघोर युद्धसंग्राम माजून राज्याचा सुरक्षितपणा जरी क्षणोक्षणीं अनिश्चित होई, तथापि ह्या चतुर पुरुषानें राज्याचें सुकाणूं इतक्या शिताफीनें चालविलें होतें कीं, कैक बलाढ्य राष्ट्रें पेशव्यांचे राज्यावर झडप घालण्याकरितां डोळ्यांत तेल घालून टपत बसलीं अ-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

गेला, व बेगम साहेबांस मजकूर सांगून ह्मणतात 'पहा! मी काल ह्मटलें त्याचें प्रत्यंतर हें! काल तूं व मी ह्याशिवाय या स्थलीं तिसरें कोणीही नसतां, हा पहा काय चमत्कार तो! नानाफडनवीसास त्यावेळीं नबाबानें 'मशारुल्‌महा'-(बडा मसलतवाला) हा किताब दिला. पेशव्यांची बखर पान १४८-१४९. पेशव्यांच्या हुकुमानें इंग्लिशांचा वकील बेटावर रहात असतां त्याला खाण्याचें सामान भरून ३ मेणे मुंबईहून येत असत. एकदा मॅलेट् साहेबांनीं (इंग्लिश वकील) त्या तीन मेण्यांपैकीं एका मेण्यांत तोफा व दारू मोठ्या बंदोबस्तानें मुंबईहून पुण्यास आणिवली. परंतु मेणा मुंबईस आहे तोंच ती बातमी गुप्त हेराकडून नानास येऊन पोहोंचली! तेव्हां तांबडा मेणा चौकीवर पाडून ठेऊन बाकीचे दोन मात्र पुढें जाऊं द्यावे, अशी नानानीं ताकीद दिली. त्याप्रमाणें चौकीवर मेणा अडकून ठेविला. नंतर मॅलेट् साहेबांनीं तक्रार केली कीं, नेहमीं आमचे ३ मेणे येत असतां आजच हरकत कां? नानांनीं सांगून पाठविलें कीं याचा जबाब दरबारीं या ह्मणजे मिळेल. नंतर पेशव्यांच्या दरबारांत मॅलेट् साहेब जाऊन त्यांनीं आपला अर्ज श्रीमंतांस कळविला. श्रीमंतांनीं नानास विचारतां नानांनीं अदबीनें उत्तर दिलें कीं, मेण्यास आजच हरकत कां झाली याचें कारण वकिलासच ठाऊक. आह्मांस काय माहीत आहे? हें ऐकतांच मॅलेट चपापला! व त्यानें झाल्या अपराधाची माफी मागितली!! ह्याच-

( पुढें चालू. )

सतां, ह्या बहादरानें आपल्या हयातीपर्यंत कोणाचीच डाळ शिजूं न देतां, त्यांस दुरूनच जिभल्या चाटीत व टकमक पहात बसविलें ! ! !

राघोबादादाच्या पाठीमागें नानांनीं पुण्यामध्यें राज्यकारस्थान केलें म्हणून जें मागें सांगितलें, तें राज्यकारस्थान हें कीं, नारायणरावांचे मृत्यूसमयीं गरोदर असलेली त्यांची पत्नि गंगाबाईसाहेब ह्यांस मोठ्या बंदोबस्तानें नानांनीं पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविलें; व त्यांच्या नांवचीं पत्रें चोंहोंकडे पाठवून तात्या, बापू व नाना हे त्रिवर्ग गंगाबाईच्या नावानें राज्यकारभार पाहूं लागले !

इकडे मिरजतासगांवाकडे परशुरामभाऊंवर आणीबाणीचा प्रसंग गुदरला. नारायणरावांचा भयंकर खून व त्यानंतर दादासाहेबांनीं परिधान केलेलीं पेशव्यांचीं वस्त्रें हा विपरित प्रकार पाहून भाऊंचा दिल फाटून गेला होताच. तशांत दादासाहेब व नानाफडनवीस ह्या दोघांकडूनही भाऊंस एकाच वेळीं पत्रें येऊन थडकलीं कीं, तुम्हीं आपल्या जयत सरंजामानिशीं आम्हांकडे निघून यावें ! ! दादासाहे-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

वेळीं मॅलिट साहेबानें आपल्या पुस्तकांत लेख लिहून ठेविला आहे कीं 'जोंपर्यंत नाना जिवंत आहे, तोंपर्यंत या राज्यांत कोणाचीच मात्रा चालणार नाहीं.' पेशव्यांची बखर पान १४५-१४७.

वांस पुण्यांत झालेली मसलत टाऊक नसून मोहीमे-मध्यें भाऊंची मदत असावी ह्मणून त्यांनीं त्यांस कर्नाटकांत बोलाविलें. इकडे पुण्यांत रचलेला व्यूह निर्विघ्नपणें शेवटास जावा ह्याकरितां फडनविसांनीं ही भाऊंची मदत मागितली !! अशा प्रकारें भाऊंचें मन द्विधा होऊन त्यांच्यावर नाजुक प्रसंग येऊन गुदरला. तथापि त्या परीक्षेच्या वेळीं भाऊंनीं ही फार शहाणपणाचीच क्लृप्ति लढविली. ती अशी कीं नानाफडनवीस वगैरे मंडळींनीं खुष रहावें व सुदैवें-करून गंगाबाईसाहेबांस पुत्ररत्न झालें असतां पेश-व्यांच्या कायदेशीर वारसाच्या संरक्षणार्थ पटवर्धनां-ची समशेर उपयोगीं पडावी ह्मणून परशुरामभाऊं-नीं कांहीं लोक आपल्या *भावांबरोबर देऊन त्यांस पुरंदर किल्यावर गंगाबाईसाहेबांच्या संरक्षणार्थ ठे-विलें व दादासाहेबांबरोबर उघड रितीनें द्वेष क-रण्याचा समय अद्याप आला नाहीं, हें पक्कें जाणून मराठ्यांची मर्जी खप्पा न व्हावी ह्मणून भाऊंनीं कर-नाटकचा रस्ता धरिला.

कालगति व सेवाधर्म कांहीं अजब आहेत. कुलदीपक माधवरावसाहेबांबरोबर ज्या परशुराम भाऊनें मोठ्या उल्हास वृत्तीनें जाऊन शत्रूवर वार

---

* गंगाधरराव गोविंद
कोन्हेराव त्रिंबक } = (कर्नाटक प्रांतांतील राज्यांचा इतिहास उत्तरार्ध भाग २ पान ६१-६२

करावेत, त्याच परशुराम भाऊला, आतां, ब्रह्मघ्न ह्मणून कुलांगार राघोबादादा बरोबर स्वराजनिष्ठेचें कांतडें पांघरून कर्नाटकांत जावें लागत आहे, पटवर्धन वीरांच्या ज्या समशेरी हैदराच्या व टिपूच्या काळजाचा ठाव पहाणार, त्याच आतां 'हुडेरहप्प' करीत पुरंदर किल्ल्यावर खडा पहारा करीत आहेत, आणि ज्या श्रीवर्धनकर भटांच्या दराऱ्यानें सर्व भरतखंड थरारून जाई, त्याच भटांच्या घराण्यांत शांति आणि एकोपा ह्यांचा ह्या वेळीं नयनाट होऊन पेशवे व पेशवाई ह्या दोहोंची सर्व मदार आतां परशुरामभाऊंच्या बाहुबलावर व नाना फडणिसांच्या बुद्धिबलावर अवलंबून राहिली ! !

याप्रमाणें सर्व लोकांचें लक्ष पुरंदर किल्ल्याकडे लागलें असतां, वैशाख शुद्ध सप्तमीचे दिवशीं दोनप्रहरीं गंगाबाईसाहेब प्रसूत होऊन त्यांस पुत्र झाला. त्याचें नांव सवाईमाधवराव असें ठेवून चाळिसाव्या दिवशीं साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आलीं; आणि रघुनाथरावाच्या पक्षाच्या सर्व मंडळीस कैद करून शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पटवर्धन, टिपू, निजाम आदिकरून सर्व लोकांस माधवराव नारायण प्रधान यांच्या शिक्क्याचीं पत्रें गेलीं कीं, 'अतःपर रघुनाथ बाजीराव यांचीं पत्रें कोणीही मानूं नयेत.

रघुनाथ बाजीराव हे *बंडवाले असून जरकरितां कोणी त्यांचा पक्ष स्वीकारील किंवा त्यांस साहाय्य करील तर त्याला सरकारांतून योग्य शासन होईल. पेशव्यांच्या गादीस खरे व कायदेशीर वारस माधवराव नारायण हे असून त्यांच्या नांवानें आतां राज्यकारभार सुरळीतपणानें चालेल.'

रघुनाथरावाच्या पक्षाचा बींमोड करून त्यास कैद करण्याकरितां नानांनीं हरिपंततात्या फडके यांचेबरोबर निवडक ४०००० फौज देऊन त्यांस दादासाहेबांवर पाठविलें, व भाऊंनीं आपल्या स्वामिभक्तीस जागून तात्यांस पूर्ण साहाय्य करावें, आणि दादासाहेबांचा चांगला समाचार घ्यावा अशाविषयीं त्यांस गुप्तरीतीनें पत्रें लिहिलीं.

ई. स. १७७३ त पुण्यामध्यें या प्रकारची धांदल‡ सुरू आहे, इतक्यांत दादासाहेबांनीं लढाई संपवून ते परत यावयास निघाले. सवाईमाधवरावांच्या जन्माची सुवार्ता आणि दादासाहेबांस पकडण्याकरितां हरिपंत तात्यांची तयारी, हीं पाहून परशु-

* पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १२१ पहा.

‡ सवाईमाधवरावाच्या जन्मानंतर हरिपंत फडके यांनीं राघोबावर स्वारी केली, असें पेशव्यांच्या बखरींत वर्णन आहे. परंतु ग्रॅंटडफ आणि बा० प्र० मोडक हे आपल्या ग्रंथांत लिहितात कीं, दादासहिब व फडके यांची झुंपल्यावर माधवराव जन्मले.

राम भाऊंस आनंद वाटला; आणि मार्गामध्यें फडके व रघुनाथराव यांचा सामना होतांच भाऊंनीं भऱ्याचा पक्ष दूर झुगारून दिला, व जी तलवार दादासाहेबांच्या वतीनें चमकत होती, तीच परशुराम भाऊंची तलवार एकदम दादासाहेबावर चमकूं लागली ! ! दादासाहेबाकडील पुष्कळ लोक फडक्यांस येऊन मिळाले. महमद इसाफ मात्र दादांचा पक्ष धरून राहिला. दोन्ही कडील सैन्यें निकरानें लढूं लागलीं. अशेरीच्या मैदानांत मोठाच युद्धप्रसंग मातला ! त्रिंबकराव मामा पेठे यांच्या छातींत गोळी लागून ते रणांगणीं पडले* ! गंगाधर राव रास्ते यांना

---

* ह्या लढाईचें वर्णन पेशव्यांची बखर व पटवर्धनांचे कागदपत्र यांच्या आधारानें येथें दिलें आहे. ग्रांटडफ किंचित निराळया तऱ्हेनें देतात. त्रिंबकरावास दादांनीं कैद करून नेलें असें ग्रांटडफ ह्मणतो. हरिपंत फडक्यांचा पराभव न होतां दादा साहेबानींच पळ काढला असें पेशव्यांच्या बखरींत स्पष्ट लिहिलें आहे.

—मराठ्यांची बखर उत्तरार्ध पान ७६–७७.

—पेशव्यांची बखर पान १२२–१२३–१२५–१२६

—कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास—उत्तरार्ध—भाग २ पान ६१–६२–६३–४.

——राघोबा दादांनीं त्रिंबकराव मामास धरून नेल्यावर प्रसिद्ध आनंदी काकू, मामांना दररोज फटके मारून वर मिठाचें पाणी शिंपडी, व त्यांची निर्भत्सना करून 'आतां कसें ? नेले मसलतीं करून चालले राज्यांत बखेडे घालायाला' असें टोंचून बोले. त्यावेळीं त्या निधड्या शूरानें खडखडीत उत्तर द्यावें कीं 'रांड, मी एक मेलों तरी चिंता नाहीं. तुझे पुष्कळ+तुझ्या छातीवर पाय देण्या करितां तयार आहेत. ते तुझ्या हातीं कधीं ही राज्य लागूं देणार नाहींत.' ! ! !——काव्येतिहाससंग्रह–पेशव्यांची बखर–पान १२२ टीप ३ पॅरा २ रा.

भयंकर जखमा लागून ते अगदीं घायाळ झाले. परशुराम भाऊ दोनशें स्वारानिशीं महमद इसाफ् याजवर तुटून पडले. दोघेही लढणारे जबर. भाऊंनीं इसाफ याला साफ करण्याकरितां जबरून वार केले. परंतु त्याच्या आंगांत चिलखत असल्याकारणानें भाऊंचा मार, लागूं न होतां, तो अजीबात जिवंत निसटला. परशुराम भाऊंचे बंधु वामनराव गोविंद यांनींही त्याविशीं आपल्या शौर्याची शर्थ केली. हे दोघे बंधु आपल्या तरवारीची फेंक एकसारखी करित असतांही त्यावेळचा युद्धप्रसंग इतका दारुण झाला कीं सर्व लढाईंत परशुराम भाऊ व वामनराव गोविंद यांची मुदलीच गांठ नव्हती, ती दुसरे दिवशीं उभयतांची दृष्टादृष्ट झाली ! तोपर्यंत काटाकाट व कत्तल एकसारखी सुरू होती !

राघोबादादांनीं ह्यावेळीं त्यांचेकडील थोडें सैन्य असतांही, चांगली लढाई केली. तात्यांच्या व भाऊंच्या सैन्याला त्यांनीं बराच हात दाखविला. परंतु पुढें दादासाहेबांकडील लोक माघार घेऊन उत्साहरहित होत चालले. त्यांनीं आरंभीचें धैर्य शेवटपर्यंत कायम ठेवलें असतें, तर हें सगळेंच पारडें फिरण्याचा रंग आला होता. परंतु ते नाउमेद होऊन पळत सुटले ! त्यामुळें दादासाहेबही पळूं लागले ! व त्यांनीं बेदरचा रस्ता सुधारला !

राघोबादादा लढाई टाकून पळूं लागला हें पहातांच हरिपंत फडके आणि परशुरामभाऊ यांनीं लगट केली. त्या उभयतांनीं हैदराबादचे नबाब *अलिखां, यांस तेरा लक्षांचा मुलूख देण्याचें कबूल करून साहायार्थ बोलाविलें. नबाब आल्यावर ते तिघेही दादांच्या मागें हात धुऊन लागले. ह्या धांवपळीमध्यें भाऊ, वामनराव व अवांतर पटवर्धन सरदार प्रमुख होते.

बेदरास पोहोंचल्यावर पुन्हा तेथून दादांनीं वऱ्हाडाकडे धुम ठोकिली. भरारी पुढें भराऱ्या मार-

---

* लाख रुपये मुक्कामाचे व लाख रुपये कुच असेल तेव्हां, अशा करारावर नबाबसाहेबांची स्वारी फडक्यांस साहाय्य करण्यांकरितां आली. परंतु कांहीं लढाया झाल्यावर आयत्या वेळीं मध्येंच खो घालून नबाबसाहेब आपला नबाबी बाणा दाखवूं लागले ! अलिखांस खाखा सुटून ते ह्मणाले 'हम् तुमारे सात नै आते, और राघोबाकेसात नै लहरते' अलिसाहेबाच्या या धनकावणीस हरिपंत कसची भीक घालतो ? नाना फडणिसाच्या शाळेंतल्या या शूर पठ्ठयानें जंबिया पुढें सरसावून खरमरीत उत्तर दिलें कीं, 'नबाबसाहेब, आपण खुशाल परत जावें. कांहीं फिकिर नाहीं; राघोबा आमचा बाहेरील दुस्मान नसून तो आमच्या पैकींच आहे. तो व आह्मीं कधीं तरी एकत्र होऊंच होऊं. परंतु विश्वासघातामुळें तुह्मी मात्र आतां * * * उडालीं हें खचितच समज '!! हरिपंतांचें हें हिय्याचें समयोचित् भाषण ऐकून नबाब अगदीं थिजून गेला. आणि फडक्यांनां 'वजारता महा '=वजीरी करण्यास योग्य, हा किताब देऊन अलींनीं पुढें बिन तक्रार सहाय केलें—पेशव्यांची बखर पान १२४-१२९

ताहेत, व पाठी मागून भाऊ आणि तात्या हे त्याजवर झडप घालण्या करितां ईर्षेनें परस्परांस मधुन मधुन उत्तेजित करीत आहेत, अशा रितीनें ह्या वीर महावीरांचा खोंखोंचा डाव ऐन रंगांत येऊन भरतखंडाच्या विस्तृत अंगणांत, हा धिंगाणा सतत तीन* वर्षे जारीनें सुरू होता ! !

तात्याफडके†, परशुरामभाऊप्रमाणेंच छातीचा पुरा असून मनगटाचा बळकट. नानासाहेबांचे वेळेपासून तलवार परजणारा अनुभवशीर राघोबा, परंतु ह्यावेळीं तो निवळ होवा होऊन फडक्यापुढें अगदीं फिका पडून गेला. त्या दोघांनीं त्याला नेमाड, माळवा, उज्जनी, कोटा, मंडळेश्वर, ओंकारमांधाता, महेश्वर, धार‡ इत्यादि ठिकाणाहून पिटाळून लाविलें ! भाऊंनीं तर दादाचा पिच्छाच पुरवि-

* हा पहिला डाव ३ वर्षेंच चालला. इ. स. १७७२ पासून १७७५ पर्यंत. इंग्लिशांनीं दादासाहेबांस पाठिशीं घातल्यापासून दुसऱ्या डावास सुरवात झाली व जोरदार चालटले.

† (इ. स. १७७० मध्यें समरभूमीवर सिंहनाद करणारी फडके, पटवर्धन, रास्ते, गोखले. मेहेंदळे आदिकरून मंडळी आणि प्रस्तुतची फडके, पटवर्धन, रास्ते गोखले, मेहेंदळे, आदिकरून मंडळी, या दोघांच्याही पराक्रमांत, शौर्यांत, संपत्तींत;आणि आचरणांत किती जमीन अस्मानचें अंतर पडलें आहे बरें? "कहा राजा भोज? और कहां गंगा तेली ? ! !" उण्यापुऱ्या एका शतकांतच असा विपरित प्रकार व्हावा ना ?)

‡ ह्याच ठिकाणीं राघोबाला पुत्र झाला. त्याचें नांव बाजीराव असें ठेविलें !

ला. जेथें जेथें ह्मणून मदत मागण्याकरितां दादा जाई, तेथें तेथें पाठीवर भाऊ दत्त उभा आहेच ! ब्रह्महत्येचें पातक करून ज्याप्रमाणें अमरपतीनें शुष्ककाष्ठ पाठीमागें लावून घेतलें, व सर्व त्रिभुवनांत नाचला, त्याप्रमाणेंच राघोबाच्या अघोरकर्मानें त्याची सर्व भरतखंडभर धिंड काढून, त्याला त्राहि त्राहि करून सोडिलें.

असे बुरे हाल सोशीत दादासाहेब नर्मदा उतरून आलीकडे आले, आणि [1]अशेरी, बऱ्हाणपूर, खानदेश, कोंकण इत्यादि ठिकाणीं परशुरामभाऊंच्या परशु-प्रहारानें जर्जर होऊन, तोबा, तोबा, करीत हे

---

1 राघोबादादाचा पाठलाग करण्यामध्यें हरिपंत फडक्याप्रमाणेंच परशुरामभाऊ आदिकरून पटवर्धन सरदार प्रमुख होते. असें असतां पेशव्यांच्या बखरींत पटवर्धन सरदारांचा स्पष्ट रीतीनें उल्लेख न करण्याचें कारण, पटवर्धन वीरांची अति विस्तृत नामावळी हेंच असावें. परशुरामभाऊ आणि वामनराव पटवर्धन ह्यांनीं मराठ्यांची कोण भिंवरी उडवून दिली, ह्याविषयींचें वर्णन वाचणें असल्यास मोडककृत पटवर्धन सरदारांचा इतिहास पान ६२-६३ हें वाचण्याविषयीं आह्मीं आपल्या वाचकांस शिफारस करतों. तो वृत्तांत व पेशव्यांच्या बखरींतील वर्णन हीं दोन्हीं ताडून पाहिलीं असतां आमच्या वरील लेखाचा विचार वाचकांस चांगला करतां येईल. 'राघोबादादा पळत पळत बडोद्यास गेला आणि तेथें सहाय न मिळाल्यामुळें तेथून परत येत असतां, संपगांव, खंबायत आणि नापारगांव ह्या ठिकाणीं पटवर्धनांनीं दादांबरोबर भयंकर लढाया मारून दादांचा पूर्ण पराभव केला, हा मजकूर मोडकांच्या ग्रंथांत विशेष आहे. या तीन लढायांपैकीं नापारगांवाजवळील लढाईंत तर पटवर्धनांनीं इंग्लिशांचाही पूर्ण पराभव केला, असा स्पष्ट लेख बा. प्र. मोडक यांच्या ग्रंथांत आहे.

भरारी बहादर कल्याणास इंग्लिशांच्या मागें लपले! हा प्रकार ई. स. १७७९ त घडला. (पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव पान १२१-१२९ पहा)

## भाग ६ वा.

### बोरघाटांतील लढाया व कॅप्टनस्टुअर्ट यांचा मृत्यु.

परशुराम भाऊसाहेबांची चकमक दादासाहेबाबरोबर झडत असतां पटवर्धनांवर एक मोठा गहजब गुदरला. त्याविषयीं येथें दोन शब्द लिहिणें अवश्य आहे.

इ. स. १७७६ च्या सुमारास परशुरामभाऊंच्या कित्येक बंधुजनांनीं थोडथोड्या दिवसांच्या अंतरानें आपले प्राण समरदेवतेला अर्पण केले! मागें पटवर्धन कुलांतील कोणकोणते वीरश्रेष्ठ समरभूमीवर ठार झाले त्यांचीं नांवें वाचकांच्या लक्षांत असतीलच. त्या वीरवरांप्रमाणेंच इ. स. १७७६ मध्यें कार्तिक शुद्ध† ९ मीचे दिवशीं वामनराव गोविंद पटवर्धन, दादासाहेबांबरोबर झगडत असतां तापी दक्षिणतीर वरणगांव येथें परलोकवासी झाले!

† कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पान ६५-६६.

भाऊंचे सख्खे चुलतबंधु वामनराव गोविंद ह्या महात्म्याचा अंत झाल्यावर पुढें एकदम पांच पटवर्धनांची आहुती समरयज्ञांत पडली! हें पटवर्धनपंचक अस्तंगत होण्याचें कारण असें झालें कीं, पेशव्यांचे सैन्य दादासाहेबांकडे गुंतून राहून, परशुरामभाऊ राघोबा बरोबर झगडण्यांत गर्क झाला आहे, ही संधी पाहून पेशव्यांचें निरंतरचे हाडवैरी जे कोल्हापुरकर आणि म्हैसूरकर यांनीं पेशव्यांचे मुलखांत आवाडाव सुरू केली. त्यामुळें भाऊंचे बंधु व पुतणे जे पांडुरंग गोविंद आणि कोन्हेरराव त्रिंबक ह्यांस हैदरावर व कोल्हापुरकरावर स्वारी करणें भाग पडलें.

करवीरकराशीं पटवर्धनांनीं लढाई केल्यावर त्या उभयतांत तह होऊन नंतर हैदराबरोबर पटवर्धनांचे हात होऊं लागले! हैदराबादेकडे स्वारांचा व पायदळांचा भरणा मोठा असून पटवर्धनांचें सैन्य फारच थोडें, यामुळें उभय सैन्यांचा सामना होतांच पटवर्धनांचे लोक किंचित् कच खाऊं लागले. तरीही पटवर्धनांचें बीज मागें पाय घेणारें नसल्यामुळें ते राजभक्त वीर आपआपल्या पथकांसह एकदम उसळले आणि गर्दीमध्यें घुसून काटाकाटी करण्यास त्यांनीं आरंभ केला. ही लढाई सावशीकमडोळी येथें जुंपली. (इ. स. १७७७).

हैदराकडे ६००० पायदळ, ५००० स्वार आणि ९ तोफा इतका जयत सरंजाम असून सर्व फौज युद्धकौशल्यांत निपुण. त्यामुळें त्या लढाईंत पटवर्धनांचा अगदीं नाइलाज होऊन पटापट लोक मरून पडूं लागले. कोन्हेराव त्रिंबक पटवर्धन यांच्या छातींत गोळी लागून ते ठार झाले ! पांडुरंगराव गोविंद पटवर्धन यांच्या भाल्याची फेंक एकसारखी चालू असतां, त्यांचा घोडा एकाएकीं बुजून बेफाम झाला. इतक्यांत महमद कुमदान यानें त्यांच्या पाठींत भाला खुपसून डोकीवर तरवारीचे वार केले ! त्यामुळें ते मूर्छित होऊन खालीं पडले ! श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन यांच्या पाठींत गुरजाचा धप्पा लागून ते पतन पावले ! वासुदेव धोंडदेव पटवर्धन आणि पांडुरंग गोविंद पटवर्धन हे दोघे शत्रूंचे हातीं सांपडून पांडुरंगरावांनीं तर बंकापुर* येथें पिंजऱ्यांत असतांच प्राण सोडिला. कोन्हेरराव त्रिंबक यांच्या प्रेताचा मुदलींच ठिकाण नव्हता. तें चौथे दिवशीं प्रेतांच्या ढिगांतून ओळखून काढून नंतर त्यास अग्नि दिला. अशा रीतीनें पटवर्धनांचे पुरुष ह्या लढाईंत पडले. पुढें लवकरच परशुराम भाऊनें ह्याचा पूर्णपणें सूड उगवून टिपूच्या डोळ्यांतून टिपेंही पाडिलीं, ही गोष्ट खरी, तथापि पटवर्धनांच्या घराण्यांतले हे तरणेताठे बांड एकामागून एक

* रा. रा. मोडक्यांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पान ६९-७०.

गेल्याकारणानें, त्या घराण्यांतल्या किती अबला बिचाऱ्या * उघड्या पडल्या असतील, घरांत पोरवडा किती झाला असेल, आणि सर्व कच्चाबच्चांची भिस्त परशुरामभाऊंवर राहून ह्या उतारवयीं भाऊंचा दिल किती फाटून गेला असेल, ह्याचा विचार करण्याचें काम आह्मीं वाचकांवरच सोंपवितों.

असो. आतां हिकडे घाटामध्यें राघोबांनीं इंग्लिशांचा आश्रय संपादन केला ह्मणून मागील भा-

---

* पटवर्धन वीर लढाईंत पडल्याकारणानें त्यांच्या घराण्यांत विधवांची संख्या किती होती, ह्या विषयीं एक चमत्कारिक गोष्ट ऐकण्यांत येते. ती अशीः—

शेवटचे बाजीराव कोणत्या प्रकारचे होते हें जगविख्यात आहेच. ह्या बाजीरावांची पटवर्धनावर इतराजी होऊन, पटवर्धनांची जहागीर जप्त करावी असा विचार पेशव्यांचे मनांत आला. श्रीमंताच्या मनांतला तो बेत जाणून, परशुराम भाऊंनीं एके दिवशीं श्रीमंतास मेजवानी केली. बाजिराव साहेब पटवर्धनांचे वाड्यांत भोजनास आले. मेजवानीचा थाट वगैरे उत्तम प्रकारचा असून सर्वांचें जेवणखाण यथास्थित झालें. पुढें बाजीराव साहेब जावयास निघाले. दरवाजा जवळ जातात तों जवळील पडवींत १८ पत्रावळी मांडल्या असून आठरा विधवा खालीं माना घालून टिपें गाळीत भोजन करीत आहेत!! तो प्रकार पाहून श्रीमंतांनीं भाऊंस विचारलें कीं 'हें काय?' भाऊंनीं उत्तर केलें कीं 'पेशव्यांची गादी राखण्यामध्यें इतक्यांच्या नवऱ्यांनीं समरभूमीवर प्राण दिले असून पटवर्धनांच्या जहागिरीवर इतक्या विधवांचीं पोटें अवलंबून आहेत. असें असतांही पटवर्धनांची जहागिर जप्त करण्याची जर इच्छा असेल तर श्रीमंत समर्थ आहेत!!' हें ऐकून बाजीरावानें त्यावेळीं तो नाद सोडून दिला.

गांत सांगितलें आहे, त्याचा काय वृत्तांत आहे तो पाहूं.

दादासाहेब मुंबईस गेल्यावर त्यांनीं इंग्लिशां-बरोबर बोलणें लाविलें कीं, ' जर तुम्हीं पेशव्यांचे गादीवर मला बसवाल, तर तुम्हांस दोन * आणे मी आपले राज्यांत देईन. ' हें बोलणें झाल्यावर बरीच धरसोड चालू होती. परंतु पुढें एकंदर चार आणे घेण्याचें कबूल करून इंग्लिशांनीं राघो-बादादाचा पक्ष उचलला, आणि इष्टुरफांकडे ( कॅ-प्टन्स्टुअर्ट ), कर्नल इगर्टन, जनरल गॉडर्ड, क्याप्टन मॅके आदिकरून योद्धे रणभूमीवर हळूं हळूं झळकूं लागले.

पाश्चात्य लोकांची ती तयारी पाहून प्राच्यलोक-ही आपल्या तरवारी पाजवूं लागले. पुरंदर किल्ल्यावर श्रीमंत सवाई माधवराव लहान

* साष्टी, मुंबईजवळचीं कांहीं बेटें, वसई व गुजराथेंतील कांहीं प्रांत असा १९ लक्षांचा मुलूख घेण्याचें कबूल करून इंग्लिश राघोबाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं लढूं लागले. परंतु ' आरास ' येथें लढाई होऊन त्यांत फडक्यानें इंग्लिशांस बरेंच जर्जर करून सोडल्यामुळें इ. स. १७७६ त पुरंदरचा तह झाला व मुंबई सरकारावर अक्षम्य राघोबाला सहाय केल्याबद्दल ठपका येऊन इंग्लिशांनीं राघोबाचा पक्ष सोडला. परंतु पुढें इंग्लि-शांनीं पुनः दादांना पाठीशीं घातलें. तेव्हां नाना फडणिसांनीं-ही फ्रेंच लोकांस आश्रय दिला आणि त्यामुळें उभयतांची सलामी पुनः झडूं लागली.—पेशव्यांची बखर—पान १२६—१२७.

( ४।५ वर्षांचे ) असल्याकारणानें, पेशव्यांच्या अफाट राज्यसूत्राचा चालक जो नानाफडनवीस यानें ही पटवर्धन, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, धुळप, रास्ते, फडके इत्यादि सरदारांस सज्ज करून पाठविलें, आणि उभय सैन्यांचा सामना होऊन इंग्लिश व पेशवे यांच्या टकरा बोरघाटांत इ. स. १७८१ मध्यें झडूं लागल्या.

राघोबादादांच्या वतीनें भांडणारे इंग्लिश सेनापति जनरल गॉडर्ड, पलटणें घेऊन पनवेलीवरून खोंपवलीस येतांच, त्यांचे मागोमाग शिंद्यांची फौज बडोद्याचे रोखानें खोंपवलीचे जवळ पोहोंचली; पेशव्यांचा तोफखाना घेऊन धुळप व रास्ते बोरघाटाखालीं येऊन थडकले; हरिपंत फडके आणि मल्हारराव ह्यांनीं सह्याद्रीचें टोंक धारिलें, आणि गॉडर्ड साहेबांची रसद वाटेंतल्या वाटेंत मारून मुंबईची वाट बंद करण्याकरितां १२००० फौजेनिशीं परशुरामभाऊ घाटाच्या मधोमध दत्त उभा राहिला !

* याप्रमाणें पेशव्यांच्या सैन्याची शिस्त लागली; इतक्यांत कॅप्टन मॅके पनवेलीहून रसद आणीत होते

---

* बोरघाटांत परशुराम भाऊंनीं जनरल गॉडर्डची उडविलेली दुर्दशा—मोडककृत पटवर्धन सरदारांचा इतिहास ( कर्नाटक संस्थानें-भाग २-पान ७१-७३ ) व मराठ्याची बखर कलम, १० पहा.

त्यांवर परशुराम भाऊंनीं एकदम हल्ला केला. ती वेळ रात्रीची होती. मॅके साहेबांनीं तसाच दम धरून चौक्यापर्यंत मजल केली. परंतु उजाडतां उजाडतांच भाऊंनीं पुनः हल्ले करून साहेबांची सर्व रसद मारून आणली व ह्यांच्या दारुगोळ्याची नासधूस करून टाकिली. म्यॅकेही या प्रसंगीं शूरत्वानें लढले. परंतु परशुरामभाऊंपुढें त्यांचा. नाइलाज होऊन सर्व रसद भाऊंना देणें मॅकेला भाग पडलें.

त्या दिवशीं रात्र पडल्यावर मॅके साहेब पुनः पुढें चालले; ते पहाटच्या सुमारास खोपवलीजवळ येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं कांहीं लोकांचें सहाय मिळून राहिलेलें सामान जेमतेम गॉडर्ड साहेबांच्या छावणींत पावतें केलें !

नंतर तीन पलटणें, दहा तोफा व बहुतेक स्वार देऊन त्राऊन साहेबांची रवानगी पनवेलीस रसद आणण्याकरितां झाली. परंतु परशुरामभाऊ त्यास कोठची रसद आणूं देतो ? त्यानें वाटेंतच त्राऊन साहेबावर हल्ला करून रसद आणणारे सगळे बैल पकडून हरिपंत फडक्यांकडे रवाना केले. बैलांचा बचाव करण्याकरितां इंग्लिशांनीं होती तितकी पराकाष्ठा केली, पण भाऊंपुढें त्यांना हात टेंकावे लागले. इंग्लिशांची अगदीं दुर्दशा उडून त्यांना मुंबईहून आणखी कांहीं कुमक आणावी लागली. दररोज

निकराच्या लढाया होत असून कोणत्याच मुक्कामाला इंग्लिशांस भाऊंनीं चैन पडूं दिलें नाहीं.

आपले डेरे गेले, राहुट्या नेल्या, बंदुका हिसकल्या दारुगोळ्याचा भाऊनें नाश करून टाकिला हें पाहून गॉडर्ड साहेबांची अगदीं गाळण होऊन गेली, व पुण्यावर जाणें अशक्य आहे, असें त्यास वाटून त्यानें तेथूनच आडवाटेनें परत मुंबईचा रस्ता सुधारला.

गॉडर्ड साहेबानें मोठ्या तोफा व बुणगें खंडाळ्याहून खोंपवलीस पाठविलें. तें चौथे दिवशीं सुरक्षित पोहोंचलें. तेव्हां आपणही सुखरूप जाऊं असें त्यास वाटून ते निघाले; परंतु ते खंडाळा व कारलें यांचे दरम्यान येत आहेत इतक्यांत हरिपंत फडक्यांनीं त्यांवर अकस्मात हल्ला करून त्यांच्या २००० गोळ्यांच्या पेट्या लुटून फस्त केल्या. ह्या वेळीं होळकर कुसुरडें घाटाजवळ असून परशुरामभाऊही १२००० स्वारांनिशीं भीमाशंकराजवळ होतेच. गॉडर्ड साहेब फडक्याशीं झुंजत पुढें चालले. त्या दिवशीं बारांवर एक वाजेपर्यंत मराठ्याशीं झुंजतां झुंजतां खोपवलीहून चौक्यापावेतों पोहोंचेपर्यंत डेरे देऊन उतरावयास सुद्धां साहेबांना अवकाश मिळाला नाहीं. पुढून भाऊ व मागून तात्या असे दोघेजणही साहेबांस त्रास देऊं लागले.

गॉडर्ड साहेब अशा पेंचांत पडले आहेत इतक्यांत दैववशात कॅप्टन्स्टुअर्ट (इष्टुरफांकडा) कट्या सरंजामानिशीं कारल्याच्या नजीक येऊन थडकले ! ते स्वतः महान् पराक्रमी असून त्यांनीं आणलेलीं पलटणेंही शिकलेलीं; ह्मणून ह्या बिकट प्रसंगीं ही कुमक येतांच स्टुअर्ट साहेबांनीं फेर झाडण्याला एकदम सुरवात केली. त्यांच्या सैन्याचा जमाव मोठा असून आगीचा मारही जबर, ह्यामुळें पेशव्यांच्या सैन्यावर एकसारखी सरबत्ती सुरू होऊन तो सगळाच रंग एकदम पालटला ! गॉडर्ड साहेबांचा पराजय होऊन इंग्लिशांच्या पदरीं अपयश येण्याचा जो समय येऊन ठेपला होता, तें सगळेंच एकीकडे राहून कॅ० स्टुअर्ट यांनीं झाडलेल्या फेरेमध्यें पेशव्यांच्या सैन्याची, व सेनानायकांची होळी होते कीं काय असें वाटूं लागलें ! होळकर, धुलप, रास्ते, फडके इत्यादिकांनीं आपल्याकडून होती तितकी पराकाष्ठा केली, परंतु स्टुअर्टच्या भडिमारापुढें त्यांचा कांहींच उपाय चालेनासा झाला! सर्व लोक हवालदील होऊन गेले ! पुरंदरास त्यावेळपर्यंत जें आनंदाचें वर्तमान पोहोंचत होते, तें नाहींसें होऊन विपरित वर्तमानाची डांक येऊन पोहोंचली ! इंग्रज आटपत नाहीं हें ऐकून पुरंदरावर नाना व बापु यांच्या तोंडचें पाणी पळालें. नानांनीं सरकारचा तोफखाना

बरोबर देऊन * पानसे यांची तावडतोब रवानगी केली. ‘कसेंही करून इंग्रज जिंकलेच पाहिजेत’ अशा अर्थाचीं पत्रें नानांकडून हरिपंत फडके यांस एकसारखीं येऊं लागलीं! पुरंदर आणि बोरघाट येथून डांकेवर डांक सुटूं लागली! पुण्यांतील लोकही फार गडबडून गेले! चोहोंकडे हाहाःकार झाला! पेशवाई आतां ठार बुडते असें सर्वांस वाटूं लागलें! पुढें काय वाढून ठेवलें आहे कोण जाणें, असें सर्वांस वाटून जो तो चिंतेमध्यें अगदीं चूर होऊन गेला! कि-

---

* बोरघाटांतील लढाईचें वर्णन निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळ्या रीतीनें दिलेलें आहे. त्याचा मेळ पेशव्यांच्या बखरींतील वर्णनाशीं पुष्कळ ठिकाणीं जमत नाहीं. पेशव्यांची बखर, मोडककृत इतिहास, व मराठ्यांची बखर हीं तिन्हीं पुस्तकें लक्षपूर्वक वाचून त्यांतील वर्णनें परस्परांशीं ताडून पाहिलीं तरच ह्या वरील लेखाचा चांगला विचार करतां येईल, व तो विसंगत आहे असें वाटणार नाहीं. पेशव्यांच्या बखरींत पानसे व महादजी शिंदे यांस मागून रवाना केलें, असें वर्णन आहे, परंतु अवांतर ग्रंथांत शिंदे पूर्वीपासूनच लढत होते, असें वर्णन आहे. शिवाय कॅपटन स्टुअर्ट ( बखरींतील इष्टुरफांकडा ) कारलें येथें पडल्यावर मग बोरघाटांत गॉडर्ड साहेबाचा व पेशव्यांच्या सैन्याचा सामना झाला, असा ग्रांटडफ ( व मराठ्यांची बखर ) यांचे ग्रंथांत मजकूर आहे. परंतु पेशव्यांच्या बखरींत तसा मजकूर मुळीच नसून त्यांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं बोरघाटांत जनरल गॉडर्डचा पराभव झाल्यावर मग इष्टुरफांकडा पलटणें घेऊन बोरघाटांत आला, व पेशव्यांकडील लोकांचा व इष्टुरफांकड्याचा भयंकर संग्राम होऊन त्यांत शेवटीं पेशव्यांसच जय आला; व इंग्लिशांचा पराभव होऊन सालप्याचा तह ठरला. ( पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान १२६ टिपेसुद्धां + पानें १२७-१२८-१२९-१३० ) पहा.

त्येकजण आपआपला गाशा गुंडाळूं लागले ! ब्रह्महत्या करणाऱ्या फितुरी राघोबाला यशप्राप्ति झाली असतां, त्याला उपयोगीं न पडावा, व म्लेंछांच्या छलानें श्रीमंतांच्या उपभोग्य वस्तूंची व्यर्थ विटंबना न व्हावी, ह्मणून शनवारच्या वाड्यांत कडबा भरून वेळ आलीच तर तो जाळून * फडशा करावा, अशी सरकारांतून ताकीद येऊन ठेपली ! अशा रीतीनें पुण्यामध्यें व आसमंतात् भागाच्या प्रदेशांत धामधुम सुरू होऊन, जिकडे तिकडे उदासीनपणाचा भयानक देखावा दिसूं लागला ! !

तिकडे बोरघाटांत घनघोर समरप्रसंग माजून जयश्रीची माळ कोणाच्या गळ्यांत पडते इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. पानशांचा तोफखाना येऊन पोहोंचतांच पेशवे-पक्षीय मंडळीस उमेद आली. पाटिलबोवांनींही † असन्या मागें सारून विशेष लगट केली. परशुरामभाऊ आणि हरिपंततात्या यांनीं मनावर घेऊन जिवाची पर्वा न करितां बेधडक चाल केली. तशांत सुदैवेंकरून वाराही अनुकूल असाच वाहूं लागला ! मोठा प्रचंड वारा एकाएकीं

---

* हें वर्णन वाचीत असतां नेपोलियन बोनापार्टाचे दिग्विजयाचे वेळीं मॉस्को शहराची कशी अवस्था झाली त्याविषयीं आठवण झाल्याशिवाय वाचकांस रहावयाची नाहीं. !

† शिंदे.

सुटून पेशव्यांच्या फौजेच्या पाठीवर व इंग्लिशांच्या तोंडावर सपासप बसूं लागला. तेणेंकरून पेशव्यांच्या फौजेला अनायासेंच सहाय्य होऊन इंग्लिशांस तो तापद झाला! अजिंक्य आरमाराचा धुव्वा उसळून देणारें वायु अस्त्र ज्याप्रमाणें इलिझाबेथ राणीस प्राप्त झालें, त्याप्रमाणेंच पेशव्यांसही ह्या समयीं अंजनीपतीनें पूर्ण साहाय्य केलें. श्रीमंतांच्या बलवत्तर दैवाचा तो प्रभाव पाहून तात्यांनीं एकदम उठावणी केली. त्यांनीं मोठमोठीं बक्षिसें लावून सर्व सैन्यांत इर्षा उत्पन्न केली. ते गर्जून ह्मणाले कीं:—'लढाईंत आज *खासा पडला, तरच पेशव्यांच्या पदरीं राहिल्याचें सार्थक. नाहीं तर धिक्कार असो आमच्या सरदारीला, तरवारीला आणि पुरुषपणाला. †यःकश्चित इंग्रज ते काय, आणि त्यांनीं आमची त्रेधा ती काय उडवावी! मर्दुमकी दाखविण्याची हीच वेळ, श्रीमंतांची कृपा संपादण्याचा हाच समय! आणि इंग्रजांचा पराजय करून बहादुरी मिळविण्याचा हाच काल! तर गडेहो, आतां चला आणि आपला पराक्रम दाखवून पेशव्यांचा यशोध्वज ह्या कारल्याच्या समरांगणांत फडकावा.'

---

* कॅप्टनस्टुअर्ट (पेशव्यांच्या बखरींत यांना इस्तुर फांकडे असें ह्मटलें आहे.)

† पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान १२८ पॅरिग्राफ २ रा पहा.

तात्यांच्या तोंडचीं तीं वीरश्रीजनक भाषणें ऐकतांच पेशव्यांकडील तोफ झपाट्यानें धडाडूं लागली. होळकर, रास्ते, पानसे, यांनीं शत्रुसमूहावर गोळ्यांची महावृष्टि केली. *परशुरामभाऊनें आपलें पथक पुढें करून तोफांचा भडिमार चालविला. पेशव्यांकडील सव्वालाख (१२५०००) फौजेचा कट्टा सरंजाम. तोफांशीं तोफा लागून राहिल्या. पायदळांच्या बंदुकांची फेर विलक्षण झडूं लागली! धुरानें दिशा धुंद होऊन गेल्या! तशांत धुळीचे लोट आणि वाऱ्याचे झोत! भयंकर अंधःकार माजून धडाड्धडाड् शब्दांनीं दिग्मंडळ दणाणून गेलें. शरदृतूंतील दुर्दिन कालीं मेघमंडळांत चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें, त्या समरभूमीवरील घनघोर मिट्ट काळोखांत सरबत्तीच्या वेळीं अग्नीचे झोत झळकूं लागले, व तोफांचे आवाज कडाडूं लागले! प्रचंड वाऱ्यानें इंग्लिशांची तारंबळ फारच उडूं लागली. पुरामुळें पेशव्यांकडील से-

* पटवर्धन वीरांच्या विस्तृत नाममालिकेमुळें पृथक रीतीनं जरी त्यांच्या नांवनिशींचा उल्लेख ह्या लढाईच्या संबंधानें पेशव्यांच्या बखरींत केला नाहीं, तथापि पटवर्धनांचे कागदपत्र आणि मोडककृत पटवर्धन सरदारांचा इतिहास पानें (७१+७२+७३+ओळी १६, १७) हीं जर लक्षपूर्वक वाचून पाहिलीं, तर असें स्पष्ट दिसून येईल कीं ह्या घाटांतील लढाईचें श्रय भाऊंचें आहे.

त्याचा कांहींच अजमास इंग्लिशांस लागेना. वाऱ्याच्या सोसाट्यासरशीं इंग्लिशांची फौज आंतच पाय घरूं लागली. पेशव्यांकडे लोक किती आहेत त्याचा अंदाज काढावा ह्मणून कॅ० स्टुअर्ट बरेंच दूर गेले, आणि एका उंच झाडावर बसून दुर्भिणीनें पेशव्यांच्या सैन्याची टेहळणी करूं लागले. इतक्यांत हरिपंत फडक्यांची नजर त्या झाडाकडे जाऊन, पहातो तों 'इंग्रज झाडावर बसून दुर्भिणीनें सैन्याची टेहळणी करीत आहे.' तेव्हां त्यांनीं जवळ असलेल्या गोलंदाजाला लागलीच इशारत करून 'हं! पहातोस काय. दे बत्ती, हीच वेळ आहे' अशी हूल केली. त्याबरोबर गोलंदाजानें निशाण धरून नेमानें तोफ डागली व कॅप्टन स्टुअर्ट झाडावरच्या झाडावरच ठार केला!!*

---

* स्टुअर्ट पडला त्यावेळीं पुरंदर किल्ल्यावर एक चमत्कारीक गोष्ट घडल्याविषयीं बखरींत लिहिलें आहे. ती गोष्ट अशी:–

इंग्रज आटपेनासे झाल्याची बातमी पुरंदरावर पोंचली. त्या वेळीं नानाफडनवीस, सखारामबापु वगैरे मंडळी खिन्न होऊन श्रीमंत सवाईमाधवराव जेथें निजले होते, तेथें पलंगाजवळ बसली होती सवाईमाधवराव जागे होऊन पहातात तों, सर्व जण म्लानवदन दिसत आहेत नंतर असें होण्याचें कारण काय म्हणून श्रीमंतांनीं विचारिलें. 'इंग्रज आटपत नाहीं ह्मणून आह्मी दिलगीर आहोंत' असें बापूंनीं सांगितलें. तेव्हां 'काय इंग्रज आटपत नाहीं?' असें विचारून त्या बालराजानें आपली तलवार मागविली व पलंगावर उभे राहून तीन वेळ गर

(पुढें चालू.)

ज्याच्या शिकलेल्या पलटणींनीं शिंदेहोळकरांसारख्या वीरवरांच्या तोंडचें पाणी कांहीं वेळ पळविलें, ज्याच्या फेर झाडणीच्या जबर मारामुळें पेशव्यांची पेशवाईही कांहीं वेळ डोलूं लागून पुरंदर व पुणें येथील लोकांचीं धाबीं दणाणून गेलीं, व जो, 'फांकडा' या जवानमर्दाच्या पदवीला सर्वथैव योग्य, असा कॅप्टन स्टुअर्ट कारलें येथें पडल्यावर इंग्लिशांनीं अगदींच हातपाय गाळले. शरिरांतील प्राणवायु निघून गेल्यावर ज्याप्रमाणें सर्व अवयव गलित होऊन जातात त्याप्रमाणें इंलिशांच्या सैन्यांतील फांकडा गेल्यावर तें अगदीं हतवीर्य होऊन गेलें. गॉडर्ड साहेबांस तीन* जखमा लागल्या. †इंग्लिशांकडील १८ गोरे लोक ठार झाले. शिवाय जख-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

गर् गर् अशी तलवार आपले भोंवतीं फिरवून उत्तर दिलें कीं 'इंग्रज ठार झाला'! इतक्यांत घाटांतून फत्ते झाल्याची डांक आली कीं 'खासा इस्टुर फांकडा ठार झाला व इंग्रज फौजेसुद्धां घाट उतरून पळत गेले'!! हें आनंदाचें वर्तमान ऐकतांच आनंदाच्या तोफा सोडण्यास सरकारांतून हुकूम झाला व सैशेन वाजूं लागले!!—पेशव्यांची बखर पान १२९.

* मोडकक्कृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास--पटवर्धन सरदार—पान ७३ ओळ १३ वी

† बोरघाटांत इंग्लिशांची दुर्दशा आणि पराजय ( मराठ्यांची बखर भाग २४ कलम १० पान १३१ ). सालच्याचा तह--मराठ्यांची बखर भाग २५ कलम १३

मी व मेलेल्या काळ्या लोकांची संख्या ४४८ होती. या सर्व सैन्याचा अधिपती जो कर्नल पारकर तोही या दंगलींतच ठार झाला ! !

पुढें* आणखी कित्येक लढाया होऊन अखेरीस महादाजी शिंद्याच्या विद्यमानें सालपें मुक्कामीं इंग्लिशांचा व त्यांचा ( इ. स. १७८२ त ) तह झाला. त्या तहांतील मुख्य कलमें अशीं होतीं कीं:—

१ पुरंदरचा तह झाल्या पासून इंग्लिशांनीं जो मुलुख मराठ्या पासून घेतला असेल तो त्यांचा त्यांस परत द्यावा.

२ भडोंच जवळचा तीन लक्षाचा मुलुख पुरंदरच्या तहांत पेशव्यांनीं इंग्लिशांस देऊं केला होता तो आतां इंग्लिशांनीं मागतां कामानयें.

३ राघोबाचा पक्ष इतःपर इंग्लिशांनीं न घेतां त्यास दरमाहा २५००० रुपये खर्चास देऊन त्यानें कोंपरगांवीं रहावें.

या प्रमाणें तह ठरून उभयपक्षीं लढाई बंद झाली.

पुढें लवकरच राघोबादादा कोंपरगांवीं मृत्यु पावल्यामुळें ह्या भयप्रद कलहाग्नीचें कारण आपो-

* ह्या चरित्राशीं त्या लढायांचा संबंध नसल्यामुळें त्या येथें दिल्या नाहींत.

आप नाहिसें झालें, आणि मुत्सद्दी लोकांचे हातून राज्य सुयंत्र रीतीनें चालूं लागलें. राघोबादादा मृत्यु पावला त्या वेळीं त्याला औरस दोन व दत्तक एक असे तीन पुत्र होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें बाजीराव चिमाजी आप्पा आणि अमृतराव अशीं होतीं. प्रसिद्ध आनंदी बाई पुढें कांहीं वर्षांनीं मृत्यु पावल्यावर फडणिसांनीं हें पुत्रत्रय उचलून शिवनेरी किल्ल्यांत मोठ्या कडेकोट बंदोबस्तानें ठेविलें.

---

## भाग ७ वा.

### बदामीचा वेढा व टिपुसुलतानावर स्वाऱ्या.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें राघोबाचें निर्दलन झाल्यावर पेशव्यांचे प्रजेस कांहींकालपर्यंत शांततेचें सुख प्राप्त झालें; आणि त्यामुळें परशुरामभाऊची जी समशेर कैकवर्षें नातातऱ्हेच्या रक्ताची चव घेण्यांत अगदीं गर्क होऊन गेली होती, तिलाही त्या कृत्याचा किंचित् विट येऊन कांहीं वेळ ती आपल्या घरांत आराम पावली.

इ० स० १७८२त पुण्यामध्यें श्रीमंतांचा *वि-

---

* सवाईमाधवरावांचा विवाह समारंभ इतका टोलेजंग झाला कीं, सगळ्या पेशवाईंत इतकी अन्नशांति, दानधर्म, थाटमाट समज, किंवा ऐश्वर्य हीं कधींच कोणीं पाहिलीं नाहींं ! त्यावेळीं भरतखंडाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचे सर्व राजे रजवाडे तमाम हजर असून सर्व राजधानी कैक दिवस बोलूं लागली होती ! ( पेशव्यांची बखर पान १३५-१४४ )

वाह समारंभ झाला. त्यावेळीं पेशव्यांचें वय ९ वर्षाचें होतें. नानाफडणिसांच्या बिनधोक कारकी-र्दीसही याचवेळीं सुरवात होऊन पेशव्यांच्या दरबारीं फडणीसांला प्रतिकूल असा कोणीच पुरुष न रहातां, नाना करतील ती पूर्वदिशा असाच प्रकार होऊन गेला. कारण पेशव्यांच्या दरबारीं नानाप्रमाणेंच दुसरा चतुर पुरुष जो सखारामबापु बोकील त्याचा सुद्धां फितुर* मोठ्या चातुर्यानें पकडून ह्या अर्ध्या शहाण्यानें सगळ्या शहाण्याची अक्कल गुंग करून सोडिली! व त्याला सिंहगड किल्ल्यावर टाकून त्याच फितुरांतले दुसरे दोन साथीदार जे मोरोबा-दादा फडणीस आणि बाळदीक्षित कर्वे, ह्यांसही अ-नुक्रमें नगर आणि रायगड ह्या किल्ल्यांवर कारागृ-हांत टाकिलें!! बिचारा सखारामबापू तर सिंहग-डावरून प्रतापगडावर व प्रतापगडावरून रायगडावर नाचतां नाचतांच हाल अपेष्टा होऊन मृत्यु पावला. आणि तेणेंकरून नानांचें राज्यकारस्थान निष्कंटक चालू होऊन जिकडे तिकडे फडणिसांची छाप बसली!

परशुरामभाऊ पटवर्धनाच्या पथकांतले लोक समर प्रसंगांतून निघून मिरज तासगावाकडे कोठें हायसे बसतात, तोंच हैदरबहादरांचे चिरंजीव जे टिप्पू-सुलतान् ह्यांनीं दीन् करून कर्नाटकांत आरोळी ठोकि-

* पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव-पान १३१-१३२ पहा.

ली ! प्रजाजनास त्राहि त्राहि करून थोरल्या माधवरावाबरोबर झुंजणारा जो कपटपटु हैदर अल्ली, तो इ. स. १७८२ च्या डिसेंबर महिन्यांत पैगंबराच्या भेटीला गेल्यावर त्याच्यामागें त्याचा पुत्र टिप्पू यानें सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत 'बापसे बेटा सवाई' या न्यायानें आपली अघोरकर्मप्रविणता दाखविण्यास सुरवात केली ! कर्नाटकांत जे सरदार व देसाई वगैरे वतनदार होते त्यांजपासून अधिक खंडणी मिळावी ह्मणून त्यांच्यावर जुलूम करूं लागला. पेशव्यांबरोबर केलेला ताजा† तह, बगलेंत मारून त्यानें पेशव्यांचे व पटवर्धनांचे आप्त जे नरगुंदकर, यांच्यावर हल्ला केला ! नरगुंदकराच्या खपसुरत कन्येवर झडप घालून त्या मदांधानें तिला भ्रष्ट करून सोडिलें ! ! बायका पोरांचा छळ केला ! त्यांस काबुलदुर्ग येथें कैदेंत ठेवून नरगुंदकरांचा कारभारी जो काळोपंत, याला श्रीरंगपट्टणास खेचित नेलें ! ह्या ह्मैसूरच्या व्याघ्रानें केवळ नरगुंदकराच्याच नरडीचा घोट न घेतां सर्व करनाटक प्रांतांतील हिंदूंस त्यानें रानोमाळ पळिवलें ! त्या दुष्ट लांडग्याच्या दाढेंत

† बदामीचा किल्ला लढण्यापूर्वी टिप्पूच्या दुराचरणामुळें त्याच्यावर स्वारी करून परशुरामभाऊनें त्याजकडून तह करविला होता. परंतु त्यानें बापाचा कित्ता पूर्णपणें वळविलेला असल्यामुळें भाऊंचें सैन्य अंमळ हिकडे तिकडे होतांच सुलतान साहेब पुन्हां गडबड करूं लागले.

सांपडलेल्या ब्रह्मवृंदाची तर फारच दुर्दशा उडाली. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत समशेर घेऊन दीन् दीन् शब्दानें भयप्रद गर्जना करीत ह्या सुलतानरूप सैतानानें सुंता* करण्याचा झपाटा लाविला ! ! ! 'धर ब्राह्मण, ठोक सुंता, किं घाल गोमांस तोंडांत', असा त्यानें प्रलय माजविला ! सर्व देशभर 'अब्रह्मण्यं, अब्रह्मण्यं' असा एकच करुणारव नादूं लागला. शेंकडों ब्राह्मण भ्रष्ट झाले ! टिप्पूवर अभिशाप, तळतळाट, आणि जंजाळ यांची महावृष्टि झाली ! २ हजार ब्राह्मणांनीं जिभा हांसडून प्राण दिले ! कैक पतिव्रतांनीं कावेरी नदींत उड्या घेतल्या ! नको नको हा जीव, असें सर्वांस होऊन त्या शिखानष्टाच्या क्रोधाग्नीनें दग्ध झालेल्या शेंकडों ब्राह्मणांनीं पेशव्यांच्या दरबारीं येऊन हंबरडा फोडिला ! !

व्यंकटराव नरगुंदकराची ती विटंबना व ब्रह्मसमुदायाचा तो छल ह्यांच्या योगानें सर्वांच्या आंगावर कांटा उभा राहिला ! पुण्यांतील सर्व लोक चवताळून गेले ! टिप्पूसुलतानाचा चेंदामेंदा केव्हां करूं असें सर्वांस होऊन गेलें ! नानाफडनवीस अत्यंत क्रोधायमान् झाले. पेशवाईच्या भव्यमनोऱ्याचे खं-

* कर्नाटक संस्थानाचा इतिहास—पटवर्धन सरदार–पान ७४–७९ व मराठ्यांची बखर भाग २९ कलमें १–२ पहा.

बीरखांव जे परशुरामभाऊ पटवर्धन आणि हरिपं-तताल्या फडके, यांस कंबर कसण्याविषयीं नानां कडून इशारत झाली. परशुरामभाऊ तर त्या सुमारास नानाफडणिसाच्या नाकचे बाल होऊन राहिले होते, भाऊंच्या इमानीपणावर, मर्दुमकीवर आणि दृढनिश्चयावर नानाफडणीसांची सर्व भिस्त असून, भाऊ आहे तर पेशवे सुरक्षित आहेत, भाऊ आहे तर पेशवाई आहे, भाऊ आहे तर नानाफडणीस आहे, आणि भाऊ आहे तर सर्व कांहीं आहे, असाच प्रकार त्यावेळीं होऊन गेला होता !

असो, नानांची आज्ञा होतांच भाऊ, तात्या, शिंदे, होळकर, यांच्या फौजा टिपूवर रवाना झाल्या. पेशव्यांचा सैन्यसमुदाय करनाटकांत जातो आहे इतक्यांत निजाम अलीशीं तहकरून त्याचें ही सैन्य नानांनीं पेशव्यांच्या फौजेस मदत करण्याकरितां पाठविलें. इंग्लिशलोकांचीही मदत यावेळीं नानांनीं मागितली होती, परंतु इंग्रज बहादरांनीं तिकडे कानाडोळा* करून ते दुरूनच तमाशा पाहूं लागले ! नेहमींप्रमाणें परभारें पावगेतेरा असें न करितां फडणिसांचेंही एक प्रधान † पात्र ह्या लढाईंत होतें.

† मराठ्यांची बखर भाग २९ पान १४६ कलम ६वें.

* मराठ्यांची बखर भाग २९ कलम ३ पान १४५.

जिकडल्यातिकडे व्यवस्था लावल्यावर नाना,*सरकारची फौज घेऊन भाऊंच्या फौजेस जाऊन मिळाले.

याप्रमाणें सर्व सैन्य एकत्र झाल्यावर इ० स० १७८६ च्या मे महिन्याच्या ९ व्या तारखेस टिपूच्या प्रख्यात बदामी† किल्ल्यावर पेशव्यांच्या सैन्यानें हल्ला केला. ह्या प्रचंड किल्ल्याचें शहर विस्तृत मैदानांत असून भोंवतीं एक मजबूत तट बांधिलेला आहे. मध्यभागीं भव्य गढी असून तटाच्या बाहेरल्या अंगास दोन बाजूंस दोन बळकट किल्ले आहेत. मराठ्यांनीं तटबंदी फोडण्याचा प्रथम उपाय चालविला. पटवर्धनांच्या व फडक्यांच्या लोकांनीं तोफेचा धडाका सुरू केला. शिंदेहोळकरांची फौजही जोरानें व एकदिलानें फेर झाडूं लागली. तटाभोंवतीं मराठ्यांचे लोक एकसारखे २० दिवस दांतओंठ खाऊन झटापटी घेत होते, परंतु बदामीच्या तटानें त्यांस मुदलींच दाद दिली नाहीं ! ! पेशव्यांकडील सैन्य गडबडून गेलें. किल्लेदारानेंही आंतून तोफांचा भडिमार मराठ्यांवर चालविला.

* मागें नाना फडणिसांच्या शहाणपणाबद्दल हैदराबादच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली ती याच प्रसंगीं ( बदामीचा प्रख्यात वेढा ) घडली.

† बदामीची लढाई — ( करनाटक संस्थानांचा इतिहास-पटवर्धनसरदार—पान—७९ ) आणि मराठ्यांची-बखर भाग २५-कलमें ४ पासून ८.

दोन्हीकडील शेंकडों लोक भाजून मेले. ह्या लढाईंत हैदराबादकराचे लोक मात्र लढत असून निझाम-अल्ली आधींच सवत्र सांगून निघून गेले होते व होळकरही टिप्पूचीं इतर ठाणीं घेण्यांत गुंतले होते, ह्मणून शिंद्यांच्या व पेशव्यांच्या सरदारांनांच विशेषें-करून बदामी लढावा लागला.

तट फोडण्याचा कांहींच इलाज चालत नाहीं असें पाहून मेमहिन्याच्या २० व्या तारखेस शिड्या लावून तटावर चढण्याचा मराठ्यांनीं प्रयत्न चालविला. तों किल्ल्यामधून ३५००० लोकांची मांड एकाएकीं तटावर येऊन पेशव्यांच्या लोकांस ते धडाधड शिड्याखालीं ढकलून देऊं लागले. शिवाय किल्ल्यासभोंवार दारूचे बुधले जागोजाग बदामीकरांनीं पुरून ठेविले होते, त्या बुधल्यांना एक-दम बत्ती देऊन बदामीकरांनीं पेशव्यांचे सैन्याची पुष्कळ राळ मांडली !

ती नासाडी व ती अप्रतिष्ठा पाहून भाऊ, तात्या आणि महादजी शिंदे खदिरांगारासारखे लाल होऊन गेले. त्यांस तो अपमान सहन न होऊन त्यांनीं एकच गर्जना केली, आणि वीरश्रीजनक भाषणांनीं टिप्पूच्या अघोर कर्माचे मूर्तिमंत पुतळे सैनिकांच्या डोळ्यांपुढें हुबेहूब उभे करून ' आज मारूं किंवा मरूं ' असा प्रोत्साह त्यांचे ठिकाणीं उत्पन्न केला.

मग संपूर्ण सैन्यानें एकच हल्ल करून किल्लेदारांच्या भडिमारास व दारूच्या भडक्यास न जुमानतां बदामीवर एकदम चाल केली. कांहीं लोकांनीं किल्ल्याच्या तटावर उभे असलेल्या लोकांवर गोळ्यांची अतिवृष्टि केली ! कांहीं लोक जिवाची पर्वा न करितां भराभर शिड्यांवरून चढून जाऊन तटावरील लोकांस तटाच्या आंत व बाहेर झुगारून देऊं लागले आणि बाकीचें सर्व सैन्य निरनिराळ्या मार्गांनीं शिड्या लावून एकदम आंत उतरलें !

दृढनिश्चय, एकोपा आणि हिय्या या तीन गोष्टी किती अजब कर्तबगारी करतात, ह्याचें ढळढळीत उदाहरण दाखवून, पेशव्यांचे लोक आंत शिरतांच किल्ल्यांतील लोकांचें अवसान सुटलें. ते तेथून पळून बदामीच्या दोहों बाजूंस जे दोन किल्ले आहेत, त्यांत जाऊन राहिले व पेशव्यांकडील ज्या कित्येक लोकांनीं त्यांचा पाठलाग केला, त्यांच्या आंगावर मोठमोठे दगड लोटून बंदुकांचाही मारा चालविला. तथापि पेशव्यांकडील सैन्यानें कशाचीच पर्वा न करितां बेधडक वर जाऊन दोन्ही किल्ले व बदामी किल्ल्याची गढी काबीज केली. किल्लेदार शरण आल्यामुळें त्यास जीवदान दिलें आणि बदामीवर पंतप्रधानांचा विजयध्वज फडकाविला !

बदामी सर झाल्यावर नानाफडणीस परत पु-

ण्यास आले, आणि हरिपंतांनीं गजेंद्रगड, कोपाळ इत्यादि नामीनामी किल्ले एकामागून एक सर करण्याचा झपाटा लाविला. आपल्या संपूर्ण राज्याचें नाक असा जो बदामीचा किल्ला, तो काबीज केल्यामुळें अत्यंत क्रुद्ध होऊन फडक्यांच्या चिंध्या करण्याकरितां टिप्पू कडेकोट तयारी करून हरिपंतांवर चालून आला; परंतु सावनूरच्या मैदानांत फडक्यांची उत्तम तयारी पहातांच त्याची कंबर खचली आणि हें पेशव्यांचें सैन्य कसेंतरी करून माझे मुलुखांतून परत जावो, असें त्यास होऊन त्यानें तुकोजी होळकराला मध्यस्थि करण्याची विनंति केली आणि आपण तह करण्यास मान्य झाला. ( १७८७ )

ह्याला झालें इतकें शासन पुरें आहे असें हरिपंततात्यांस वाटून त्यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें तहाच्या *अटी टिप्पूकडून कबूल करविल्या आणि पेशव्यांचें सैन्य परत माघारें फिरविलें !

तो तह येणेंप्रमाणें:—

१ किनूर, नरगुंद आणि बदामी हीं तिन्हीं, टिप्पूनें मराठ्यांस दिलीं पाहिजेत !

* कर्नाटक संस्थानांचा इतिहास-पान ७९ आणि मराठ्यांची बखर-भाग २९-कलम ८-पान १५८.

२ पंचेचाळीस लक्ष ( ४५००००० ) रुपये टिपूनें पेशव्यांस दिले पाहिजेत !

३ सावनूरच्या नबाबाला टिपूनें आपल्या मुलखाचा कांहीं भाग दिला पाहिजे !

टिपूनें तुकोजी होळकराच्या मध्यस्तीनें तह केला तो फार दिवस टिकला नाहीं. आजपर्यंत तो फक्त पेशव्यांची मात्र कुरापत काढीत होता. परंतु इ. स. १७८९—९० चे सुमारास पेशवे, निजाम, आणि इंग्लिश ह्या तिघांचींही मनें दुखवून त्यानें आपणास तीन शत्रु उत्पन्न केले. तहाप्रमाणें मराठ्यांस दिलेले कित्तूर परत हिसकावून घेतलें ! आणि बेदनुराजवळ मोठी फौज जमवून सर्व कोंकणपट्टी मराठ्यांपासून परत घेण्याचा त्यानें घाट घातला ! लहान मोठ्या कुलाचा विचार न करितां, तुमचा आमचा कांहीं शरीरसंबंध व्हावा, असा गर्वानें निजामाला निरोप पाठवून त्याचा घुस्सा टिपूनें आपणावर करून घेतला; आणि इंग्लिशांस सहाय्य करणारा जो त्रावणकोरचा राजा त्याच्यावर हल्ला करून इंग्लिशांबरोबरही त्यानें वितुष्ट पाडून घेतलें !

अशा रीतीनें तिन्ही ठिकाणीं वैरभाव आणि वैमनस्य ह्यांची समृद्धि केल्यामुळें, त्या तिघांनीं, साधारण शत्रू जो टिपूसुलतान ह्याचें उन्मूलन करण्याचा निश्चय केला. निजाम, पेशवे, आणि इंग्लिश

ह्यांचा पुणें मुकामीं बेत ठरला कीं, *तिघांनीं मिळून सुलतानावर मोहिम करावी आणि टिप्पूकडून जो मुलूख व जी खंडणी येईल ती तिघांनीं सारखी वांटून घ्यावी. शिवाय स्वतंत्र रीतीनें कोणी मुलुख मिळविल्यास त्याची हिस्सेरसी न करितां संपादकानेंच त्याचा पूर्ण उपभोग घ्यावा.

याप्रमाणें विचार ठरल्यावर तिघांकडील योद्धे आपला जयत सरंजाम घेऊन बाहेर पडले. मुंबईहून दोन पलटणें व सहा तोफा घेऊन कॅप्टन् लिट्ल् साहेब आंबेघाटांतून वर चढले. मोगलांचें सेनापत्य निझामानें पतकरलें आणि परशुरामभाऊ पटवर्धन पंतप्रधानांच्या सैन्यावर अधिपति असा झळकूं लागला.

शिंदेहोळकरांसारखीं मोठमोठालीं धेंडें एकीकडे टाकून टिप्पू सारख्या जबरदस्त शत्रूवर चालून जाण्याकरितां परशुरामभाऊंस स्वतंत्र सेनाधिपत्य मिळणें ही लहानसान गोष्ट नव्हे. पेशव्यांच्या दरबारीं ह्या अलौकिक पुरुषाचें तेज कांहीं विलक्षण पडत असून पराक्रमपर्वताच्या अत्युच्च शिखरावर हा भाग्यशाली पुरुष त्या कालीं पूर्णपणें स्थानापन्न झाला होता, ह्याविषयीं त्याचें स्वतंत्र सेनाधिपत्यच साक्ष देत आहे. असो.

---

* पटवर्धन सरदारांच्या इतिहास–पान ७६ व मराठ्यांची बखर–भाग २६–कलमें १–३.

परशुरामभाऊ आणि कॅप्टन् लिट्ल् हे सैन्यास-हवर्तमान करनाटकांतून जात असतां असा चमत्कार झाला कीं टिप्पूची रयत परशुरामभाऊंच्या लोकोत्तर शौर्यास भुलून जाऊन सुलतानाचें जूं दूर झुगारून् देऊं लागली व त्याचे लोक भराभर भाऊंच्या हाताखालीं चाकरी करण्यास सिद्ध* झाले, आणि भाऊंच्या सैन्यसमुद्रास अकस्मात् भरती येऊन पलटणीखेरीज फक्त मराठ्यांचीच फौज १०००० स्वार आणि ३००० पायदळ जमली.

इ. स. १७९० सालीं ऑगस्ट महिन्याच्या ११ व्या तारखेस भाऊ, कृष्णा उतरले आणि वाटेनें लहानसान ठाणीं घेत घेत १८ व्या तारखेस ते धारवाडाजवळ येऊन धारवाडच्या किल्ल्यावर व शहरावर त्यांनीं अकस्मात् हल्ला केला.

धारवाड किल्ल्याचें स्वामित्व बद्रिजमालखान या नांवाच्या शूर पुरुषाकडे होतें. परशुरामभाऊ ह्या मोहिमेंत एकटेच नसून अंगराजाचा पुत्र कुमार वृषसेन जसा कुरुक्षेत्रामध्यें झगडत होता, त्याप्रमाणें शस्त्रविद्येची परीक्षा देण्याकरितां भाऊंनींही आपला छावा—आप्पासाहेब—यास युद्धाच्या ऐन गर्दीमध्यें मोकळें सोडलें होतें !

---

* मराठ्यांची बखर-भाग २६-कलम ४-ओळी १-१२.

* या धारवाडच्या लढाईंत इंग्लिश आणि पेशवे फारच स्नेहभावानें आणि एकजुटीनें वागले. त्यांनीं जातिभेद किंवा आपपरभाव यत्किंचित्‌ही मनांत न आणितां प्रीतिवंत सहोदराप्रमाणें ते एकमेकांस सहाय करीत होते. कॅप्टन लिट्‌ल् साहेब ह्यांनीं तटावर चढून मोठ्या शौर्यानें ती पेठ हस्तगत केली, परंतु त्यांस जबर जखमा लागल्यामुळें तो किल्ला आप्पासाहेब यांचे स्वाधीन करून ते छावणींत निघून गेले. पुढें बद्रिजमालखानानें पेशव्यांचे सैन्याशीं मोठ्या निकराची लढाई केली, व आप्पासाहेबांकडून तो किल्ला पुनः घेतला, परंतु ती मानखंडना मराठ्यांस सहन न होऊन त्यांनीं पुनः खानावर चाल केली आणि त्याचा पराभव करून किल्ल्यावर मराठ्यांचा झेंडा रोंविला !

किल्ला स्वाधीन करते वेळीं बद्रिजमालखानानें भाऊंशीं करार केला होता कीं, किल्ल्यांतील सामानाची नासधूस न करितां जशाचातसाच किल्ला तुमचे ताब्यांत देईन. परंतु भाऊ किल्ल्यांत जाऊन पहातात तों मोठमोठ्या तोफांची व दारुगोळ्याची सामुग्री नासून टाकिली आहे. तेव्हां ते संतप्त होऊन बद्रिजमालाची निर्भर्त्सना करून ह्मणाले

---

* कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पान ७६-७७.-मराठ्यांची बखर-भाग २६-कलमें ३-४.

कीं'—तुह्मा यवनांचा कधीं ही कोणी विश्वास धरूं-नये, हैदरअल्ली असाच दगलबाज असून तेंच व्रत पुढें टिप्पूनें व तुह्मीं चालूं केलें आहेत. तुह्मीं लोक, बोलल्या बोलाला कधींच जागला नाहींत. गुत्ती व नरगुंद प्रकरणांत असाच विश्वासघात करून आपल्या तोंडाला चिरकालिक काळोखी लाऊन घेतलीत.

भाऊंच्या तोंडचीं तीं मर्मभेदक भाषणें ऐकतांच जमालखान् खवळून गेला. तो मोठ्या कुलांतील असून तलवारीच्या कामांत ही तें टिप्पूच्या खालोखालचेंच एक प्रकरण होतें. त्याला भाऊंचें भाषण दुःसह होऊन जवळच्या लोकांस त्यानें लागलीच इशारत दिली, आणि ' काटो, काटो, बम्मन्कु काट डालो ' असा गंभीर शब्द करून किल्ल्यांतून जात असतां तो ८००० लोकांनिशीं भाऊंवर एकदम तुटून पडला ! !

भाऊ व त्यांचे लोक सावध होतेच. त्यांनीं ती उडी पहातांच खानाच्या लोकांचे वरच्यावरच तुकडे उडिवले, खान घायाळ होऊन पळत असतां त्याला पकडून चतुर्भुज केलें आणि सर्व माल मलियत व युद्ध सामुग्री गोळा करून कुशाळगड नामक जवळचा किल्ला घेण्याकरितां तिकडे चाल केली !

परशुरामभाऊ, टिप्पूसुलतानाची धारवाडाकडील ठाणीं एका पाठीमागून एक घेत असतां म्हैसुरा-

कडे ही अशीच धामधुम सुरू होती. हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लॉर्ड कॉर्नवॉलिस् ह्यांनीं फौजेचा लगाम जातीनें हातीं घेऊन श्रीरंगपट्टणामध्यें टिप्पू-ला कोंडून ठेविलें होतें. परंतु त्यांना पट्टणाचा वेढा लवकरच उठविणें भाग पडलें. कारण श्रीरंगपट्ट-णास वेढा पडण्यापूर्वींच सुलतानानें म्हैसूरच्या आसपासचे मुलुख जाळून पोळून टाकिले होते. त्या-मुळें इंग्लिशांच्या सैन्याला घासदाण्याची टंचाई पडून जवळची सामुग्री ही खल्लास झाली. इंग्लि-शांचे लोक अन्नान्न करूं लागले. पोटांत अन्न नसल्यामुळें गलितशस्त्र होऊन पटापट प्राण जा-ऊं लागले ! × कित्येकांनीं ओझीं वाहण्याचीं जनावरें कापून* जठराग्नीची शांति करण्याचा यत्न केला. परंतु कैक दिवस उपासमार झालेल्या जनावरांच्या अस्थिपंजरापासून बिचाऱ्याची क्षुधा ती काय दूर होणार ! चोहोंकडे माणसाला माणूस खाऊन टाक-ण्याची पाळी आली.

हा दुर्धर प्रसंग आपल्या लोकांवर आलेला पाहून

× पेशव्यांची बखर- सवाईमाधवराव-पान १९४ ओळी २२-२९ व पान १९९ ओळीं १—६. टिपेसुद्धां. मराठ्यांची बखर भाग २६ कलम ८

* सोजीर लोकांनीं ढोरें कापून खाल्लीं ?— पेशव्यांची बखर —सवाईमाधवराव पान १९४ ओळ २४ पहा.

लॉर्ड साहेबांची कंबर खचली. त्यानीं परशुरामभाऊं-स धारवाडाकडून ताबडतोब येण्याविषयीं निरो-पावर निरोप पाठविले. नानाफडणिसाकडेही डांकेवर डांक पाठवून गुदरलेला प्रसंग टाळावा ह्मणून पुण्या-हून कुमक मागविली. टिप्पूला इतका जेरीस आणला असतां आतां थोडक्या साठीं तो सर्व यत्न निष्फळ होणार हें पाहून लॉर्ड कॉर्न वॉलिस यांस अत्यंत वाइट वाटलें. परंतु बरेच दिवस झाले तरी भाऊ किंवा नाना यांचे कडील कांहींच मदत येत नाहीं असें पाहून कॉर्नवालीस यांचा धीर सुटला आणि-त्यानीं श्रीरंग पट्टणाचा वेढा उठवून ते परत येऊं लागले.

कॉर्नवालिस यांच्या निरोपा प्रमाणें धारवाडाहून व पुण्याहून कुमक निघाली व ही बातमी लार्ड सा-हेबांस पोंचविण्या करितां स्वारांच्या दोन टोळ्याही ह्मैसुराकडे पुढें पाठविल्या होत्या. परंतु त्या टोळ्या थेट व्हाइसराय पर्यंत येऊन न पोहोंचतां टिप्पूच्या पेंढा-ऱ्यांनीं व बेरडांनीं त्या वाटेंतच कापून काढिल्या; त्यामुळें लॉर्ड साहेबास तिकडली कांहींच बातमी लागेना.

श्रीरंगपट्टणाचा वेढा उठवून इंग्लिशांचे लोक तेथून निघताहेत इतक्यांत दूर अंतरावर धुळीचे लोट दिसूं लागून हजारों स्वाराच्या टोळ्या मोठ्या वेगानें घोडे

फेंकीत आपणाकडेसच येत आहेत असें कॉर्नवॉलिस यानें पाहिलें; परंतु हे आपणास मारण्याकरितां* आले आहेत किंवा तारण्याकरितां आलें आहेत याचा त्यास कांहींच अदमास न लागून कदाचित् ते शत्रूकडील असतील या शंकेनें त्यांच्यावर गोळी टाकण्याचा हुकुम आपल्या पलटणीस देणार, तों लॉर्ड साहेबांस कळून आलें कीं हें परशुरामभाऊंचेंच सैन्य असून आमचे प्राण वांचविण्याकरितांच ईश्वरानें ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांस पाठविलें आहे ! !

भाऊंचें सैन्य येतांच इंग्लिशांस पराकाष्ठेचा हर्ष झाला. कारण भाऊंचे लोकांजवळ अन्नसामुग्री व घासदाणा भरपूर असून त्यांनीं आल्या बरोबर मरणोन्मुख झालेल्या लोकांस पोटभर अन्न † चारलें व सहस्रावधी लोक काळाच्या दाढेंतून काढून अजरामर कीर्ति संपादन केली.

भाऊंचे सैन्याची मदत पोंचल्यावर लवकरच पुण्याहून नानाफडणिसांनीं पाठविलेली मदत येऊन पोहोंचली; शिवाय हरिपंत फडके ही फौजे सहित येऊन दाखल झाले. तेव्हां गव्हरनर जनरल लॉर्ड

† पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १५४-१५९. ओळ १ ली.

* मराठ्यांची बखर—भाग २६-पान १६७-कलम ८ आणि मोडककृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास पान ७८.

कॉर्न वालिस यांस पुनः उमेद येऊन त्यांनीं श्रीरंग-पट्टणांत टिप्पूसुलतानाला पिटून लाविलें आणि शहराला पुनः वेढा घातला !

इतक्यांत थोरल्या सैन्याची एकेच ठिकाणीं निरर्थक कुचंबणी होणें बरोबर नाहीं असें भाऊंस वाटून त्यांनीं हरिपंत फडक्यास लॉर्ड साहेबांच्या मदतीस ठेविले. आणि आपण लिटल साहेबासहवर्तमान सिरा, निजिगल इत्यादि ठाणीं घेण्याकरितां उत्तरेकडे चालले.

परशुरामभाऊ म्हैसुरकराच्या मुलखांतून जात असतां किल्ल्यामागून किल्ले काबीज करीत चालले ! देवरायदुर्गाच्या आसपासच्या पेठा भाऊंनीं जाळून फस्त केल्या ! कारण त्या किल्ल्याचा किल्लेदार फारच बेमानपणानें वागला. पुढें घासदाणा संपल्याचें निमित्त करून भाऊ चित्रदुर्गाकडे गेले ! तेथें ३०० लोकांचीं टोळी भाऊंवर एकदम चाल करून आली ! तितक्यांसही कापून काढून किल्ला घेण्याचा यत्न भाऊनीं आरंभिला. चित्रदुर्गाचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा असल्या कारणानें तो हातीं येणें कठिण आहे असें भाऊंस वाटलें. भाऊंनीं साम, दाम, दंड, भेद, या नीतिचतुष्टयांपैकीं चौथ्याचीही योजना करून पाहिली. परंतु व्यर्थ. कांहीं केल्या किल्ला हातीं येईना. तेव्हां त्या किल्ल्याच्या नादीं न लागतां भा-

ऊंनीं दुसरे कित्येक किल्ले हस्तगत केले ! या पराक्रमी पुरुषाचा दरारा म्हैसुरकराच्या सर्व मुलखांत वसत चालला ! ह्या जयशाली पुरुषसिंहाची गर्जना सुलतानाच्या सर्व प्रांतांत गरजूं लागली ! पटवर्धनांचे अनेक बळी घेऊन जी अपराधमालिका सुलतानानें गुंफिली होती, तिजबद्दल भाऊंनीं ह्यावेळीं मनमुरक प्रायश्चित देऊन चांगलाच हात उगवून घेतला. खेळांतील बुद्बळांमध्यें घोड्यांच्या चौफेर शहानें राजा अडला असतां, फरजीसारखीं दुसऱ्या बाजूचीं नामीनामी मोहरीं जसा धुव्वा उसळून देतात, त्याप्रमाणें श्रीरंगपट्टणामध्यें टिप्पूला लॉर्डसाहेबांचा शह बसतांच, भाऊंची तिकडे फत्ते होत जाऊन म्हैसूरकराच्या मुलखावर पुरताच खराटा फिरला !!

भाऊंनीं श्रीरंगपट्टणास यावें अशाबद्दल लार्ड कॉर्नवॉलिस् यांचा निरोप आला. परंतु हातचें सोडून पळत्याच्या पाठी लागणें इष्ट नाहीं असें समजून त्यांनीं ह्या निरोपाकडे कानाडोळाच केला, आणि आजारीपणाची सबब सांगून ते चित्रदुर्गापाशींच प्रांता मागून प्रांत, किल्ल्यामागून किल्ले सर करीत चालले !

चित्रदुर्गाहून निघून बेदनूर प्रांत हस्तगत करण्याकरितां परशुरामभाऊंनीं तिकडे मोर्चा फिरविला. वाटेंत होळीआनोर किल्ला लढून घेतला ! पुढें तुंगभ-

द्रानदीचे कांठानें जात असतां शिमोगा किल्ला लागला. तो काबीज करण्याकरितां भाऊंनीं किल्ल्याला वेढा दिला! इतक्यांत भाऊंनां बातमी लागली कीं जवळच्या दाट झाडींत कोणी रेझासाहेब नांवाचा टिप्पूचा भाऊबंद ८०० स्वार, ७००० पायदळ व १० तोफा इतका सरंजाम घेऊन उतरला आहे! तेव्हां त्या साहेबाची हालहवाल पहाण्याकरितां भाऊंनीं आपल्या पुत्राची तिकडे रवानगी केली, व बरोबर मदतीकरितां कॅप्टन् लिट्ल यांस दिलें.

रेझासाहेब उतरला होता तें स्थळ फारच भयप्रद होतें. तें ठिकाण तुंगेच्या तटापासून कांहीं अंतरावर असून जवळ किर्र झाडी होती. उजवे बाजूस तुंगानदी. डावे बाजूला एक सुळक्यासारखी टेंकडी. अघाडीस व पिच्छाडीस बांबूच्या बेटांची गर्दी असून मागच्या बाजूनें मात्र थोडीशी वाट होती!

कॅपटन लिटल, व रामचंद्र परशुराम रेझासाहेबावर जातांच त्यांनीं फेर झाडून पहिली सलामी दिली. रेझा चांगल्या लढवय्यांपैकींच होता. त्यानें ही, काळ्यागोऱ्यांची दुकल आलेली पाहून बाणामागून बाण व गोळ्यामागून गोळा सुरू केला. लढाई मातबर माजली! दोहोंकडील शेंकडों लोक पडले. कैक पाडाव झाले. इंग्रजी पलटणीवरील कित्येक कामदार जायबंदी झाले. रेझासाहेबानें कित्येक वेळां

आप्पासाहेबास मागें हटवावें, परंतु लिटल साहेब व लिटल पटवर्धन यानीं पुनः लगट करून रेझावर सरशी करावी !

याप्रमाणें झटापट चालली असतां भाऊही शिमोगा किल्ल्याचें काम आटपून आपल्या पुत्राचें हस्तकौशल्य पहात कौतुकानें दूर उभे राहिले. इतक्यांत रेझा वेगानें धांवत येऊन त्यानें आप्पासाहेबावर हल्ला केला आणि त्याचा फडशा उडवून टाकण्याविषयीं त्यानें आपल्या लोकांस उत्तेजन दिलें !

पुत्रावरील हें अरिष्ट टाळण्याकरितां भाऊ, रेझ्यावर चालून जातील असें जवळच्या लोकांस वाटलें होतें. परंतु भाऊंनीं जाग्यावरून यत्किंचित्‌ही न हालतां, शांतपणानें उत्तर दिलें कीं 'आजची* लढाई आप्पाची, त्याच्यावर सोंपविलेली कामगिरी पटवर्धनांच्या शीलाप्रमाणें त्यानें हरतऱ्हेनें बजाविलीच पाहिजे. मग त्यांत तो मारो किंवा मरो. आह्मीं त्यास आज सहाय्य करूं इच्छित नाहीं. पटवर्धनांचे पुरुष आजपर्यंत कधींच दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी‡

---

* मोडककृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास उत्तरार्ध भाग २ पान ७९—८०. ओळ १—३.

‡ ह्या ठिकाणीं कविकुलगुरु कालिदासोक्तीचीच स्फूर्ति होते:-

नन्वान्यतस्तस्यशरीररक्षा, स्ववीर्यगुप्ताहिमनोःप्रसूतिः ॥

रघुवंश सर्ग २ श्लोक ४.

ण्यायले नसून ते स्वपराक्रमानेंच प्रकाशित झाले आहेत.' !!!

आहा ! काय त्या पटवर्धनप्रभूची योग्यता ! कोण कुलाभिमान हा ! काय छाती ! किती दिलदारीचें भाषण हें ! प्रत्यक्ष पोटचा गोळा जळून खाक होण्याचा समय आला असतां, खऱ्याखऱ्या क्षत्रियाप्रमाणें छातीला हात लावून वर सांगितलेलें भाषण तोंडावाटे काढणारे, आणि त्याप्रमाणें आचरण करून दाखविणारे, परशुरामभाऊसारखे लाल, दिनदुनियेंत कितिकसे सांपडतील बरें ? ! !

असो. भाऊ आपल्या मुलाची तर्फ घेण्यास ह्यावेळीं जसे नाखुष होते त्याप्रमाणेंच त्या पटवर्धनाच्या बऱ्यानेंही बापाच्या मदतीची मुदलीच अपेक्षा केली नाहीं. रेझा साहेबाचा हल्ला येतांच अप्पासाहेबानें जीवावर पाणी सोडून तो हल्ला मागें फिरविण्याचा दीर्घ प्रयत्न चालविला. परंतु ती गोष्ट अप्पाच्या मगदुरापलीकडची आहे, असें पाहून कॅप्तन लिट्ल् साहेब आपल्या रणबंधूस सहाय्य करण्याकरितां धांवला, आणि रेझा साहेबाला मोठ्या शर्थीनें मागें हटवून त्याचा अगदीं मोड केला; व ती जागा आपल्या स्वाधीन करून घेतली. नंतर आणखी कित्येक ठाणीं घेतघेत भाऊ बेदनुराकडे वळले, आणि ह्या प्रौढप्रताप पुरुषाचा यशोदधि उत्तरोत्तर विस्तृत

११

होत चालला ! नेपोलियन बोनापार्ट् जसा पाश्चात्य प्रदेशांत एकसारखा गर्जून राहिला होता व प्रसिद्ध हॅनिबॉल यानें ज्याप्रमाणें सर्व रोमराज्य हालवून सोडलें होतें, त्याप्रमाणेंच आमचा इंदियन् हॅनिबॉल परशुरामभाऊ, पेशव्यांच्या अमदानींत उदयास येऊन, सवाईमाधरावांच्या वेळीं तर हा अज्जब तारा सर्व दक्षिणप्रांतांत चमकून राहिला ! !

बेदनुराकडे अधिकाधिक मुलुख काबीज करून पंत प्रधानाची सत्ता आणखी कित्येक ठिकाणीं बसविणार, इतक्यांत भाऊंनां पुण्याहून नानाफडणिसांचीं पत्रावर पत्रें येऊं लागलीं कीं, आतां पुढें कोठें न जातां श्रीरंगपट्टणास लॉर्ड कॉर्नवॉलीस यांचे मदतीस होईल नितक्या त्वरेनें जाऊन टिप्पूची मोहीम निकालास लावावी. शिवाय लॉर्डसाहेबांनींही भाऊंच्या सहाय्याशिवाय टिप्पूच्या वेढ्याचें काम शेवटास जात नाहीं असें पक्कें जाणून भाऊंनीं त्वरित पट्टणास येण्याविषयीं निकडीचे निरोप पाठविले. या वरील कारणामुळें व कमरुद्दीन या नांवाचा टिप्पूकडील कोणी सरदार भाऊंना अडविण्याकरितां येत होता त्याजबरोबर लढाई करण्यास तें स्थल अगदीं निरुपयोगीं आहे, असें जाणून परशुरामभाऊंनीं पुढें जाण्याचा बेत रहित केला; आणि कॉर्नवॉलिस यांस

सहाय्य करण्याकरितां ते फौजेसह श्रीरंगपट्टणास धांवत आले.

*भाऊ पट्टणास पोहोंचल्यावर त्यांना विशेष रक्त-पात करण्याची जरूरच पडली नाहीं. कारण श्रीरं-गपट्टणांत टिपू कोंडला गेल्यावर त्यानें कांहीं वेळ जो धिंगाणा मांडला होता, ती त्याची धडपड हळूं हळूं कमी होत जाऊन भाऊ येण्याच्या सुमारास तो अगदीं रकमीस आला. आणि त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें तह करण्याविषयीं कबूली दाखविली. तो तह† असाः—

१. टिप्पूनें आपल्या मुलखापैकीं निम्मे मुलूख त्या तिघाजणांस ( पेशवे, निजाम, इंग्लिश ) द्यावा.

२. टिप्पूनें १,६५,००,००० रुपये रोख रो-कड दंडादाखल त्या तिघांच्या स्वाधीन करावें.

३. टिप्पूनें आपले २ मुलगे ओलीस द्यावें.

श्रीरंगपट्टणची मोहीम शेवटास नेऊन भाऊ परत येतात तों त्यांस कोल्हापुरकरावर जाण्याची नानांनीं आज्ञा दिली. पटवर्धन श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत

---

* मराठ्यांची बखर भाग २६ कलम ११ पहा.

† ही लढाई झाल्यावर १७ तोफा व आणखी कांहीं जड सा-मान पुण्यास पोहोंचविण्याचें काम भाऊंवर सोंपविलें होतें. तें सामान घेऊन भाऊ पुण्यास येत असतां वाटेवर टिपूकडील बे-रडांनीं भाऊंस बराच त्रास दिला ( कलम १३. )

गुंतले आहेत हें पाहून कोल्हापुरकरांनीं आसपासच्या मुलखांत आवाडाव सुरू केली होती. त्याबद्दल कोल्हापुरकरांचें पारिपत्य करण्याची आज्ञा नानाकडून होतांच भाऊंचे चिरंजीव रामचंद्रराव आप्पा यांनीं ती मोहीम करण्याची फार उत्कंठा दाखविली. त्यावरून भाऊंनीं त्यास जाण्याची आज्ञा दिली. रामचद्रराव कडेकोट सैन्यानिशीं निघाले. त्यांच्या व कोल्हापुरकरांच्या सैन्याची गांठ अळतें गांवाजवळ पडली. फिरंग्यांचीं पलटणें गांवांत शिरून त्यांनीं पेठा लुटण्यास सुरुवात केली. जनार्दनपंत सुभेदार यांनीं तोफांचा भडीमार चालविला. आणि रामचंद्ररावांनीं एकसारखी गोळ्यांची व बागांची वृष्टि करून कोल्हापुरकरांच्या सैन्यास जर्जर करून सोडिलें.

ह्या लढाईचें वर्तमान कोल्हापुरचे महाराजांस कळतांच त्यांनीं सर्जेराव घाडग्यास कुमक घेऊन जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें रत्नाकरपंत दिवाण ह्यांनीं सैन्य घेऊन ते रामचंद्रराव आप्पावर जाऊन तुटून पडले. ह्या झटापटींत आप्पासाहेबांच्या डोक्यावर मोठी जखम पडून ते अत्यंत विव्हळ झाले! पुढें शिरगांवपर्यंत शत्रूंनीं त्यांचा पाठलाग केला. विठ्ठल धोंडदेव आणि बाबाफडणीस ह्यांनां ही या लढाईत जखमा लागल्या. आप्पासाहेब एकटे सांपडून सर्जेराव घा-

ट्यानें त्यांस पालखींत घातलें आणि महाराजाकडे नेलें !

महाराजानीं आपांचा बहुमान करून त्यांस वस्त्रें दिलीं ! व पांच गांव बक्षिस दिले. ही बातमी भाऊंस कळतांच हा आपला अपमान कोल्हापूरकरांनीं केला हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें. मग भाऊंनीं सैन्य जमा करून कोल्हापूर करावर चाल केली; आणि गंगाधर गोविंद याजकडून तोफांचा भडिमार सुरू केला. बाबासाहेब, रघुनाथराव नीळकंठ, आणि चिंतामणराव आपा ह्यांसही सैन्याबरोबर घेतलें.

कृष्णेच्या पलीकडे गेल्यावर उदगाव येथें भयंकर संग्राम सुरू झाला व टेंबलाईच्या माळावर कोल्हापुरकरांची पुष्कळ नासाडी होऊन पटवर्धनापुढें त्यांच्या सैन्यानें हात टेकिले ! नंतर उभयतामध्यें तह होऊन, कोल्हापुरकरांनीं पुन्हां उपद्रव देऊं नये, त्यांनीं ३ लक्ष रुपये खंडणी द्यावी व दोन सरदार ओलीस द्यावे अशीं कलमें ठरलीं.

याप्रमाणें रणभूमीवर परशुरामभाऊ झगडत आहेत तों त्यांस पेशवेदरबारांत थोडें मन घालावें लागलें. त्याचें वृत्त असें:—मसलती व महत्वाकांक्षी महादजीला पुण्यांत मोठमोठे व्यूह रचावयाचे होते. ह्मणून उत्तरेकडे विजयीं झाल्यामुळें पातशहाकडून दिल्लीच्या वजिरीचीं वस्त्रें जीं त्यास मिळणार होतीं, तीं

" मला न देतां आमचे यजमान जे पेशवे यांस द्यावीं " अशी शिंद्यानें दिल्लीच्या पातशहाजवळ विनंती केली. त्या विनंतीस मान्य होऊन तो वजिरातीचा मान पेशव्यांस देण्याकरितां पातशहानें शिंद्याजवळ दिला, आणि मग महादजीची स्वारी पुण्याकडे आपलें सर्व वैभव आणि ऐश्वर्य घेऊन वळली ! ( १७९२।९३ .)

ह्या सुमारास सवाईमाधवरावांचें वय १९ वर्षांचें असून त्यांच्या तारुण्यदशेस नुकती कोठें सुरवात झाली होती. राज्याचा सर्व कारभार नाना फडणिसांनीं आटपलेला असल्यामुळें व पटवर्धनासारखे, फडक्यासारखे, आणि शिंदेहोळकरासारखे, वीर परशत्रूचे चंदन उडविण्यासाठीं निरंतर दक्ष असल्याकारणानें ह्या प्राच्यप्रभूचा बाल्यदशेंतीलकाल ऐष आरामांत व सुखांत गेला. तथापि हा रंगेल गडी शूरत्वांत, शहाणपणांत, व राज्यनीतींत कमी होता अशी मुळींच गोष्ट नाहीं. बाळाजी विश्वनाथाच्या वंशास योग्य असें शौर्य सवाईमाधवरावांच्या अंगीं होतें असें खर्ड्यासारख्या ज्या कित्येक लढाया झाल्या त्यावरून सिद्ध होतें. सवाई माधवरावांचें स्वास्थ्य पुढें पुढें कमी होत चाललें. कारण त्यांला नाना फडणिसाची ताबेदारी व स्वतःची परतंत्रता, हीं न आवडून नानाविषयीं त्यांचें मन किंचित् विटू

लागलें. तरीसुद्धां नानांचें चातुर्य व राज्याविषयीं त्यांची दक्षता हीं तो पूर्णपणें ओळखीत असून पेशव्यांच्या अफाट राज्याची बळकटी आणि सुरक्षितपणा हीं एकट्या नाना फडणिसावर अवलंबून आहेत याविषयीं माधवरावांची बालंबाल खात्री होती.

महादजी शिंदा मोठा अर्जवी, गोडबोल्या आणि दिलदार पुरुष होता. त्याचा दिल्लीच्या दरबारांत बसलेला दरारा व त्याचा पराक्रम आणि संपत्ति ह्यांच्या योगानें पुण्यांतील मुत्सद्दी मंडळ चपापून गेलें होतेंच; तशांत स्वामीभक्ति दाखविण्याच्या मिषानें हिंदुपदबादशहापासून वजिरातीची सनद घेऊन आल्यावर तर मंडळींचीं धाबीं फारच दणाणून गेलीं. पाटिलबोवा आल्याबरोबर त्यांनीं सरकारची भेट घेऊन मोठ्या अदबीनें विनंति केली कीं ' मी श्रीमंतांचें दर्शन घेण्यासाठीं हिंदुस्थानांतून इतक्या लांबवर आलों. माझेबरोबर लाख फौज असून तिलाही श्रीमंतांच्या पायाचें दर्शन व्हावें. सरकारच्या भेटीचा अलभ्य लाभ पुनः कोठून प्राप्त होणार ? ह्याकरितां श्रीमंतांनीं कृपावंत होऊन मजदीनांच्या* विनंतीस मान द्यावा."

महादजीचा अशा रीतीनें उपक्रम करण्यामध्यें मोठा मतलब होता. त्याचा हेतु असा होता कीं

* पेशव्यांची बखर-सवाई माधवराव-पान १५८ ओळी २०-२८.

सवाईमाधवरावाला आपल्या सैन्याची कवाईत, कंपूची रचना, स्वतःचें ऐश्वर्य, आणि लष्कराचें वैभवहीं दाखवून त्यास थक्क करून सोडावें आणि मग क्रमानें आपले इष्ट हेतु सिद्धीस न्यावेत.

शिंद्याचा हा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला. कारण त्याच्या विनंतीप्रमाणें श्रीमंत सवाई माधवरावाची स्वारी विनायकगजावर बसून मोठ्या थाटमाटानें शहरा बाहेर पडतांच शिंद्याचे* कंपू, त्याचे घोडेस्वार, तोफांची मांड, सैन्याची टापटीप व कवाईत, भरजरीचे पोषाख, किनखापी कपडे, मौल्यवान आणि रत्नजडित अलंकार इत्यादि गोष्टी पाहून सवाई माधवरावासुद्धां सर्व पेशवेमंडळ गारिगार होऊन गेलें! त्याच्या जयत् युद्धकुशल सैन्याचा विस्तृत समूह पाहून शिंद्याच्या शक्तीविषयीं मंडळींनीं तोंडांत बोटें घातलीं; आणि यःकश्चित् मनुष्य इतक्या ऐश्वर्यास चढलेला पाहून सर्वांनां अचंबा वाटला.

पहिल्या प्रथमच मंडळी इतकी थिजलेली पाहून पाटिलबोवांना बराच दम आला, आणि त्यांनीं पुनः वेळ साधुन माधवरावाजवळ हळूंच गोष्ट काढिली कीं, 'स्वामि† सेवेसाठीं हाडांचीं काडें करून, जीव

---

* पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पानें १५९-१६० पहा.

† पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १६० ओळी २८-३०.

अनेक प्रसंगीं धोक्यांत घालून व पातशहाची मर्जी संपादन करून श्रीमंतांसाठीं दिल्लीहून आणलेल्या वजिरातीच्या वस्त्रांचा, सरकारांनीं स्वीकार करावा, ह्मणजे हा महादजी आपल्याला धन्य धन्य मानील ! ! '

महादजीच्या मिठ्या भाषणांनीं, त्याच्या आर्जवी आणि तोंडपुजेपणानें व त्याच्या पराक्रमानें आणि वैभवानें बिचारा भोळा सवाईमाधव अगदीं भुलून गेला. आणि त्याला त्या हिंदुस्थानी मांत्रिकाचें अंतरंग यत्किंचितूही न कळतां, बाह्य डामडौलावर भुलून जाऊन तो किताब स्वीकारण्याविषयीं त्यानें होकार भरला.

महादजी शिंद्याच्या या मायीक जालामध्यें न सांपडणारे असे नानाफडणिसासारखें कित्येक दूरदृष्टि आणि चतुर पुरुष होतेच. नानांना हा तमाशा पाहून काडिमात्र आनंद न होतां पुढलें भविष्य त्यांना आधींच दिसत होतें. पेशव्यांना ती पदवी योग्य नाहीं अशाबद्दल त्यांनीं माधवरावाला पुष्कळ समजावून दिलें. पुढें होणारें शिंद्याचें प्राबल्य, पेशवाईचा ऱ्हास आणि शिंद्याचें कौटिल्य हीं नानांनीं पेशव्यांस व्यक्त करून दाखविलीं. परंतु व्यर्थ. त्या बिचाऱ्या भारलेल्या माधवरावास तो प्रकार कोठून उमजणार ?

शिंद्यानें आणलेल्या किताबाची स्थिति खरोखरच

फडणिसांच्या ह्मणण्याप्रमाणें होती. कारण त्या वकीलमुतलख पदवीच्या सनदेमध्यें पेशव्यांना महाराज, आदिराज, इत्यादि भपकीदार किताबांनीं मंडित केलें असून सर्व कारभार पाटिलबोवांनींच पेशव्यांचे हस्तक होऊन हाकावा असा मतलब होता ! !

असो. पेशव्यांचें अनुमत मिळतांच शिंद्यांनीं ती पदवी देण्याचा मोठा टोलेजंग समारंभ केला. तो असा—

* शनवारच्या वाड्यापासून तों थेट वानवडीपर्यंत मखमाली मोठमोठे भपकीदार डेऱ्यांची रांग लावून दिली होती. शेवटच्या थोरल्या मौल्यवान राजडेऱ्यांत मोंगल बादशहाच्या तक्तासही लाजविणारें असें एक सुंदर तक्त मांडलें होतें. वाटेनें दुतर्फा फुलांच्या जाळ्या लावून दिलेल्या होत्या. कंपूची व घोडेस्वारांची मांड रस्त्याच्या दोन्ही बाजूस अप्रतिम उठवून दिली होती. स्वारांचे व घोड्यांचे मौल्यवान झकझकीत अलंकार, लोकांचे भरजरीचे भरगच्ची पोषाख, सूर्याच्या प्रतिभेनें प्रकाशित झालेल्या शस्त्रांचा लखलखाट, आणि प्रेक्षकजनांच्या ऐश्वर्याचा अवर्णनीय देखावा ह्यांच्या योगानें आदितवारा-

---

* वकीलमुतलक=वजिरातीची पदवी देण्याचा टोलेजंग समारंभ—

पेशव्यांची बखर—सवाई माधवराव—पानें १६१-१६३.
मराठ्यांची बखर भाग २७ कलम ३.

पासून तो तहत वानवडीपर्यंत राजमार्ग अगदीं गजबजून जाऊन अलीजा बहादरांच्या वैभवाचा पूर्ण देखावा त्या दिवशीं दिसत होता.

महादजी शिंदा बोलावूं आल्यावर सरकारस्वारी तमाम मानकरी, शिलेदार, पथकें, हुजुरांत सुद्धां जरिपटका घेऊन मोठ्या थाटानें निघाली. बरोबर, अप्पा बळवंत, अमृतरावपेठे, रामचंद्र गणेश, विसाजीपंत बिनिवाले, बाजीपंत अण्णा, नारोपंत चक्रदेव, महादाजीपंत गुरुजी, विंचुरकर, बेहरे, राजेबहादर, अक्कल कोटवाले, भोंसले, घोरपडे, निंबाळकर जाधव, भोइटे आदिकरून सर्व सरदार, मुत्सद्दी, हजर होते. परशुराम भाऊ पटवर्धन, नानाफडनवीस, हरिपंत तात्याफडके ह्यांनां त्याप्रसंगीं ‘सेवाधर्मःपरम गहनोयोगिनामप्यगम्यः’ या न्यायानें स्वारी बरोबर जाणें भाग पडलें. त्यांनां तो तमाशा पहाण्याची मुदलींच इच्छा नव्हती. पण करतात काय, सांपडले होते हिंदुस्थानी वाघाच्या सपाट्यांत.

असो, पेशव्यांची स्वारी त्या दिवशीं मोठ्या समारंभानें निघाली. श्रीमंत सवाई माधवराव आयन्याच्या अंबारींत बसले असून त्या सुरतपाक पंतप्रधानाचें सौंदर्य त्या दिवशीं कांहीं अप्रतिम दिसत होतें. खवास खान्यांत आप्पा बळवंत व पेठे बसले होते. श्रीमंतांच्या मागें नाना फडनवीसांचा बिनझो-

ल हत्ती चालत असून नाना अंबारी मध्यें विराजित झाले होते. जवळच शृंगारलेल्या भव्य हत्तीवरील अंबारीमध्यें नानांचा कंठमणी, पेशवाईचा आधारस्तंभ आणि सरदार समूहाचें शिरोभूषण असा परशुरामभाऊ वीरासन ठोकून बसला होता. शिंदे व फडके हेही गजारूढ असून अवांतर सरदार मानकरी आपआपल्या दरजाप्रमाणें एका मागून एक चालले होते.

अशा अद्वितीय वैभवाची पेशवाई थाटाची स्वारी निघाली ती शनवारचा वाडा डावा घालून आदितवारातून नाकझरी उतरून मिरवत मिरवत वानवडीस जाऊन पोहोंचली. सलामीच्या तोफा धडाडूं लागल्या. नंतर दरबारच्या मुख्य डेऱ्यांत प्रवेश करून सर्वांचे मुजरे घेत घेत श्रीमंत, बादशाही तक्तावर विराजित झाले. आवांतर मंडळी आपआपल्या योग्य ठिकाणीं बसली. कांहीं वेळानें खुपसुरत व अभिनयांत कुशल अशा हिंदुस्थानी कलावंतिणींच्या नृत्य गायनास सुरुवात झाली. सुस्वर वाद्यांच्या मधुर स्वरानें श्रोत्यांच्या चित्तवृत्ति तल्लीन होऊन गेल्या.

नाच सुमारें दोन घटका झाल्यावर महादजी शिंदे नम्रपणानें उभे राहून दरबार भरविण्याचा उद्देश व सनदेंतील मतलब हे त्यांनीं अस्खलित

रीतीनें सर्वांस कळविलें. आणि मग मोठ्या अद-बीनें आणि सन्मानानें दिल्लीहून आणलेले मौल्यवान् पदार्थ सिंहासनावर मांडून वजिरीचीं वस्त्रें आणि अलंकार श्रीमंत सवाईमाधवराव यांस दिलीं. त्यांचा तपशीलः——

पठाणी तऱ्हेचा मंदिल डोकीस घातला. अंगांत तमामी जामानिमा व पायांत विजार चढविली. कंबरेस पटका बांधला. मस्तकीं शिरपेच व तुरा. मंदिलावर कलगी लटकावून दिली. हातांत पोहे-च्या, दंडांत भुजबंद, गळ्यांत मोत्यांचे व नवरत्नांचे हार रुळूं लागले. कानांत चौकडा घातला. नंतर पाटिलबोवांनीं दिल्लीहून आणलेला बादशाही चढाऊ जोडा स्वतः श्रीमंतांपुढें ठेऊन खासा अलिजाबहादर श्रीमंतांवर जातीनें मोर्चेलें उडवूं लागला ! !

याप्रमाणें सर्व समारंभ झाल्यावर श्रीमंतांना नजरनजराणे* दिले; मग दरबार बरखास्त होऊन पे-शव्यांची स्वारी मोठ्या समारंभानें शिंद्यानें नजर केलेल्या पालखींत बसून मिरवत मिरवत परत श-निवारवाड्यांत येऊन दाखल झाली.

---

* ह्या वेळीं कित्येकजण जे साताऱ्याच्या राजाचे पुरातन चाकर व मानकरी होते त्यांस तो दिल्लीचा तमाशा न आवडून त्यांनीं नजराणे मुळींच दिले नाहींत व डेऱ्यांतही गेले नाहींत ! !

* याप्रमाणे माधवरावांस दिल्लीच्या वजिरातीचा मान दिल्यावर पेशव्यांच्या दरबारीं अलिजाबहाद्दराचें तेज अधिकाधिक पडत चाललें, आणि भानु अंधक अंधक होत चालला ! महादजीला पेशव्यांनीं वजिरातीच्या गुमस्तगिरीचीं वस्त्रें देऊन महादजी करील ती पूर्व दिशा असाच प्रकार सुरू झाला ! अलिजाबहाद्दरानें यावेळीं आपल्या अकलेची आणि हिकमतीची शर्थ करून सोडली. नानाफडणिसांकडून राज्यकारभार हिसकावून तो आपणास घ्यावा याविषयीं पाटिलबोवांनीं जंग जंग पछाडली. श्रीमंत दरबारांत गेले, महादजी तेथें आहेच. श्रीमंत वाड्यांत गेले, पाटिलबोवा लाळ घोटीत व एकेक शब्द झेलीत उभे आहेतच. पेशवे एकांतांत गेले, अलिजाबाहद्दराची स्वारी मागें चाललीच, माधवराव जलक्रीडा करण्याकरितां † तळ्यांत उतरले, हा वीरमंत्री खावंद, खुदावंत ह्मणत उडीद घेऊन तयार आहेच, सारांश ह्या लष्करी राहूचा गिऱ्हा सवाईमाधवरावांच्या मागें एकसारखा दोन वर्षें लागलेला असून तो आतां सर्व पेशवाईचाच खग्रास करतो कीं काय अशी सर्वांस धास्ती पडली !

* कारभारी होण्याविषयीं पाटिलबोवांचा दीर्घ प्रयत्न-पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पानें १६३-१६६.

† पर्वतीच्या तळ्यांत-पेशव्याची बखर-सवाईमाधवराव पान १६४ ओळी १-१४,१४-२४+टीप.

माधवरावांला मारण्याविषयीं पाटीलबोवांचे प्रयोग चालले असतां नाना फडनवीस स्वस्थ बसले नव्हते. त्यांनींही युक्तिप्रयुक्तीचा प्रयोग परशुरामभाऊ पटवर्धनांच्या द्वारें चालविला होताच. उत्तरेकडे ज्याप्रमाणें शिंद्याची समशेर चमकली होती, त्याप्रमाणें दक्षिणेकडेही भाऊंची तलवार एकसारखी ३३ वर्षें झकाकत होतीच. ह्यामुळें सवाईमाधवरावांजवळ भाऊंचें वजन* जबरदस्त असे. शिंद्यापुढें नाना फडनवीस फिक्का पडत चालला असें पाहून भाऊंनीं कंबर बांधिली आणि ज्या ज्या वेळीं पाटिलबोवा आपलेंच घोडें पुढें ढकलण्यास पाही, त्या त्या वेळीं नानांची तरफ घेऊन परशुरामभाऊ त्याला जागोजाग हाणून पाडूं लागला, व नानांविषयीं गढूळ होत चाललेलें माधवरावांचें मन, सुबुद्धिवादानें साफ करूं लागला !

त्या प्रसंगाला परशुरामभाऊ पटवर्धन जवळ होते ह्मणून पेशव्यांवर व पेशवाईवर मोठी खैर झाली. नाहीं तर नानाफडनविसाला धुळीचे दिवे खात

---

* "शिंद्याचें वजन श्रीमंतांजवळ वाढून नाना फिक्के पडण्याचा रंग दिसूं लागला. + + भाऊ त्या प्रसंगीं नानांच्या फारच उपयोगीं पडले. शिंद्याबरोबर पंतप्रधान स्वारी शिकारीस जात तेव्हां भाऊ बरोबर असत. जरी शिंद्यांनीं माधवरावांस बहुतेक वश केलें होतें, तरी नानांविषयीं श्रीमंतांची पूज्यबुद्धि कायम ठेवण्यास भाऊच कारण होते !!"—कर्नाटक संस्थानाचा इतिहास—पटवर्धन सरदार—पान ८२—ओळी १-८.

जाण्याची पाळी आली असून पेशव्यांनाही शिंद्याच्या ओंजळीनेंच पाणी पिण्याचा रंग आला होता. परंतु भाऊंनीं सवाईमाधवरावांची चांगली कानउघाडणी केली. शिंद्याचा लष्करी कावा त्यांनीं उघडकीस आणला. दिल्लीच्या वजिरातीची पदवी घेतल्यानें पेशव्यांचा किती अपमान झाला हें माधवरावांच्या मनावर चांगलें ठसवून दिलें. नानासारख्या राजभक्त आणि चतुर मुत्सद्याचें मन दुखवून त्याचा अव्हेर केला असतां, किती भयंकर परिणाम होईल ह्याचा हुबेहुब देखावा पेशव्यांपुढें व्यक्त करून दाखविला. मराठ्यांच्या भुलथापिला भुलून त्याचे हातांत राज्यसत्ता दिली असतां, ब्राह्मणांची काय दुर्दशा होईल व ब्राह्मणी राज्य कसें नष्ट होईल याविषयींचें यथातथ्य स्वरूप पेशव्यांचे हृत्पटिकेवर रेखून दिलें. सारांश त्या प्रसंगीं नानातऱ्हेचे उपाय, अनेक प्रकारचा उपदेश आणि निरनिराळे दृष्टांत द्राष्टांत देऊन परशुराम† भाऊंनीं आपली शिष्टाई इतकी सोळा

† फडणिसांचीं तरफ घेऊन श्रीमंतांचें दूषित झालेलें मन भाऊंनींच साफ केलें याविषयीं मराठ्यांच्या बखरींत कोठें उल्लेख नाहीं तथापि ह्या गोष्टीला मोडकांच्या इतिहासांत पूर्ण आधार असून पटवर्धनांचे अस्सल कागदपत्रांच्या आधारानें तो इतिहास केलेला असल्यामुळें तो पुष्कळ अंशीं संभवनीय आहे. शिवाय नानांच्या कडक वागणुकीमुळें माधवराव नानाशीं मोकळ्या मनानें वागत नसे ही गोष्ट मशहुर आहेच. तेव्हां पुढें चालू.

आणें वजाविली कीं, लाखों रुपये खर्च करून जी मोहनी अलिजाबहाद्दरांनीं सवाईमाधवरावांवर घातली होती, ती एकाएकीं दूर होऊन बाहेरल्याप्रमाणेंच आंतही पाटिलबोवा कृष्णवर्ण आहेत, असें माधवरावांला टळटळीत दिसूं लागलें ! नानाविषयीं पेशव्यांचें मन साफ होऊन नाना वैतागानें काशीस जाणार होते, ते मोठ्या अर्जवानें पेशव्यांनीं राहवून घेतले ! आणि जलक्रीडा करीत असतां पाटिलबोवांनीं राज्यकारभार देण्याविषयीं पुनः लाडीगोडींत येऊन गोष्ट काढतांच श्रीमंतांनीं एकच खर्पुस *उत्तर दिलें कीं 'पाटिलबोवा, नानाफडणीस हा फडणीस नसून तो माझा उजवा हात आहे. याकरितां अतःपर नानाविषयीं आपण बिलकुल गोष्ट काढूं नये. राज्यकारभार नानाकडेसच असणें अवश्य आहे आणि त्या हुद्याला एक नानाच योग्य. तुह्मीं व नाना दोघे आहां ह्मणूनच मला राज्य करीत असतांही नानातऱ्हेचे खेळ खेळावयास सांपडतात, तर नानांना काढून टाकून माझा उजवा हात मोडून टाकण्याविषयीं तुह्मी प्रयत्न करूं नये " ! ! !

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

नानांचा व सवाईमाधवरावांचा समेट घालून देण्याकरितां भाऊंसारख्या शूर व वजनदार पुरुषाची अवश्यकता लागली असावी हें सहज दिसतें.

* पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १६४-१६५ पहा.

आपण भगीरथ प्रयत्नानें रचलेले मोठमोठे व्यूह भाऊंनीं व नानांनीं हाणून पाडले हें पाहून तो दीर्घद्वेषी शिंदा अत्यंत संतप्त होऊन नानाशीं उघड उघड वैर करूं लागला. त्या दोघांचा कलहाग्नि पेशव्यांच्या दरबारांत अधिकाधिक भडकत जाऊन एकमेकाच्या नरडीचा घोट घेण्याची त्यांनीं कडेकोट तयारी चालविली. शिंद्यानें एक ब्रिगेद पलटण आणनांच नानाफडणिसांचा पाठराख्या परशुरामभाऊ पटवर्धन हाही दोन हजार स्वारांनिशीं तासगांवाहून येऊन अलिजाबहाद्दराशीं टक्कर मारण्याकरितां दंड थोपटून उभा राहिला ! !

†याप्रमाणें आंतल्या आंत यादवी माजून ते दोघे अहिरावण महिरावण एकमेकांवर जाऊन धडकणार इतक्यांत 'हो, हो, शांतं पापं, शांतं पापं' करीत हरिपंत फडका त्या वीरमहावीरांच्यामध्यें जाऊन पडला ! त्यानें दोघांनांही दोहींकडे करून त्यांस चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या आणि तो कलहाग्नि मोठ्या मिनतवारीनें विझवून आलेला भयंकर प्रसंग मोठ्या शिताफीनें टाळला.

शिंद्याचे बेत निष्फळ होत गेल्यामुळें त्याचे प्रयत्नांत शिथिलता येत चालली. तथापि त्या दृढनिश्चयी पुरुषानें आपला बेत 'कोकालो फलदायकः' या न्यायानें

† मराठ्यांची बखर—भाग २७-कलम ९ पहा.

कधीं तरी सिद्धीस जाईल या आशेनें परत हिंदुस्थानांत न जातां पुण्यांतच तळ दिला; आणि तऱ्हेतऱ्हेची दारू दाखवून व नानाप्रकारचे रंग* खेळवून श्रीमंतांची मर्जी पुनः संपादण्याचा दीर्घ प्रयत्न या पुरुषानें पुनः सुरू केला!!

महादजी शिंद्याचा हा दुसरा प्रयोग मुदलींच सिद्धीस गेला नाहीं. कारण ह्या महत्पराक्रमी आणि मसलती पुरुषाला अकस्मात् नवज्वराची भावना होऊन इ. स. १७९४ त फेब्रुवारीच्या १२ व्या तारखेला तो मृत्यु पावला. ह्या पुरुषानें आपल्या मागें आपल्या शौर्याची व दीर्घप्रयत्नाची अजरामर कीर्ति ठेविली. महादजीच्या मृत्यूमुळें पेशवाईतला एक मोहरा हरपला व मराठ्यांची एक बाजू खचली असें सर्व लोक बोलूं लागले. महादजी शिंद्याच्या मागें दौलतराव शिंदा मुख्य झाला.

शिंदा मेल्यावर दुसरा एक वीरमणि कांहीं दिवसांनीं अस्तंगत झाला. तो कोणता ह्मणाल तर परशुरामभाऊचा रणबंधु व समकालीन हरिपंत फडके. ह्या शूर पुरुषाला पोटशुळाची व्यथा होऊन सिद्धटेंकास श्रीगणपतीचे पायांजवळ कार्तिकमासीं त्यांचा अंत झाला. ह्यांच्या मरणामुळें पुण्यांतील लोक फार

* पेशव्याची बखर-सवाईमाधवराव-पान १६०-१७१.

हळहळले. तात्या वारल्यावर त्यांचें काम बाबाराव फडके ( तात्यांचे चिरंजीव ) पाहूं लागले.

---

## भाग ८ वा.

### खर्ड्यांची लढाई.

श्लोक.

केला हल्ला सवाई प्रभुनिजकटकें, भाऊनें मार दिल्हा ।
तेव्हां किल्ला परांडा जवळही असतां जाहला दूर पल्ला ॥
नाहीं गल्ला न पाणी यवन तळमळी 'यानबी यारअल्ला'।
बोले सल्ला करो जी अबहि गनिमको चाहिसो देवजिल्हा॥

महादजी शिंद्याचा अवतार संपून पेशव्यांच्या दरबारांत स्थीरस्थावर होत आहे तोंच पेशव्यांचा जुनाट व बलाढ्य शत्रू जो निझामअल्ली त्याचे बाहू स्फुरण पावावयास लागून पेशव्यांबरोबर दोन हात करण्याविषयीं तो उत्सुक झाला. तेव्हां अर्थातच त्याच्या बोलावण्यास मान देऊन त्याची मनीषा पूर्ण करण्याकरितां इ. स. १७९८ मध्यें परशुरामभाऊंला आपली तलवार पाजविणें पुनः प्राप्त झालें. त्या लढाईचा प्रकार असाः---

इ. स. १७९५ त नानाफडणिसांनीं गोविंदराव काळे यांस निझामचे दरबारीं चौथ व सरदेशमुखी

बद्दल २६०००००० रुपये* बाकी थकली होती ती मागण्याकरितां पाठविलें. हैदराबादच्या दरबारांत यावेळीं सर्व बलबलपुरी माजली होती. युद्धास उपयोगी पडणारी सामुग्री अगदीं नसून सर्व बडा घर पोकळ वांसा असाच प्रकार झाला होता. सरदार मान कऱ्यांचा ऐषआराम व बडेजाव अतोनात माजलेला असून हुक्क्यांत आणि चैनबाजींत मंडळी दंग होऊन गेली होती. लांबलांब दाढीचे आणि भपकीदार जाम्या निम्याचे कित्येक मुल्लासाहेब, अल्लासाहेब, खानसाहेब, दरबारांत शोभेला मात्र असून खावंद खुदावंत ह्मणून निझामसाहेबांस कसें खुष करावें, व लांबलांब गप्पा मारून अल्लीच्या डोळ्यांत धूळ कशी टाकावी, इतकेंच मात्र ते जाणत, या शिवाय खऱ्या मर्दुमकीचा तेथें शून्यकार झालेला होता.

गोविंदराव काळे निझामसाहेबाच्या दरबारीं गेले आणि नानाफडनविसाचा निरोप बोलून चौथ सरदेशमुखीच्या यादीच कलमबंदी मोठ्या अदबीनें वाचूं लागले तों निझामसाहेबाचे धुंद झालेले दिमाग मशीरउल्मुलुख ऐटीखालीं गर्जून †बोलले 'अजी गोविंदराव,

---

* ऐतिहासिक गोष्टी भाग २-पान १९ गोष्ट १८ वी पहा. ( खड्यांची लढाई )

† पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १७५-१७६ व मराठ्यांची बखर भाग २७ पान १८८,

कौन् नाना फरन्वीस् और् क्या कल्मबंदि है, ओहम् नहि जानते. तुम पुनेमे जाकर नाना बम्मन्कु लेकर निझाम साहिबके दरबारमे आदबीसे आव, फिर सुनेंगे क्या चौथ है और क्या सरदेस्की वटवट है'!! हा मदांध उल्मुलुख इतकेंच बोलून थांबला नाहीं; तर त्यानें भर दरबारांत तमाशा उभा करून सवाई माधवराव आणि नाना फडनविस यांचीं सोंगें आणिवलीं आणि नानांची मनमुरक निर्भर्त्सना करून सर्व दरबारांत हाशा पिकविला!!!

ज्या सवाईमाधवरावांचें वैभव आणि ऐश्वर्य हीं अगदीं शिखरास जाऊन पोंचलीं होतीं, ज्यांचा दरारा असा कीं, काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्व राजांनीं ज्यांना थरथरा कांपावें, अशा पेशव्यांची निंदा भर दरबारांत एका उन्मत्त यवनानें केलेली पाहून गोविंदराव काळे क्रोधानें संतप्त होऊन भर दरबारांतून चित्त्यासारखा चवताळून उठला, आणि मिशांवर ताव देऊन सर्वांदेखत त्यानें *प्रतिज्ञा केली कीं 'जर मी नांवाचा गोविंरावकाळ्या असेन तरच ह्या मशीरउल्मुलुखाची धिंड काढून त्याला पुण्यांत दारोदार हिंडवीन' अशी भयंकर प्रतिज्ञा करून त्यानें कानावरील लेखणी व आंगावरील

---

* खडर्याची लढाई—पेशव्यांची बखर—सवाईमाधवराव—पान १७६ ओळी १८-२२ वाचा. व पुढें पान—१७७ पहा.

अंगवस्त्र हीं दरबारांत ठेविलीं आणि आपण पुण्यास चालता झाला !

हैदराबादचे दरबारांत झालेला प्रकार ऐकून नानाफडनवीस आणि सवाईमाधवराव यांचे आंगाची लाही लाहीं होऊन गेली व गोविंदरावानें केलेली प्रतिज्ञा ती माझी प्रतिज्ञा असें सांगून नानांनीं तो पण शेवटास नेण्याची तयारी केली. तिकडे मशीरउल्मुलुखाचे व निजामाचे बाहु फुरफुरत होतेच, त्यांना पेशव्यांच्या तयारीची वर्दी पोचतांच त्यांचे लोक सज्ज झाले.

*श्रीमंतसवाई माधवरावाकडून पत्रें रवाना होतांच भोंसले, शिंदे, होळकर, पटवर्धन, विंचुरकर, रास्ते, राजेबहादर, घोरपडे, निंबाळकर, जाधव, वाघोलीकर इत्यादि शेंकडो सरदार, पथकी, पागेदार, शिलेदार पेशव्यांस येऊन मिळूं लागले. लढाईचा कड्डा सरंजाम घेऊन श्रीमंत सवाईमाधवराव निघाले. पहिला मुक्काम सुमुहूर्तावर आणि श्रीमंतांच्या चंद्रबळावर गारपिरावर झाला.

नानाफडणिसांची राज्यव्यवस्था आणि सैन्याची शिस्त कांहीं अजब असे. पेशव्यांचें सैन्य पुण्याहून निघते वेळीं इतकें मोठें नव्हतें. त्यामुळें निझामअल्लीनें आपल्या वकिलास पुण्यांतील हालचालीविषयीं वि-

* पेशव्यांची बखर—खर्ड्याची लढाई—पान १८०.

चारपूस करितां त्यानें निझामास कळविलें कीं, 'पुण्यांत म्हणण्यासारखें सैन्य नसून पटवर्धन, विंचुरकर इत्यादि ब्राह्मण लोक मात्र जमले आहेत, परंतु ते दिवसांतून तिनदा तिनदा सोंवळ्या* ओंवळ्याचीं धोतरें वाळत घालतात आणि तिनदा तिनदा नेसतात'! पुण्यांतली ही तयारी ऐकतांच मशीर उल्मुल्ख टिऱ्या पिटूं लागला. जयश्रीची माळ आजच माझ्या गळ्यांत पडली, असें त्याला वाटूं लागलें. दरबारचे सर्व लोक खुलून गेले. निझामअल्लीनें आपल्या मनांत गांठ मारून ठेविली कीं, उदगीर, राक्षसभुवन, तांदुळजें, ह्या ठिकाणीं जरी पेशव्यांनीं माझा पराजय केला, तरी ह्या लढाईंत अस्मादिकाचीच फत्ते होणार! हैदराबादेंत निझामाचीच व्यर्थ फुषारकी जो तो मिरवूं लागला. कळवंतिणीही निजामाच्या जयाचींच गाणीं गाऊन बक्षिसें† उपटूं लागल्या!!

परंतु इकडे पुण्याकडे काय बहार उडाला तो पहा! गारपीराहून कूच होतांच प्रत्येक मुक्कामाला नानाफडणिसांच्या पूर्वसंकल्पाप्रमाणें भराभर‡ लोक येऊन पेशव्यांच्या सैन्यास मिळूं लागले! हिकडून

---

* खर्ड्यांची लढाई—ऐतिहासिक गोष्टी. भाग २—गोष्ट १८ पान १६ ओळी ५—पान १९ पर्यंत.

† मोडककृत पटवर्धन सरदारांचा इतिहास—पान ८३ ओळ १२ वी पहा.

‡ ऐतिहासिक गोष्टी भाग २ रा पान १६.

गाइकवाड आले ! तिकडून सचीव आले ! प्रतिनिधी आले ! चव्हाण आले ! डफळे आले ! थोरात आले ! पाटणकर येऊन थडकले ! सोमवंशी येऊन मिळाले ! जाधव हजर झाले ! असे हजारों योद्धे आपआपल्या युद्धसामुग्रीसह व सैनिकांसह नगरच्या वाटेनें मिळत गेले. गिलच्यावर स्वारी केली त्यावेळीं भाऊगर्दींत पानिपतावर ज्याप्रमाणें पेशव्यांचा अफाट सैन्यसमुद्र पसरला होता त्याप्रमाणेंच ह्याप्रसंगीं ही पेशव्यांचे एकुणएक सैन्याधिपती मोठ्या आनंदानें आले असून असा देखावा पुढें कधींच दृष्टी पडला नाहीं.

आतां या अति विस्तृत सैन्यसमूहाची लगाम धारण करणारा कोणता प्रौढप्रताप पुरुष होता ह्मणाल तर ज्याचें सर्व आयुष्य लढण्यामध्यें जाऊन शरीरावरील भयंकर जखमाच ज्याच्या पराक्रमाची साक्ष देत होत्या, ज्यानें आपल्या भुजबलाच्या योगानें डबघाईस आलेल्या पेशवाईस नारायणरावाच्या मृत्यूनंतर हात देऊन सावरिलें, आणि मदांध व गर्विष्ट यवनांचा संहार करण्याकरितांच ज्याचा अवतार, असा जो पटवर्धनकुलभूषण परशुरामभाऊ, तोच ह्या सेनासमूहाचा सेनानायक * होय ! या शूर

* बा० प्र० मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास-पटवर्धन सरदार पान ८४ ओळी ८-१३ व २२-२८ शिवाय पान ८९.

पुरुषाच्या हाताखालीं शिंद्याचे सेनापति जिउबा बक्षी, बाबाराव फडके, तुकोजी होळकर, रघूजी भोसले इत्यादि महान् महान् मराठे योद्धे असून डिवाईन, पेरान, व दुड्रेनीसारख्या पाश्चात्य लढवय्यांवरही याव वीराचा अम्मल!! काय त्या ब्राह्मण सरदाराची योग्यता! डिवाइनसारख्या व भोसले, होळकरासारख्या युद्धकुशल पुरुषावरही अम्मल चालविण्याला भाऊंचें शौर्य किती अजब असलें पाहिजे! त्यांचें रणधुरंधरत्व त्यावेळीं किती लोकमान्य असलें पाहिजे! ह्या लढाईंत खासा सवाईमाधवराव जातीनें रणभूमीवर आला असून सल्लामसलत देण्यास फडणिसांची स्वारी ही हजर होती. पेशव्यांची एकंदर फौज १३०००० स्वार व १०००० पेंढारी होते.

पेशव्यांचें सैन्य गारपिराहून पुढें निघाल्याचें ऐकून हैदराबादकर ११०००० फौजेचा कड्डा सरंजाम घेऊन बाहेर पडला. त्याच्या सरदारांच्या वल्गना* एकसारख्या चालू होत्याच. एकजण ह्मणे कीं मी आतां पेशव्यांची राजधानी लुटून पुणें शहर जा-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

ओळी १-७ पहा. आणखी मराठ्यांची बखर-भाग २७ कलम १६ पान १९२ ओळी ४-६ पहा.

* वा० प्र० मोडककृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पान ८३ ओळी १३-१७ पहा.

ळून खाक करणार. दुसरा ह्मणे कीं इतःपर मोंगल लोक मराठ्यांचे तगाद्यांतून मुक्त होणार व विजापूर आणि खानदेश प्रांतांना मराठे आंचवणार. मशीर उल्मुलुखाला तर तीन बोटें स्वर्ग उरून त्यानें निझामअल्ली पुढें विडाच उचलिला कीं 'जर मी जातीचा खरा खरा महमदी असेन तरच पेशव्याची गादी हिसकावून त्याला लंगोटी नेसवीन, त्याच्या आंगाला राख फाशीन, आणि हातांत लोटा देऊन त्याला काशीस पिटून लावीन'!!

पेशव्यांचें सैन्य गारदौंडास येतांच मोंगलांच्या मुलुखाची जप्ती करून सरकारचीं ठाणीं तेथें बसवावीं असा नानांच्याकडून † हुकूम सुटला. त्या बरोबर खानदेश, बागलाण, गंगथडी, भीवरथडी, माणदेश, वऱ्हाड इत्यादि ठिकाणीं भराभर जप्त्या होऊन पेशव्यांचा अंमल थेट बेदर पावेतों बसला. गारदौंडाहून कुच झाल्यावर पेशव्यांची फौज खड्याच्या मैदानाजवळ येऊन थडकली. परशुरामभाऊ बरोबर त्यांचे दोघे चिरंजीव रामचंद्रपंत व हरीपंत असून अवांतर भाऊबंदही होते. निझामअल्ली बेदनुराहून निघून मांजरा नदीचे काठानें मोरिघाट उतरत असतां प्रसिद्ध तात्या फडक्यांचे चिरंजीव बाबुराव

---

† नानांचा हुकूम—पेशव्यांची बखर-खर्ड्याची लढाई-पान १८३ ओळी १८-२१ पहा.

फडके यांनीं निझामाच्या टोळीवर एकदम हल्ला केला. परंतु त्यास कच खाऊन माघारें फिरावें लागलें. फडक्यांचा पराभव झालेला पाहून भाऊंनीं होळकराचे व पेशव्यांचे लोक घेऊन निझामाच्या सैन्यावर चाल केली. भाऊंनीं दवलतराव शिंद्याची फौज डावीकडे उभी केली होती. रघूजी भोसल्याचे लोक उजवे बाजूस घेतले होते आणि आपण सेनावलयाच्या मधोमध उभे राहून ते मोगलावर एकदम तुटून पडले !

पटवर्धन सरदार गर्जून येत आहे हें पाहून असतखान् आणि लालखान् असे दोन शूर मोगलसरदार १७००० फौज घेऊन भाऊबरोबर धडक मारण्याकरितां वेगानें धावून आले. त्यांत लालखानाचें प्रकर्ण फारच मोठें होतें. तो शरीरानें धिप्पाड असून खंद्या घोड्यावर सुद्धां हें प्रस्थ निभावत नसे; म्हणून तो हत्तीवर अंबारींत बसून तिरंदाजीनेंच लढत असे. लालखानानें मोठा पराक्रम करून मराठ्यांचे पुष्कळ शिपायी मारले व भाऊंसही दोन जखमा करून त्यांना घोड्यावरून खालीं पाडलें.* इतक्या-

* पटवर्धन सरदार—बाळाजी प्रभाकर मोडक कृत कर्नाटक संस्थानांचा इतिहास—पान ८६ ओळी १–१४ पहा. व मराठ्यांची बखर भाग २७ खड्र्याची लढाई कलम १६ पान १९३ ओळी ११–२०.

—लालखानानें भाऊंस पाडलें याबद्दल पेशव्यांच्या बखरींत कोठें उल्लेख नाहीं. फक्त बाबुराव फडके मागें हटला इतकें मात्र लिहिलें आहे.

त भाऊंचे चिरंजीव हरिपंत यांनीं आपल्या पित्यावरील तें संकट पाहून लालखानावर उडी मारली व त्यास ठार करून आपल्या करतबगारीनें पित्यास संतोषित केलें !

बाबुराव फडका हा संग्रामांत नवखा असल्यामुळें त्याचा दम सुटून जरिपटक्यासुद्धां शत्रूस पाठदाखवीत तो संग्रामांतून पळूं लागला. इतक्यांत जिउबा बक्षी जोरानें घोडा पिटीत फडक्याजवळ आला आणि त्याच्या नामर्दपणाबद्दल त्याचा धिःकार करून ह्मणाला ' रे भ्याडा, फडक्यांच्या कुळाला आज काय काळोखी आणतोस ही ? थूः तुझ्या पुरुषार्थाला आणि सरदारीला. असा भागुबाईपणा दाखवून पेशव्यांच्या सर्व फौजेला नीर्वीर्य, निःशक्त, आणि नाउमेद करणार काय ? तात्यांच्या पोटीं कशाला जन्म घेतलास ! शत्रूपुढें उभें रहावत नसेल तर न पळतां शिंद्याच्या लष्करामागें जाऊन स्वस्थपणें निर्भय रहा ' ! ! हें बोलणें ऐकतांच बाबुरावाला वडिलांच्या शौर्याचें स्मरण होऊन त्यास शरम वाटली आणि तो तसाच धैर्य धरून तेथें उभा राहिला.

याप्रमाणें खरड्याच्या विस्तृत पटांगणांत परांडा

किल्ल्यानजीक लढाईचें *तोंड लागतें आहे इतक्यांत पेशव्याकडील व निझामाकडील सर्व फौज समरभूमीवर येऊन थडकली.

आपल्याकडील सर्व फौज आलेली पाहून *परशुरामभाऊंनीं २०००० फौजेची मांड उठवून निझामावर एकच गर्दी करून सोडिली. रास्ते व विंचुरकर हेही मोठ्या वेगानें मोगलावर घसरले. नबाबाकडील सरदार रावरंभा निंबाळकर, भारमलमाने, व जहाजंगघोसा, ह्यांनीं एक लक्ष स्वारांची फळी पेशव्यांकडील सैन्याची लांडगे तोंड करण्याकरितां सोडून दिली! शिद्यांचा तोफखाना सुरू झाला! भोसल्याकडील बाणांची अतिवृष्टि होऊं लागली! भोसल्यांच्या बाणांचा मार जबर. एक एक बाण पांचपांच जणांचे बळी घेई! नबाबाच्या तोफांबरोबर पानशांचा तोफखाना धडाडूं लागला. खर्ड्याच्या मैदानांत भयंकर रणकंदन माजलें. पेश-

---

* लढाईच्या आरंभालाच पेशव्यांची जी ही थोडी तारंबळ उडाली, तेवढ्यानेंच फडणिसांचें धाबें दणाणून ते पळण्याची वाट पाहूं लागले. परंतु श्रीमंतांच्या फौजेनें नानांचा भित्रेपणा पाहून त्यांस दोष दिला, व आज मोगल बुडवूंच बुडवूं अशी प्रतिज्ञा करून ते सर्व चित्त्यासारखे रण करण्यास धावले. तेव्हां नानांना किंचित दम आला. पेशव्यांची-बखर पान १८६ पहा.

पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-खर्ड्याची लढाई-पान-१८७-१८८ पहा.

त्यांचा मारा निझामावर चोहोंकडून होऊं लागला. भोसल्याचे बाण समोरून येऊं लागले. गायकवाडाच्या तोफांचा भडिमार मोगलांचीं मुणकीं दग्ध करून टाकूं लागला. धुरानें आकाश व्याप्त झालें. लढाई घनचक्कर माजली. भाऊ २०,००० लोक घेऊन हरहर[†] महादेव असा गंभीर शब्द करून शिंद्यांसुद्धां गर्दीमध्यें शिरले! हजारों लोकांचीं शिरकमलें कंठनालापासून भाऊंची समशेर छटाछट दूर करूं लागली. त्या पटवर्धन वीरवराचा प्रोत्साहवन्हि अकस्मात प्रज्वलित होऊन सहस्रावधि मोगलांचे बळी त्यांत पटापट पडूं लागले! गतवयस्क भीष्माचार्याप्रमाणें त्या जरठ आणि वयोवृद्ध भाऊनें हलकल्होळ उसळून दिला! लालखानानें केलेल्या शस्त्रप्रहारांतून रुधिरप्रवाह चाललाच आहे, रक्तानें व धुळीनें सर्वांग माखून जाऊन धिप्पाड आणि भव्यशरीर अधिकच भयंकर दिसत आहे, साठीच्या वयांत सुद्धां ऐन गर्दीमध्यें गांगा धोंडा वाऱ्यासारखा फेंकून तलवारीच्या विलक्षण फेंकीनें सुभानखां, सलाबतखां सारख्या मोगलाकडील मोठमोठ्या धेंडांना ज्यानें त्राहि त्राहि करून सोडिलें आहे अशा त्या परशुरामभाऊचा पराक्रम पाहून बिनझोल हत्तीवरील आयन्याच्या

† पेशव्यांची बखर-सवाई माधवराव-खर्ड्याची लढाई-पान १८८ ओळी ८-९ पहा.

अंबारींत वीरासन ठोकून शरवृष्टि करीत असलेल्या राजा सवाईला परम कुतुहल वाटलें; आणि 'शाबास† भाऊ साहेब शाबास' असा हृदयोद्गार त्याच्या मुखांतून अनेक वेळां निघूं लागला ! !

भाऊंच्या जबर काटाकाटीनें मोगलाकडील लोकांचे पर्वतप्राय प्रेतराशि पडत आहेत इतक्यांत पेरॅन यानें जवळच्या टेंकडीवर ३६ तोफा चढवून निझामाचें सैन्य ऐन माऱ्यांत घेतलें, व एकदम भडिमार सुरू केला. भाऊंची कत्तल व पेरनचा भडिमार ह्यांच्या योगानें निझामाचे लोक पराभवपावून पळूं लागले निझामाकडील* रेमंडाच्या पलटणींनीं पेरन बरोबर बरीच वेळ झुंज चालविली होती. परंतु खुद्द निझाम साहेबाचेंच धाबें दणाणून त्यांनीं आपला हत्ती खर्डे गांवाकडे वळविला ! त्यामुळें अर्थातच सर्व सैन्याचा धीर सुटून जिकडे तिकडे धांव पळ सुरू झाली. इतक्यांत दिवस मावळून काळोख पडत चालला. तेव्हां तर मोगलांच्या धांदलपट्टीला पारावार

---

† मोडक कृत कर्नाटक संस्थानांतील राज्यांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पान ८६ ओळ शेवटली व पान ८७ पहिल्या ४ ओळी पहा.

* लालखानानें घायाळ केल्यावर परशुराम भाऊच्या नांवाचा उल्लेख लढाईच्या संबधानें, मराठ्यांच्या बखरीच्या इतिहासांत केलेला नाहीं. परंतु शिरा व परशुरामभाऊ हे लढाईच्या ऐन गर्दीत समशेर चमकावीत होते असें पेशव्यांच्या बखरींत स्पष्ट लिहिलें आहे.

नाहींशी झाली. मोगल लोक सैरावैरा पळत आहेत, पेशव्यांचे लोक मागून ठोकीत चालले आहेत असा प्रकार एक प्रहरपर्यंत चालला होता. मोगलांचे लोकांचे थवेच्या थवे जागोजाग मरून पडूं लागले. कांहीं लोक कापले गेल्यामुळें मेले, व कांहीं तर लढाईतल्या मारानें व पळण्याच्या श्रमानें श्रांत होऊन अन्नपाणी न मिळाल्या कारणानें वाटेंतच जातां जातां पडले, आणि ' या नभी, या खुदा, या अल्ला, कैसा बखत लाया ' असा करुणारव काढून धाय मोकलीत त्यांनीं जागच्या जागींच प्राण सोडिले ! !

अशा रीतीनें अल्लीच्या लोकांपैकीं पुष्कळ लोकांचे ताबूत जागच्या जागींच थंड झाल्यामुळें, त्यांची फारच वाताहात झाली. मग हाल अपेष्टा भोगीत तो राहिलेल्या लोकांसह खर्ड्याच्या लहानशा किल्ल्यांत शिरला. तेव्हां पेशव्यांनीं त्या किल्ल्याला गराडा देऊन निझामाचें अन्नपाणी बंद केलें, व किल्ल्यावर तोफ सुरू केली.

दोन दिवसपर्यंत निझामानें कसा तरी दम धरिला. परंतु तिसरे दिवशीं त्याला व त्याच्या लोकांना बंदुका खालीं ठेवणें प्राप्त झालें. कारण अन्नपाणी न मिळाल्याकारणानें अल्लीसाहेब व त्यांचे कंठमणी, उल्मुलुख, यांचे प्राण कासावीस होऊन ते तडफडूं लागले. पेशव्यांच्या हातांत लोटा देण्याविषयीं चंग

बांधणाऱ्या उल्मुलुखाला पेशव्याजवळच (पाण्याचा) लोटा मागण्याचा प्रसंग आल्यामुळें मशीरची मान खालीं झाली; आणि त्या मदांध यवनाच्या डोळ्यावरील धुंदी नाहिंशी होऊन 'बापहो तुम्हाला चाहिल तसा तह करून पाहिजे तें मुलुख घ्या पण कृपाकरून आह्मांस त्वरित प्राणदान द्या' अशा अर्थाचें विनंतिपत्र निजामअल्लीनें राजासवाईकडे पाठविलें ! !

## श्लोक.

नाहीं गल्ला न पाणी यवन तळमळी 'यानबी यार अल्ला'।
बोले सल्ला करोजी अबहि गनिमको चाहिसो देव जिल्हा॥

निजामअल्ली तह करण्याविषयीं विनंती करितो हें पाहून नानांनीं लढाई बंद करण्याचा हुकूम दिला आणि खालीं लिहिल्याप्रमाणें तहाचीं कलमें निजामाकडे लिहून पाठविलीं.

तहाचीं कलमें*:—

१. भर दरबारांत श्रीमंतांची निर्भर्त्सना आणि अवमान करणाऱ्या मदोन्मत्त मशीरउल्मुलुखाची धिंड काढण्याकरितां प्रथम त्यास पेशव्यांचे स्वाधीन करावें !

* मराठ्याची बखर—भाग २७ कलम—१६-पान १८७ पहा.

२. दवलताबादचा किल्ला आणि परिंड्यापासून तापीपर्यंतच्या मुलुखाचा कांहीं भाग पेशव्यांकडे असावा.

३. दंडादाखल ३०००००० रुपये व. . शिवाय लढाईबद्दल झालेला खर्च निजामानें पेशव्यांस द्यावा.

याप्रमाणें सर्व कलमें निजामानें मान्य करून मशीरउल्मुलुखाला मोठ्या दुःखानें गोविंदराव काळे यांचे स्वाधीन केलें. केलेली प्रतिज्ञा शेवटास गेल्यावर गोविंदरावांनीं निजामाच्या दरबारांत ठेवलेली लेखणी आणि अंगवस्त्र ह्यांचा स्वीकार केला. नंतर श्रीमंत सवाईमाधवराव, नानाफडणीस, आणि सरदार परशुराम भाऊ पटवर्धन हे आपल्या जयशाली सैन्यासहवर्तमान †जयजयकार करीत पुण्यास आले, व निजामअल्ली टिपें गाळीत भागानगरास गेला. मशीरउल्मुलुखाला पुण्यास आणल्यावर ख-

---

† पेशव्यांच्या बखरींतलि खर्ड्याच्या लढाईच्या वर्णनावरून असें स्पष्ट कळतें कीं ह्या प्रसंगीं उभयपक्षाकडे भरभक्कम फौज असून पेशव्यांनीं पुष्कळ पराक्रम केला. असें असतां डफ साहेबांच्या इतिहासांत 'ह्या लढाईंत मराठ्यांनीं ह्मणण्यासारखें कांहींच केलें नाहीं. निझामाचे लोक विनाकारण भिऊन पळाल्यामुळें पेशव्यांस जय आला' अशा अर्थाचा मजकूर आहे. बखरींत व इतिहासांत असा विरोध कां असावा ह्याचें कारण कांहीं कळत नाहीं.

जिन्याच्या विहिरीजवळील बंगल्यांत ठेविलें. बंदोबस्त कडेकोट होता.

खर्ड्याच्या लढाईंत जो पटवर्धनांनीं पराक्रम केला त्याबद्दल श्रीमंत खुष होऊन त्यांनीं परशुराम-भाऊ व त्यांचे बंधुवर्ग ( चिंतामणराव आणि रघुनाथ नीलकंठ ) यांस १७९५ सालीं सनद करून दिली. एकंदर सरंजाम २५५२१०० रुपयांचा असून २१९३२७७-६-६ रुपयांचा मुलुख लावून दिला. याच सालीं चिंतामणराव पांडुरंग यांस नवी सनद व नवा तैनात जाप्ता मिळाला.

---

## भाग ९ वा.

## चिमाजी माधवराव पेशवे आणि परशुरामभाऊ पटवर्धन मुख्य दिवाण.

राजा सवाईची कारकीर्द, किंवा इ०स० १७९५ हें साल अथवा पेशव्यांनीं मारलेली खर्ड्याची लढाई ह्या तिन्ही गोष्टींनीं पेशव्यांच्या अफाट सत्तेचा, त्यांच्या पराक्रमाचा आणि विलक्षण वैभवाचा कळस झाला असें म्हटलें तरी चालेल. कारण इ० स० १७९५ सालाच्या अखेरीस सवाई माधवरावांनीं

नानाफडणिसांच्या कडकॅ* वागणुकीस कंटाळून आत्महत्या केली व त्यामुळें नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर जशी धामधूम आणि दंगल कांहीं कालपर्यंत सुरू होती, तसाच प्रकार पुनः उद्भवून चोहोंकडे कारस्थानें व क्रांति लढूं लागल्या. पुणें शहरांत धर, पकड, मार, ठोक, ह्यांचा भयानक देखावा पुनः दृष्टीस पडूं लागला; आणि औरंगझेब बादशहाच्या मृत्यूनंतर मोगली राज्यास जशी उतरती कळा लागली व शिवाजीच्या मागें साताऱ्च्या गादीची जशी वाताहात होत गेली, त्याप्रमाणेंच सवाईमाधवरावांच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या वैभवाचे भर दोनप्रहर होऊन त्यांचा प्रतापसूर्य तेव्हांपासून पुढें हळू हळू अस्ताचलाला जाऊं लागला.

आतां ही जी वर धामधुमीची आणि दंगलीची स्थिति सांगितली तिचें कथानक जरी अत्यंत घोंटाळ्याचें आहे, तथापि आमच्या या चरित्राच

* 'पेशव्यांच्या बखरींत सवाईमाधवरावांच्या मृत्यूचें कारण निराळेंच दिलें आहे. तें असें कीं राघोबादादाचा पुत्र बाजीराव हा कैदेंत असून त्याचें व माधवरावांचें बरेंच सख्य असे. पुढें बाजीरावानें मांत्रिकाकडून ताईत भारून बळवंतराव नागनाथ वामोरीकर यांचेकडून त्या भारलेल्या ताइतास श्रीमंत सवाईमाधवरावांचा स्पर्श करविला. त्याबरोबर सवाईमाधवराव भ्रमिष्ट होऊन त्यानें वेडामध्येंच माडीवरून कारंजावर उडी टाकिली'!!

पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान १९६-१९८.

निकट संबंध त्या कथानकाशीं असल्यामुळें, तें वृत्त विस्तारेंकरून खालीं देतों.

सवाईमाधवरावांच्या मरणानंतर पेशव्यांचे गादीवर कोण बसवावा ह्याविषयीं नानाफडणिसास विचार पडला. सवाईमाधवरावांला औरस पुत्र नसल्यामुळें यशोदाबाईचे ( माधवरावांची पत्नी ) मांडीवर दत्तक द्यावा, तर बाळाजी विश्वनाथाची संतती ( बाजीराव, चिमाजी आप्पा ) कायम होतीच, व बाजीरावास पेशवा बनवावा, तर रघुनाथरावाचा, व त्याच्या संततीचा, छळ करणाऱ्या लोकांचें तो पारिपत्य करणारच. तेव्हां दोन्हीकडून सारखीच पंचाईत नानास पडली. शेवटीं एक मोठा दरबार भरवून सर्वांच्या अनुमतानें नानांनीं ठरविलें कीं, यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन तो मोठा होईपर्यंत बाईच्या नांवानेंच राज्यकारभार चालवावा.

नानांच्या मताला एक बाळोबातात्या कुंजर ( दवलतराव शिंद्याचा मुख्य दिवाण ) हा मात्र प्रतिकूल होता. पेशव्यांच्या दरबारीं शिंद्याचें विलक्षण वजन असून दौलतराव शिंद्यांचे सेनाधिपति जिउबा दादा बक्षी, आणि त्यांचे दिवाण बाळोबा तात्या, ह्यांस मुत्सद्दीमंडळ बरेंच वचकत असे; कारण त्यावेळीं शिंद्याच्या शिकलेल्या फौजेचा वि-

लक्षण दरारा बसून गेला होता. ह्या वरील दोन पुरुषांपैकीं जिउबादादा तर पुढें लवकरच मृत्यु पावला; परंतु नानांना दुसरा प्रतिकूल पुरुष जो बाळोबातात्या, ह्याचे मनांतून बाजीरावाची सुटका करून त्यालाच पेशव्यांचे गादीवर बसवावा असें होतें. शिवाय दवलतराव शिंद्याशीं कुंजराचे मारफत आंतून संधान बांधून, गादी प्राप्त झाली असतां चार लाखांचा मुलूख व फौजेचा खर्च हीं शिंद्यास देण्याचें बाजीरावानें कबूल केलें होतें.

बाळोबातात्याचा तो बेत जाणून फडणिसांचा जीव घोंटाळ्यांत पडला; कारण नानांचे हातांत सर्व पेशवाईचा कारभार जरी होता, तथापि सरकारी स्वतंत्र खडी फौज फारच थोडी असल्याकारणानें पेशव्यांस मदतीसाठीं आपल्या सरदारांकडेसच कधीं कधीं पहावें लागे. शिवाय फडणीस हे मुळापासूनच समशेरीचे ढिले असून ह्यावेळीं तर कंपूवाल्यांशींच गांठ होती. तेव्हां अर्थातच आपलें राजकारस्थान निर्विघ्नपणें शेवटास नेण्याकरितां नानांना तासगांवाहून परशुरामभाऊंस त्वरित बोलावणें भाग पडलें; व नानांच्या शब्दास मान देऊन पेशव्यांच्या गादीसाठीं आपली मान कापून देणारा हा शूर सरदार स्वारासहवर्तमान दोन दिवसांत पुण्यांत येऊन थडकला !

परशुरामभाऊ पुण्यास आल्यावर नानांनीं विचार केला कीं बाळोबातात्या जो पुढें बाजीरावाला गादीवर बसविणार ते आपणच त्याचे आधीं बाजीरावाची गादीवर स्थापना करून तें यश संपादन करावें ह्मणजे आपला बोज राहून शिंद्यांचेंही महत्व विशेषसें होणार नाहीं. नंतर बाजीरावाची सुटका करून त्याला पुण्यास आणण्याकरितां नानांनीं भाऊंस* शिवनेरी किल्ल्यावर पाठविलें. परशुरामभाऊंनीं बाजीरावाला खात्रीच्या व विश्वासाच्या पुष्कळ गोष्टी सांगून आपल्या इमानीपणाबद्दल त्याची खातरजमा केली, आणि त्याला गादीवर बसविण्याविषयींचा आपला हेतु कळवून चिमाजीआप्पा व बाजीराव यांसमागमें भाऊ गडाखालीं उतरले.

पुढें बाजीराव आणि नानाफडणीस यांची भेट होऊन उभयतांच्या आणाशपथा झाल्या. झालेल्या बऱ्यावाईट गोष्टी उभयतांनींही विसरून जाऊन पुढें परस्परांनीं मोकळ्या मनानें व कोणतीच तेढ न धरितां साफ दिलानें वागावें, अशाविषयीं उभयतांची आणभाक झाली व बाजीरावास गादीवर बसवून नानाफडणिसांनीं पूर्वीप्रमाणें सर्व कारभार चालवावा असा बेत ठरला.

* मोडकक्कृत इतिहास-पटवर्धनसरदार-पान ८९ व पेशव्यांची बखर-पान २००-१९९.

फडणिसानें रायबाजीबरोबर कारस्थान करून आपल्या सल्ल्याशिवाय नाना आपण होऊनच बाजीरावास पेशवा करणार, हें बाळोबातात्याला कळतांच तो रागानें लाल होऊन गेला, आणि नानांची मसलत हाणून पाडीन तरच शिंद्याचा खरा दिवाण होईन अशी प्रतिज्ञा करून त्यानें कंपूवाल्याची सर्व फौज पुण्यावर आणिवली ! !

पाँटिलबोवाचीं लढाऊ पलटणें आपल्यावर येतात हें पाहून फडणिसांची गाळण होऊन त्यांनीं पळून जाण्याचा एकाएकीं घाट घातला, आणि आपली चीजवस्त गोळा करून सातार्‍यास पळून जाण्याची त्यांनीं तयारी आरंभिली.

इतका खटाटोप करून सरशेवटीं नाना, बाळोबाच्या भीतीनेंच पुणें सोडून जाणार ही बातमी भाऊंस कळतांच ते धांवत धांवत फडणिसांच्या वाड्यांत आले, आणि त्यांच्या नामर्दपणाबद्दल व भित्रेपणाबद्दल त्यांस दोष देऊन गंभीर मुद्रेनें †ह्मणाले:—
'नाना, हें तुह्मीं काय मांडलें आहे ? तुह्माला मतिभ्रंश तर झाला नाहींना ? तासगांवाहून फौजेसुद्धां

---

* मोडककृत इतिहास–पान ८९–पॅरा २ पहा.

† 'धैर्य धरून फौज जमा करूं व शिंद्याचा पराभव करूं' अशाबद्दल भाऊंनीं नानास पुष्कळ सांगितलें परंतु नाना भित्रे असल्यामुळें त्यांचा धीर सुटला.—मोडककृत इतिहास–पान ८९–पॅरा २ रा–ओळी ५–६–७ वाचा.

मला बोलावण्याचा व बाजीरावाची सुटका करण्याचा हाच काय परिणाम? राज्याचें सुकाणूं चालविणाऱ्यानेंच असे पाय पांगुळले ह्मणजे अवांतर लोकांनीं काय करावें बरें? तुह्मीं असा भित्रेपणा दाखविला तर सर्व जग तुम्हाला काय ह्मणेल याचा नीट विचार करा, विचार करा. आज ह्या अफाट ब्राह्मणी राज्याची अशी अवस्था करून त्याचें काम अंगाबाहेर टाकलें असतां काय दुर्धर परिणाम होणार आहे तिकडे किंचित् दृष्टि फेंका. त्याला आजच ना धनी ना चाकर. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत न राहून चोहोंकडे बलबलपुरी व झोटिंगपाच्छाई माजणार आहे. आपल्या राज्यावर झडप घालण्याकरितां परराष्ट्रें कशीं टपत बसलीं आहेत, हें तुम्हीं जाणतच आहां. तुह्माला ह्या गोष्टी मी सांगाव्या अशी माझी मुदलींच योग्यता नसून तुमच्या राजकारस्थानाचा व तुमच्या मसलतीचा किता सर्व जमानें गिरवावा अशी तुमची योग्यता व इतकें तुमचें बुद्धिबल! असें असतां ह्या आणीबाणीच्या वेळीं तुम्हीं अगदींच हातपाय गाळलेत हें पाहून माझा दिल अगदीं फाटून गेला आहे. तुम्हाला इतकें गडबडण्याचें कांहींच कारण मला दिसत नाहीं. यःकश्चित कुंजरानें तुमची इतकी तारंबळ करून सोडावी ह्यासारखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणतीच मला दिसत

नाहीं. नारायणरावसाहेबांच्या मृत्यूनंतर कोणकोणतीं अरिष्टें व कसेकसे बिकट प्रसंग आपल्यावर गुदरले, व त्या प्रसंगांतून किती शिताफीनें आपण पार पडलों ह्या गोष्टी तुम्हीं अगदींच विसरलां काय? त्या काळाचा व त्या स्थितीचा विचार केला असतां, प्रस्तुत प्रसंग त्याच्या पासंगासही पुरणार नाहीं. होळकरगायकवाडांसारखे मराठे सरदार आजच अस्तंगत झाले काय? हरभट पटवर्धनांच्या वंशजांनीं आजच कंकण बांधलें काय? जर तुम्हीं धीर न सोडाल, तर हा एक परशुरामभाऊच कंपूवाल्याला पुरून उरणार आहे. त्याची बिषाद काय! तुम्हीं व मी जर एक आहों, तर दौलतरावासारखे हजारों पाटील व बाळोबासारखे हजारों कुंजर धुडकावून लाऊं, शेंकडों बाजीराव गादीवर बसवूं, व हवे ते फेरफार व पाहिजेल तीं कारस्थानें पेशवाईच्या संरक्षणासाठीं करूं. परंतु नाना, तुम्हीं मात्र कंबर खचूं देऊं नका. तुम्ही व्यर्थ त्या शिंद्याची भिति बाळगतां. महादजीच्या वेळेची बळकटी शिंद्याच्या फौजेंत आज मुदलींच नाहीं. आपण हरप्रयत्नानें शिंद्याला वश करूं व समयविशेषीं त्याच्याशीं टक्कर मारून त्याला चीतही करूं, परंतु नाना, तुम्हीं मात्र दम सोडूं नका. तुम्हाला बाजीराव पेशवा करणे नसेल, तर दुसरी पाहिजेल ती तोड काढा,

वाटेल तें कारस्थान लढवा, परंतु हाय घेऊन कम जोर होऊं नका; हा तुमच्याशीं परशुरामभाऊ बोलत नसून पेशव्यांच्या गादीविषयींची खरी कळकळ तुमच्याशीं बोलत आहे, व निष्पाप स्नेहभावाचेच हृदयोद्गार बाहेर पडत आहेत; ह्याकरितां नाना माझ्या बोलण्याचा कोणताच विषाद न मानतां मी सांगतों ह्या गोष्टीस मान द्या, साताऱ्यास जाण्याचा बेत रहित करा, आणि पूर्ववत कारभारांत मन घाला, ह्मणजे मग परशुरामाची समशेर व फडणिसांची लेखणी ह्यांची काय अजब करामत आहे ती पुनः जगाच्या प्रत्ययास आणून देऊं.'

परशुरामभाऊंचें हें वीरश्रीचें, दिलदारीचें, व समयास योग्य असें भाषण ऐकून फडणिसांच्या चित्तांत कांहींसा विपर्यास पडला; परंतु ते स्वभावसिद्ध भित्रे असल्यामुळें, व ह्यावेळीं त्यांचें वय ऐन साठीच्या भरांत असल्यामुळें, शिंद्याच्या फौजेची विशेषच दहशत त्यांना बसली होती. शिवाय बाजीरावाच्या चंचल बुद्धीचाही भरंवसा त्यांना येईना. ह्मणून परशुरामभाऊंच्या सुबुद्धिवादावर व त्यांच्या ३५ वर्षांच्या स्नेहमैत्रीवर पाणी घालून अखेरीस नानांनीं बाजीरावाला भाऊंचे हवालीं केलें, आणि आपण घाबऱ्या घाबऱ्या पुरंदरावरून साताऱ्यास पळ काढिला !

नानाफडणीस अखेरीस भ्याडपणानें पळून गेला हें पाहून परशुरामभाऊंना अत्यंत क्रोध आला. मग हातीं धरलेलें काम शेवटास नेण्याचा दृढ निश्चय करून त्यांनीं त्या अफाट राज्याची धुरा उचलली; व बाळोबातात्यालाच आपलासा करून सर्व कारभार जातीनें हांकण्याविषयीं भाऊंनीं कंबर बांधिली.

पुढें शिंद्याचे दिवाण व परशरामभाऊ यांचा विचार ठरला कीं बाजीरावाला गादीवर न बसवितां चिमाजीआप्पालाच* यशोदाबाईचे मांडीवर दत्तक देऊन पेशवा बनवावा व चिमाजी माधवरावांचीं वस्त्रें सातान्याहून आणावीं. त्या बेताप्रमाणें दोघांनींही दोन कामें उचललीं. बाळोबानें बाजीरावाला कैद करून आपल्या लष्करांत पळवून नेलें, व इकडे परशुरामभाऊनें †लष्करांत जाऊन मोठ्या छातीनें व हिकमतीनें चिमाजीआप्पाच्या तंबूपर्यंत प्रवेश केला, आणि आप्पासाहेबाला कडेवर‡ घेऊन तेथील भयंकर काहुराला न

* चिमाजी आप्पाला गादीवर बसविण्याविषयीं नानांची भाऊना आंतून सांगी होतीच.

† चिमाजी आप्पा वगैरे मंडळी पुणें शहरांत आली नसून त्यांचा तळ त्यावेळीं पुण्यापासून तीन कोसांवर होता. पेशव्यांची बखर–पान २००–ओळ १० पहा.

‡ चिमाजी आप्पाच्या राज्याभिषेकाचें व इंग्लंडच्या गादीवर स्थानापन्न झालेल्या लेडि जेन ग्रे, इच्या कारकीर्दीचें किती

( पुढें चालू. )

जुमाननां पट्याचे *हात करीत करीत व तुटून पडणाऱ्या लोकांची कत्तल उडवीत उडवीत हा पटवर्धन वीर पुण्यांत येऊन थडकला ! ! ( ही गोष्ट इ० स० १७९६ च्या मे महिन्याच्या २६ व्या तारखेला घडली. )

आप्पासाहेबाला आणल्यावर भाऊंनीं लागलेंच दत्तविधान करविलें; आणि साताऱ्याहून पेशव्यांचीं वस्त्रें आणून चिमाजी माधवराव यांच्या नांवाची द्वाही चोहोंकडे फिरविली. चिमाजी माधवराव पेशवे बनतांच परशुरामभाऊ पटवर्धन पंतप्रधानांचे मुख्य दिवाण झाले. जिकडे तिकडे भाऊसाहेब,

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

विलक्षण साम्य आहे तें पहाः—इकडे रायबाजींची रेषा उपटून राज्यलाभाचा योग आला असतां मध्यंतरीं खो येऊन आप्पालाच गादी प्राप्त होते; तसाच प्रकार तिकडे होऊन बिचाऱ्या मेरीच्या तोंडाला पानें पुसून जेन ग्रेचाच राज्याभिषेक होकला. इकडे भाऊंसारखे वीरमणी रायबाजींच्या मंडळींना ठोकण्याकरितां जसे सिद्ध होते, तोच प्रकार इंग्लंडांतही असून लेडि जेन ग्रे हिच्या तर्फेची गिल्डफर्डडड्लीसारखी मंडळी मेरीला मारण्याकरितां तयार होतीच. इतक्यानेंच यांचें साम्य झालें नाहीं; कारण आमच्या आप्पासाहिबांच्या पेशवाई वैभवाचा जसा थोडया महिन्यांतच मोरया झाला, तोच बहार इंग्लंडांतही उडून तिकडील शिराळशेटीतर दहा दिवसांतच आटपली ! !

( Vide the reigns of Edward VI and Bloody Mary )

History of England.

* पेशव्यांची बखर-पान २०१-पॅरा २ रा-ओळी ९-१०-११-१२ पहा.

भाऊसाहेब असा ध्वनि गर्जू लागला व हा पराक्रमी पटवर्धन याप्रमाणें आपल्या बाहुबलाच्या विलक्षण प्रभावानें वाढत जाऊन पेशवाईचा सत्ताधीश व राज्यसूत्राचा चालक होऊन बसला ! !

नाना फडनविसांच्या चातुर्याविषयीं व राजनीतिविषयीं भाऊंची बालंबाल खात्री असल्यामुळें नाना साताऱ्यास होते तरीही कित्येक प्रकरणांत भाऊ त्यांची सल्लामसलत घेत व त्यांनीं पुण्यास यावें ह्मणून वारंवार सूचना करीत. परंतु नाना आपल्या विमल अंतःकरणाच्या मित्राविषयीं ( भाऊंविषयीं ) बेभरवसा व अधीरपणा दाखवूं लागल्यामुळें भाऊंच्या मर्जीतून ते अगदींच उतरले आणि उत्तरोत्तर त्या उभयतांचें शत्रुत्व विशेष वाढत जाऊन तें इतक्या निकरास पोंचलें कीं, एके प्रसंगीं तर परशुरामभाऊंनीं आवेशाच्या भरांत फडनविसांचा वाडा जप्त करून आंतील ४० लक्षांचें कापड दसऱ्याच्या दिवशीं सर्वांस वांटून दिलें.*

भाऊंचें व नानांचें याप्रमाणें वितुष्ट पडतांच साताऱ्यांत व पुण्यांत धराधर पळापळ सुरू झाली. भाऊंचे चिरंजीव हरिपंत पटवर्धन यांजबरोबर ४००० फौज देऊन बहिरोपंत मेहेंदळे व त्रिसा-

---

* पेशव्यांची बखर-पान २०४-पॅरा २ पहा-हाच मजकूर मराठ्यांच्या बखरींत किंचित निराळा आहे.

जीपंत वाडदेकर यांची रवानगी सातान्यास नानांना कैद करण्याकरितां झाली. ही मंडळी सातान्यास गेल्यावर त्यांनीं फडणिसांना पकडण्याचा बराच घाट घातला. नानाही त्यावेळीं सातान्यास अगदीं एकटेच नसून त्यांनीं आपली नेहमींची फौज पुण्याहून बरोबर आणविली होतीच; परंतु हा धूर्त पुरुष फौजफांट्यावर तरी कोठचा अवलंबून रहाणार? त्यांनेंही मेहेंदळे, वाडदेकर, पटवर्धन, वगैरे मंडळी मोठ्या प्रेमभावानें आपल्या घरीं आपल्यास भेटण्याकरितां आलेली पाहून स्वतःवरील अनर्थ ताडला; व त्यांस ओटीवर बसवून *लघुशंकेच्या निमित्तानें मंडळींच्या हातावर तुरी देऊन जो एकदां मागीलदारीं गेला तो गेलाच !!!

फडणिसांची शिकार घालवून मंडळी पुण्यांत आल्यावर नानांच्या पक्षाची मंडळी कैद करण्याचा झपाटा सुरू झाला. मशीरउल्मुलुखाची सुटकाही

---

* नानांना धरण्याकरितां पाठविलेल्या इसमांपैकीं वाडदेकर यांचे मनांतून नानांस धरण्याचें नव्हतें, ह्मणून मंडळींचीं व नानांचीं बोलणीं चाललीं असतां वाडदेकरांनीं जानवें काढून तें आपल्या कानावर ठेवलें. ती इशारत समजतांच नाना तेथून उठले व 'हा मी आलोंच' असें ह्मणून जे एकदां आंत गेले ते मागचे दारानें थेट महाडास पालखींत बसून गेले! इकडे मंडळी वाट पाहून दमली. शेवटीं नानांनीं आपल्याला गुंगारा दिला असें पाहून खजील होत्साते ते सर्वजण पुण्यास परत आले.
—पेशव्यांची बखर–सवाई माधवराव–पान २०१–२०२.

याच समयीं होऊन त्यानें आपल्या सुटकेबद्दल ३०००००० रुपये पेशव्यांस देऊन तो गुलटेंकडीवर जाऊन राहिला. फडणिसांच्या तर्फेच्या मंडळींवर एकदम गदा फिरूं लागली. परशुरामभाऊ व दवलतराव शिंदे ह्यांचेंच प्राबल्य चोहोंकडे झालें. त्यांनीं बाबा फडक्याला कैद करून चाकणच्या किल्ल्यावर टाकिलें. नानांचा परम स्नेही बापू लेले याच्या पायांत बिडया ठोकल्या. नारोपंत चक्रदेव याला भाऊंचे लोक धरणार इतक्यांत त्याला ही कुणकुण कळून तो गुलटेंकडीवर मोगलांच्या सैन्यास जाऊन मिळाला. महाडाहून पुण्यापर्यंत नानांचीं कारस्थानें जागोजाग सुरू असल्यामुळें तीं पटापट बाहेर पडून लोक भराभर कैद होऊं लागले. कुंजराला भिऊन नानांनीं जरी पोबारा केला होता, तथापि आपला पूर्वीचा दिवाणगिरीचा हुद्दा संपादन करून गत वैभव प्राप्त करण्याविषयींची त्यांची इच्छा बालाग्र कमी झाली नव्हती; ह्यामुळें परशुरामभाऊ पटवर्धनांच्या कारकीर्दींत इतर गोष्टींपेक्षां नानांचीं कारस्थानें व तत्पक्षीय लोकांची कैद ह्यांचाच सुळसुळाट विशेष माजला होता. मागें जी कैद केलेल्या मंडळीची नामावळी सांगितली, त्याशिवाय निळकंटराव पागे या नानाच्या शूर सरदारास पकडण्याकरितांही भाऊंनीं कांहीं लोक पाठविले,

परंतु त्यावेळीं असा चमत्कार झाला कीं भाऊंचे लोक पाठीस लागतांच निळकंठराव पागे घोड्यावर स्वार होऊन त्यांनीं आपले बरोबर १५ लोक घेत-ले व पाठलाग करणाऱ्यांच्या देखत देखत भरबुध-वारांतून हा शूर पुरुष तरवार फेंकीत निघून गेला; परंतु त्यावेळीं निळकंठरावाच्या अंगावर हात टा-कण्याची कोणाचीच * छाती झाली नाहीं. हा शूर परभु सरदार पुण्यांतून गेल्यावर तो महाडास नाना-फडणिसांना जाऊन मिळाला. पेशव्यांच्या ५२ पा-ग्यांपैकींच हा एक प्रसिद्ध पाग्या होता.

परशुरामभाऊ पटवर्धनांनीं पंतप्रधानांच्या मुख्य दिवाणगिरीचा उपभोग सुमारें ६ महिने घेतल्यावर त्यांच्या नशिबानें एकदम उलट खाण्यास सुरवात केली. नानाफडणिसांचीं पुण्यांतलीं कारस्थानें परि-स्फुट झाल्यावर त्या चतुर पुरुषानें बाजीरावाशींच एकदम संधान बांधलें; कारण कीं ह्या प्रसंगीं नाना-प्रमाणें बाजीरावही अज्ञातवासांतच दिवस काढीत असून दोघांचीही दशा एकसारखीच झालेली. नानां-च्या अधिकाराचा, त्यांच्या वैभवाचा, व त्यांच्या दौलतीचा पूर्ण उपभोग ज्याप्रमाणें सरदार परशुराम-भाऊ घेत होता त्याप्रमाणेंच रायबाजींच्या पुढलें भर-लेलें ताट हिसकावून त्याजवर चिमाजीआप्पाच झोड

* पेशव्यांची बखर—सवाई माधवराव-पान २०४-पॅरा १ ला.

देत होता, ह्यामुळें मागील समदुःखी पुरुषांची गट्टी तेव्हांच होऊन त्यांचा गुप्त पत्रव्यवहार *बाळोबा कुंजर नांवाच्या कोणी शूद्र शिलेदाराच्या मार्फत सुरू झाला.

नानांचें व बाजीरावाचें एकचित्त होतांच फडणिसांनीं आपल्या अकलेची करतबगारी दाखविण्यास पुनः सुरुवात केली. हा पुरुष महाडास बसला होता तरीही बसल्या बसल्याच त्यानें २५००० फौजेचें काहुर अकस्मात उभें करून श्रीमंत चिमाजी माधव, परशुरामभाऊ आणि बाळोबातात्या यांची चांदी उडविण्याचा रंग आणला ! त्यानें बाबुराव फडक्याला वश करून पेशव्यांची खासगी फौज आपल्याकडे ओढली ! मशीरउल्मुलुखाच्या द्वारानें निझामाशीं संधान बांधून त्याची जयत फौज खडी केली ! भोंसले व तुकोजी होळकर यांच्या पाठी थोपटून कुंजराचें गंडस्थळ विदारण करण्याकरितां त्या पुरुषसिंहाचा उत्साहवन्हि प्रज्वलित केला ! पटवर्धनांचे निरंतरचे हाडवैरी कोल्हापुरकर ह्यांची उठावणी करून पटवर्धनांचे मुलुखांत धुमाकुळ † सुरू केला ! इतकेंच नव्हे, पण सखाराम घाटगे या नांवाच्या

* हा बाळोबा कुंजर म्हणजे शिंद्याचा दिवाण बाळोबातात्या कुंजर तो नव्हे, तर दुसराच कोणी एक कागलकरांचा वंशज होता हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.–मराठ्यांची बखर–भाग २८–कलम ८.

† करवीरकरांनीं तासगांव लुटलें व भाऊंचा मोठा वाडा जाळून फस्त केला. ( मोडककृत इतिहास–पान ९७. )

कोणा सरदाराच्या लावण्यसंपन्न कन्येचें * आमिष दाखवून प्रत्यक्ष दौलतराव शिंद्यालाही या बहाद्दरानें मुठींत आणून सोडिलें आणि दिवाणाच्या (बाळोबा तात्याच्या) मानेवर तरवार ठेवण्याविषयीं कंपूवाल्याचीही उठावणी केली!!!

अशा रीतीनें हें अगडबंब कारस्थान जरी भरतखंडाच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पेटलें† होतें तथापि तें इतक्या गुप्त रीतीनें व दक्षतेनें चाललें होतें कीं त्याचा भडका होऊन त्यांत कित्येकांचे बळी पडतपर्यंत परशुरामभाऊ व बाळोबातात्या कुंजर ह्यांना त्याची मुदलींच दाद लागली नाहीं!! इतकेंच नाहीं, पण नाना फडणिसांला कैद करण्याकरितां देखील त्याच शिंदे, होळकर, मशीरउल्मुलुख आदिकरून फितूर झालेल्या लोकांचीच रवानगी भाऊंनीं केली‡; त्यामुळें ह्या सर्व गोष्टी

---

* शिवाय नानांनीं शिंद्याबरोबर असाही करार केला होता कीं जर तुम्हीं बाळोबातात्याला कैदेंत घालून बाजीरावाला गादीवर बसवाल तर मी तुम्हाला नगरचा किल्ला, १० लक्षांचा मुलुख व परशुरामभाऊंची सर्व जहागीर इतकीं देईन.—(मराठ्यांची बखर–भाग २८–कलमें ८–९–१० पहा.)

† ह्या प्रसंगीं इंग्लिशांस सुद्धां नानांनीं अनुकूल करून घेतलें होतें.

‡ परशुरामभाऊ तरवारबहाद्दरींत जसा निपुण होता तसा (मराठ्या० बखर–भाग २८–क० ९.) राजकारस्थानांत तो म्हणण्यासारखा नव्हता; म्हणूनच पुढें नानांनीं सर्व सत्ता हिसकावून घेतली. व चिमाजी माधव यांच्या कारकीर्दीचे बारा वाजले.

नानांचे पथ्यावर पडून त्यांना ह्या लोकांचें अनायासेंच सहाय झालें, व फडणिसांचा फडशा उडविण्याकरितां पाठविलेल्या शिंदेहोळकरांच्या सैन्यानें एकदम उलट खाऊन चिमाजी माधवाची, भाऊंची व बाळोबानात्याची तळी उचलण्याकरितां तें पुण्यावर चाल करून आलें !

दवलतराव शिंद्यानें आपला दिवाण बाळोबातात्या कुंजर यास अक्टोबरचे २७वे तारखेस रात्रौ अकस्मात् कैद केलें ; आणि परशुरामभाऊ पटवर्धनास कैद करण्याकरितां मश्रुउल्मुलुखाची फौज देऊन नारोपंत चक्रदेव याची गुप्तरीतीनें तावडतोब रवानगी केली. नारोपंत चक्रदेवानें पुणें शहरांत शिरण्यापूर्वी तेथील हालहवाल कशी आहे व परशुरामभाऊ पटवर्धनावर कोणत्या वेळीं कसा घाला घातला असतां आपलें काम फत्ते होईल याविषयीं खुलासा कळण्याकरितां दोन लखोटे लिहिले. एक लखोटा आप्पा बळवंत यांचे नांवचा, व दुसरा लखोटा ( हरिपंततात्या फडके यांचे भाचे जे ) परशुरामभाऊ वैद्य यांचे नांवचा होता. हे दोन्ही गृहस्थ नारोपंत चक्रदेवाचे अत्यंत भरवशाचे स्नेही असत. हे दोन लखोटे दोन हलकाऱ्यांजवळ देऊन त्यांस पुण्यांत पाठविलें. ते शहरांत आल्यावर प्रथम आप्पाबळवंत मेहेंदळे यांचे वाड्यांत गेले. त्यावेळीं

अपरात्र झालेली होती. आप्पाबळवंतांनीं आपला ल खोटा घेऊन 'हा परशुरामभाऊला नेऊन द्या' ह्मणून मोघम सांगितलें. त्या बिचाऱ्या हलकाऱ्यांस परशुरामभाऊ वैद्य कोठचा ठाऊक असणार? त्यावेळीं महाराष्ट्र प्रदेशांत गाजलेला पेशव्यांचा दिवाण परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांच्याच नांवाचा हा लखोटा असेल असें समजून ते मेहेंदळ्यांच्या वाड्यांतून निघाल्यावर जवळच्याच* पटवर्धनांच्या मोठ्या वाड्यांत शिरले आणि भाऊंना उठवून त्यांनाच तो लखोटा दिला!!!

गफलतीनें आपल्या हातीं आलेलें पत्र वाचून पहातांच भाऊंच्या पोटांत चर्र झालें. ती वेळ विचार करण्याची मुदलींच नव्हती. त्या घोर प्रसंगांतून पार पडण्याच्या नजविजीस ते लागले. भाऊंनीं आपला लढाईचा पोषाख† एकदम चढविला; अंगांत चिलखत घालून डोकीला मंदील फडकाविला; पायांत तुमान चढवून चढाऊ जोडा घातला; भरजरीच्या शेल्यानें कंबर कसली, पाठीशीं ढाल बांधून जंबिया-बिचवा उजव्या बाजूस लटकाविला, आणि दोन हातांत दोन पट्टे चढवून त्या वीरश्रेष्ठानें धाड-

---

* मेहेंदळ्यांचा व पटवर्धनांचा (हल्लीं श्रीमंत तात्यासाहेब सांगलीकरांचा) हे दोन्ही वाडे किती जवळ जवळ आहेत हें पुणेंकरास निराळें सांगणें नकोच.

† पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान २०९ वाचा.

कन् चौकांत उडी टाकली व ईश्वराचें नामस्मरण करून तो वाड्याबाहेर पडला ! !

ह्या वेळीं परशुरामभाऊपटवर्धनांचा प्रयत्न केवळ स्वतःचाच जीव बचावण्यासाठीं होता असें कदाचित् कोणास वाटेल; पण छिः! त्या रणधीर स्वामिभक्ताच्या हातून असें कसें घडेल ? पटवर्धनांचे पुरुष धन्याकरितां मान कापून देण्यासाठींच अवतरले होते ह्मणून जें आह्मीं कित्येक प्रसंगीं ह्मटलें आहे त्याचीच पुनरुक्ति पुनः एकवार करून सांगतों कीं वाचकहो, सीतापतीसाठीं ज्याप्रमाणें कपींद्रानें भयानक संकटांतून उडी घ्यावी व साधुश्रेष्ठ स्वामी रामदासाकरितां आणि स्वामी जनार्दनाकरितां अनुक्रमें कल्याणासारख्या व एकनाथासारख्या शिष्यश्रेष्ठांनीं वेळीं स्वतःचीं शिरकमलें देण्यासही जसें सिद्ध व्हावें, त्याप्रमाणेंच ह्या दुर्धर प्रसंगीं परशुरामभाऊनें आपल्या जिवाकडे न पाहतां आपला धनी जो श्रीमंत चिमाजी माधव पेशवा त्याचा प्राण वांचविण्याकरितां आधीं शनवारवाड्यांत* धांव घेतली ! !

थोरल्या वाड्यांत शिरतांच भाऊंनीं प्रथम श्रीमंत चिमाजी माधव यांस जागे करून त्यांचा

* पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान ३०९-ओळ ८ वी पहा.

पोषाख घातला, व श्रीमंतांचें संरक्षण करण्यासाठीं भाऊंचे दोघे चिरंजीव बाबा पटवर्धन व दाजीबा पटवर्धन हे तेथेंच रहात असत, त्यांसही उठवून भाऊंनीं आपलेबरोबर घेतले. शिवाय खासगी पथकाचे भाऊंचे स्वारांपैकीं ५०० स्वारही हां हां ह्मणतां येऊन मिळाले, आणि याप्रमाणें जमाजम होतांच चिमाजी आप्पास घेऊन भाऊ वाड्याबाहेर पडणार इतक्यांत हिकडे लखोटा फुटल्याची बातमी नारोपंत चक्रदेवास कळून मभुन्मुलुखाची ५०००० फौज दीन् दीन् शब्दाच्या भयंकर डुरकण्या फोडीत मोठ्या त्वेषानें शहरांत घुसली व बाजीराव रघुनाथ यांचा प्रसिद्धपणें झेंडा मिरवून परशुरामभाऊ व चिमाजी आप्पा यांस चतुर्भुज करण्याकरितां हा प्रचंड सेनासमुद्र दिल्लीदरवाजाजवळ येऊन थडकला!!!

राजवाड्याला मोगलांचा भयंकर गराडा पडतांच पुण्यामध्यें मोठा हाहाःकार झाला! ती वेळ पहांटची असून दिग्मंडल आरक्त करणारा दिनकर हा दुर्धर देखावा अवलोकन करण्याकरितांचे कीं काय, पूर्वेकडून डोकावत होता. शहरांतली सामसूम नुकतीच नाहींशी होऊन नागरिक स्त्रियांचा सडासंमार्जनाचा विधि झपाट्यानें सुरू होता! नैमित्तिक स्नानसूरांच्या झुंडी मुळामुठा नदीवरून स्नान

करून परत घरोघर येत होत्या. कित्येक स्त्रिया देवदर्शनाकरितां नुकत्याच बाहेर पडल्या होत्या. नाकेबंदीमुळें रात्रीं अडकून राहिलेले बाहेरील लोक हळू हळू शहरांत शिरत होते. लहान मुलें बगलेंत रुमाल मारून शाळेंत लगबगीनें जात होतीं. वृक्षांवरील पक्ष्यांचा किलकिलाट कानीं पडत असून पहांट झाल्याची वर्दी कोठें कोठें कोंबड्याच्या आरडण्यानें पोंचत होती. याप्रमाणें शांततेमधील प्रभातचिन्हें सर्व पुण्यांत होत असतां कांहींएक आगापिच्छा नसूनही मोगलांची फौज शहरांत चोहींकडून शिरतांच मंडळी जागच्या जागीं थबकून राहिली! कोणास कांहींच कळेना. जो तो राजवाड्याकडे व पटवर्धनांच्या वाड्याकडे पळत सुटला. मोगलांच्या भराभर झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. 'भाऊ, भाऊ, आप्पा, आप्पा,' याशिवाय दुसरा शब्द कानीं पडेनासा झाला. तेव्हां हें चिमाजीआप्पा पेशव्याचें प्रकरण पेटलें असें सर्वांस समजलें व नारायणरावाप्रमाणेंच चिमाजी माधवाचे तुकडे होऊन राजवाड्यांत ही दुसरी ब्रह्महत्या घडते कीं काय, अशी सर्वांस दहशत पडली! शहरांत चोहोंकडे धराधर झाली. जो तो घराला कड्या लावून लपून बसूं लागला. ज्या ठिकाणीं अर्धघटकेपूर्वी पहांटची गजबज सुरू होती त्याच ठिकाणीं आतां अगदीं शुक होऊन मोगल

स्वारांशिवाय माशीही फिरकेनाशी झाली ! आप्पा-बळवंत व नारोपंत चक्रदेव हे मश्रुन्मुलुखाच्या फौजेसुद्धां भाऊंना पकडण्याकरितां दिल्लीदरवाजांतून आंत शिरतांच बाकीच्या फौजेनें पटवर्धनांकडील मंडळीच्या पायांत *बिड्या ठोकण्यास एकदम सुरुवात केली. ह्या कृत्यांतील पुढारी त्रिंबकराव परचुरे व परशुरामभाऊ वैद्य हे होते. त्यांनीं प्रथम कारागृहांत टाकलेल्या बापू लेल्याची सुटका केली. मग ह्या त्रिवर्गांनींही शहरांत मोठा अनर्थ मांडला. बहिरोपंत मेहेंदळ्याला कैद करून रायगडावर रवाना केलें ! अन्याबा मेहेंदळ्याच्या पायांत बिड्या ठोकल्या ! राघोपंत थत्त्याला चतुर्भुज केलें ! गणपतराव करमरकराच्या मुसक्या बांधल्या ! चिंतोपंत आठवल्याला प्रतापगड दाखविला ! बाळाजी विष्णु सहस्रबुद्ध्याला सिंहगड पहावा लागला ! विसाजीपंत वाडदेकराला तर चौकीपहाऱ्यांतच बसविलें ! याप्रमाणें एकाच वेळेस ४५ असाम्यांच्या हातांत कडींतोडे पडून आळीआळीं व घरोघरीं रडारड व ओरडाओरड सुरू झाली. सर्व पुण्यांत मोठाच आकांत माजला. असो. आतां ही किरकोळ मंडळी

*पटवर्धनपक्षीय मंडळीची कैद-पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान २०५-पॅरा २ रा व पान २०६ वाचा.

सोडून तिकडे शनवारवाड्यांतील दंगलींत खाशांची काय हालहवाल झाली ती ऐका.

मोगलांनीं गराडा घालून ते आपणावर वेगानें चालून येत आहेत असें पहातांच परशुरामभाऊ चिमाजी माधवराव पेशव्यासह एका खंद्या घोड्यावर स्वार झाला, श्रीमंत चिमासाहेब यांस पुढें घेऊन शेल्यानें कंबर कसली, दोन्ही हातांत चढविलेल्या पट्ट्यांची गर्र गर्र गर्र गर्र फेंक करीत ५०० लोकांसह वाड्याबाहेर एकदम उसळला, आणि शत्रूंच्या छातीवर पाय देऊन त्यांच्या देखत गर्दीतून भरधांव घोडा फेंकीत हा अजब पुरुष, राजा चिमाजीला बेधडक घेऊन चालला ! ! !

कृष्णमूर्तीला खांद्यावर घेऊन दोन्ही पंखांनीं वारा कापीत जाणारा गरुड, जसा नभोमार्गानें भराऱ्या मारीत जातो त्याप्रमाणेंच राजा चिमाजीला पुढें घेऊन दोन्ही हातांतील पट्ट्यांनीं रस्ता साफ करणारा परशुरामभाऊ वायुवेगानें राजमार्गांतून जात असतां जमलेल्या लोकांनीं तोंडांत बोटें घातलीं व तो विलक्षण देखावा पाहून ते सखेदाश्चर्य होऊन गेले!

† त्या बालराजास घेऊन भाऊ भरधांव घोडा-

---

* पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान २०५-ओळी ११-२० पहा.

† पेशव्यांची बखर-सवाईमाधवराव-पान २०५ पहा.

फेंकीत भरबुधवारांतून-शुक्रवारांतून-पंचमुखी मारुतीवरून पर्वतीकडून जात आहे, व त्याला धरण्याकरितां आप्पाबळवंत, नारोपंत चक्रदेव वगैरे मंडळी सरकारी व मोंगलांची २५००० फौज घेऊन दांतओंठ खान मागून पाठलाग करीत चालले आहेत, असा हा धांवपळीचा प्रकार सकाळपासून प्रहररात्रपर्यंत एकसारखा चालू होता. कोणाच्या तोंडांत अन्न ना पाणी. श्रीमंतांनाही त्या दिवशीं फांकाच पडला. नंतर याप्रमाणें पळापळीचा प्रकार तहत जुन्नरापर्यंत होऊन तेथून परशुरामभाऊ शिवनेरी किल्ल्याजवळ येऊन थडकले. पाठीमागून मोगलांचा प्रचंड समूह येतच होता. किल्ल्याच्या पायथ्याशीं येतांच भाऊंनीं चिमाजी आप्पाला किल्लेदाराच्या स्वाधीन केलें आणि याप्रमाणें आपल्या धन्याला सुरक्षित ठिकाणीं ठेवून हा इमानी भाऊ धन्याच्या जिवासाटीं किल्ल्याच्या पायथ्याशीं शत्रूबरोबर झगडत राहिला ! परंतु त्या विस्तृत सैन्यापुढें त्याचा नाइलाज होऊन कित्येक असामींना लोळविल्यावर हा राजनिष्ठ वीर शत्रूचे हातीं सांपडला ! मग त्याला आनंदराव रास्ते यांचे ताब्यांत देऊन चक्रदेवानें मांडवगण येथें कैदेंत ठेविलें.

अहाहा ! दैवगती कांहीं अजब आहे. जो परशुरामभाऊ कांहीं तासांपूर्वी पेशव्यांच्या दिवाणगि-

रीचें अप्रतिम वैभव भोगीत होता तोच आतां निकृष्ट दशेला पोंचून अगदीं निराळीच दशा त्याला प्राप्त झाली, व ज्या वीरश्रेष्ठाच्या समशेरीनें कांहीं तासांपूर्वी सर्व पुणें शहर हलवून दिलें होतें त्याच राजनिष्ठ पुरुषाला आतां कारागृहवासांत दास्यत्वाचे व परतंत्रतेचे दिवस कंठावे लागत आहेत ! तेव्हां दैवगती व कालगती हीं अगम्य आहेत. प्रख्यात तत्ववेत्ता सोलन एके ठिकाणीं म्हणतोः

> " No man is to be called happy before his death "

> " मनुष्याच्या सुखदुःखाची मीमांसा त्याच्या मरणोत्तरच केली पाहिजे "

नाना फडणिसांच्या संकल्पाप्रमाणें त्यांचे प्रतिपक्षी बाळोबा तात्या कुंजर व परशुरामभाऊ पटवर्धन हे कैद झाल्यानंतर बाजीराव रघुनाथ व नाना फडनवीस ही दुकल पुनः पुण्यांत आली. चिमाजी आप्पांचें दत्तविधान अशास्त्र ठरवून रायबाजींची स्थापना पेशव्यांचे गादीवर केली, व इ० स० १७९६ त डिसेंबर महिन्याच्या २७ व्या तारखेस साताऱ्याहून बाजीरावाच्या नांवचीं वस्त्रें आणवून नाना आपल्या फडणिशीच्या हुद्यावर पुनः विराजित झाले.

---

## भाग १० वा.

## छत्रपतीचा पराजय आणि पट्टणकुडी येथें राजा शिवाजीबरोबर झालेली घोर लढाई.

ज्या आमच्या लेखणीनें पेशव्यांच्या कुलदीपक पुरुषांचें येथपर्यंत वर्णन केलें त्याच लेखणीला आतां कुलांगार बाजीच्या कारकीर्दीचें वर्णन करणें भाग पडत आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. तरी दुःखांत सुख येवढेंच कीं राय बाजी हे आमच्या चरित्राचे मुख्य विषय नसून प्रौढ प्रताप पवित्र पुरुष परशुरामभाऊ हा आमचा आदिनायक होय. यामुळें भाऊंचें कथानक पुढें चालवीत असतां रायबाजींच्या कर्मकथेनें लेखणी विटाळण्याचा प्रसंग फारच थोड्या ठिकाणीं पडणार आहे. शिवाय हिंदु ह्मणविणाऱ्या प्रत्येक प्राण्याला रायबाजींची कारकीर्द आजमित्तीपर्यंत पुरतीच भोंवली असून पुढेंही ती किती दिवस भोंवणार हेंही आज समजत नाहीं; तेव्हां अशा पुरुषाविषयीं आम्ही विशेष तें काय लिहिणार ! अस्तु.

बाजीराव रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब हे गादीवर बसतांच अविचारी, नीतिभ्रष्ट, व हलक्या कानाचे, भ्याड राजे असले ह्मणजे खऱ्या शूरांची व खऱ्या कुशल पुरुषांची कशी माती होते आणि छाकटे व खुशामती पुरुष कसे पुढें सरसावतात ह्याचे मासले पुण्यांत

उडूं लागले. मागें सवाईमाधवरावांच्या वेळीं ज्या-प्रमाणें महादजी शिंदा, पेशव्यांच्या कारभारांत ढव-ळाढवळ करावयास पहात होता तोच प्रकार बाजी-रावाच्या कारकीर्दींत पुनः सुरू झाला; परंतु त्या वेळच्या स्थितीला व ह्या काळच्या स्थितीला जमीन-अस्मानचें अंतर होतें. त्या वेळीं महादजीसारख्या दीर्घ प्रयत्नी पुरुषास मूगच खात बसावें लागलें, परंतु रायबाजींच्या कारकीर्दींत सगळाच प्रकार वि-परीत असल्यामुळें दवलतराव शिंद्याचें वर्चस्व विल-क्षण वाढून पहिली गदा नाना फडणिसांवर फिरली! बाजीरावाला कोणाचाच विश्वास नसून चतुर व शूर पुरुष त्याला दृष्टिसमोर खपत नसत आणि ह्मणूनच त्या नानासारख्या वयोवृद्ध चतुर ब्राह्मणास शिंद्याकडून कैद† करवून त्याला नगरच्या किल्ल्यांत झुगारून दिलें. *तुकोजी होळकर या वेळीं पुण्यांत होता. तो अकस्मात तेथेंच मृत्यु पावल्यामुळें त्याच्या मुलांत त्याच्या जहागिरीविषयीं मोठा कलह माजला. त्या-ला एकंदर चार मुलगे होते. ते परस्परांबरोबर झगडूं लागून पर्वतीच्या मैदानांत त्यांचें भयानक संग्राम होऊं लागलें. सरशेवटीं त्यांपैकीं काशिराव नांवा-च्या मुलाचा पक्ष दौलतराव शिंद्यानें उचलून मल्हा-

---

* मराठ्यांची बखर भाग २८ कलम १४.

† मोडककृत इतिहास. पान ९२ प्यारा ३ रा पहा.

रराव होळकराला त्यानें ठार केलें व बाकीच्यांस पिटून लावून काशीराव होळकर मुख्य केला.

शिंदे व होळकर या बड्या घराण्यांपैकीं होळकराचें घराणें शिंद्याच्या ओंजळीनें पाणी प्यावयास लागल्यामुळें दौलतरावाचें मान फारच वाढलें. त्या वेळीं सरजेराव घाटगा ह्मणजे दौलतरावाचा सासरा हाच शिंद्याच्या कारभारांत मुख्य होता. बाजीराव रघुनाथ यास गादी मिळवून देण्याच्या खटपटींत सरजेराव घाडग्याचें प्रधान पात्र होतें. त्या वेळीं बाजीरावानें सरजैरावाला २ कोट रुपये गादी प्राप्त झाल्यावर देईन असें कबूल केलें होतें. त्याप्रमाणेंच दौलतराव शिंद्यालाही अशीच रक्कम देण्याविषयीं बाजीरावानें अभिवचन दिलें होतें. त्या दोन्ही रकमा देण्याविषयीं बाजीरावाला शिंद्यानें तगादा लावला; परंतु बाजीरावाजवळ पैसा नसल्या कारणानें 'पुण्यांतील श्रीमान् लोकांच्या माना मुरगाळून तुम्हीं आपल्या पैशाची भरपाई करून घ्या' अशी संमति त्या पुरुषानें शिंद्याला दिली.

* बाजीरावाची संमति मिळतांच पुण्यांतील लोकांच्या माना कापून त्यांचीं घरें लुटण्याचा झपाटा सुरू झाला. ह्या लुटीचा मक्ता सरजेराव घाटगे यानें घेतला असून त्या भयंकर पुरुषानें आपली कामगिरी

* मराठ्यांची बखर—भाग २८ कलम १७ पहा.

सोळा आणे बजाविली. घाटग्यानें पुण्यांतील लोकांचीं घरें जाळून पोळून त्यांस राखेचे तोबरे दिले, कोणाच्या आंगाचीं सालडीं काढलीं, कोणाला तापल्या तेलांत तळून काढलें, कित्येकांच्या हाता-पायांत सुया टोंचल्या, कांहींजणांस तापलेल्या तो-फांशीं गच्च आंवळून त्यांच्या आंगाची राखरांगोळी केली, कित्येकांस तोफेच्या तोंडीं दिलें, अशा रीतीनें या बहाद्दरानें जागोजाग मुडदे पाडून श्रीमान् लोकांचीं घरें धुतलीं व त्यांत नानाफडणिसांच्या पक्षाचे लोकांकडे सरजेरावानें विशेष लक्ष पुरविल्यामुळें त्यांची तर फारच दुर्दशा उडाली. बिचारा गंगाधरपंत भानु ( नानांचा भाऊबंद ) तर तापल्या तोफेवर टाकतां टाकतांच करपून मेला ! !

*या अघोर कर्माबद्दल शिद्याला व सरजेरावाला चांगलेंच प्रायश्चित्त द्यावें या इराद्यानें अमृतरावानें ( बाजिरावाचा भाऊ ) छानदार घाट घातला होता व तो त्याचा यत्न शेवटासही गेला असता, परंतु रायबाजींनीं मध्येंच अवसान सोडून अमृतरावाचा सर्व बेत फिसकिवला. इतकेंच नव्हे, तर 'माझा भाऊ तुला खड्ड्यांत आणूं पहातो तर तूं सावध ऐस ' इतकेंही या अजागळ पुरुषानें शिद्यास सांगितलें !

* मराठ्यांची बखर—भाग २८—कलम १८ पहा.

शिंद्याच्या लुटीची धामधुम अंमळ मागें पडते आहे इतक्यांत दुसरेंच एक प्रकरण उपस्थित झालें, व त्याच्या योगानें परशुरामभाऊंच्या सुटकेचा योग अनायासेंच आला. त्या प्रकरणाचा वृत्तांत असाः—

*' नानाफडणिसांचें प्राबल्य न होऊं देण्याकरितां त्यांस शिंद्याकडून कैद करण्याविषयीं ज्यावेळीं बाजीरावानें बेत केला, त्याचवेळीं बाजीरावानें सातारच्या राजाला कळविलें होतें कीं ' नानाफडणिसाचा बाबुराव कृष्ण नांवाचा जो कारभारी साताऱ्यास आहे, त्यास कैद करून सातारचा किल्ला हस्तगत करून घ्यावा, व असें कराल तर मीही सातारच्या गादीचा बंदा गुलाम असा वागून तुमच्याशीं नम्रपणानें व पूर्वापार संबंध ठेऊन वर्तन करीन. '

नानाफडणिसांला बलहीन करून स्वार्थ साधण्याकरितां बाजीरावानें जरी ही हिकमत योजली होती तथापि ती सगळीच मसलत आंगावर येऊन तो प्रकार ' गुरूची विद्या गुरूलाच भोंवली ' या म्हणीप्रमाणें झाला; कारण नानांना कैद केल्यावर किल्ला परत मागण्याकरितां बाजीरावानें जेव्हां नारायणराव थत्ते यास पाठविलें तेव्हां छत्रपतींनें एकच खर्पूस उत्तर पाठविलें कीं ' वचन दिल्याप्रमाणें

* मोडककृत कर्नाटकसंस्थानांचा इतिहास—पान९३–९४.

मी फडणिसांच्या कारभाऱ्याला कैद करून किल्ला संभाळलेला आहे, तर आतां पेशव्यानें साताऱ्च्या गादीचा अंकित असें वर्तन दाखवून वचन पुरें करावें.'

साताऱचा राजा नुस्तें उत्तर देऊनच राहिला नाहीं. पेशव्यांच्या मुलुखांत व त्यांच्या दरबारांत माजलेली अंदाधुंदी आपला फायदा करून घेण्यास ठीक आहे असा विचार करून तो अधिकाधिक फौज ठेवूं लागला व ब्राह्मणांनीं हिरावून नेलेली आपली सत्ता पुनः प्राप्त करून घेण्याचा त्यानें दीर्घ प्रयत्न चालविला !

किल्ला नाहीं तर नाहींच, परंतु सात पिढ्या संपादलेलें अफाट राज्य पुनः छत्रपतीच्या घरांत उतरतें हें पहातांच रायबाजी गडबडून गेले आणि छत्रपतीला संपुष्टांत आणण्याकरितां माधवराव रास्त्या-बरोबर सरकारी फौज देऊन त्याची रवानगी केली.

माधवराव रास्ते गेल्यावर त्यांची व साताऱ्च्या राजाची बरीच चकमक झडली, परंतु त्यांत साता-ऱ्च्या महाराजाचीच सरशी होऊन त्यानें रास्त्याला मालेगांवाकडे पिटाळून लावलें, आणि पेशव्यांचा समाचार घेण्याकरितां तिकडे मोर्चा फिरविला !

छत्रपति अनावर झालेला पाहून बाबासाहेब पेशवे कावरेबावरे झाले. ह्या अरिष्टांतून आतां कोण वां-चवील याविषयीं चिंतातूर होऊन ज्याच्या त्याच्या-

पाशीं ते मदत मागूं लागले, परंतु तुफान झालेल्या सातारकरांशीं रावबाजीची तर्फ घेऊन कोण झुंजतो? खऱ्या शूर पुरुषांची पायमल्ली व धुळदाण होऊन बिचारे अज्ञातवास, कारागृहवास भोगीत होते. श्रीमंत, खावंद, खुदावंत, हां जी असें करून थुंकी झेलणाऱ्या छाकट्या बदमाष लोकांचाच भरणा[1] पेशव्यांच्या दरबारांत विशेष झाला होता. प्रजेच्या नरडीचा घोट घेऊन स्वतःची तुंबडी भरण्याविषयीं तत्पर असेच पुरुष पुढें सरसावलेले होते. दवलतराव शिंदा साताऱ्च्या राजालाच आंतून सहाय असून ब्राह्मणांनीं घेतलेलें राज्य तूं हिसडून परत घे अशी सल्ला तो छत्रपतीला देत होता, व स्वतःचीं पलटणें भराभर तिकडे रवाना करीत होता!!

पेशव्यांकडे अशी अव्यवस्था असून कोणीच छातीचा पुरुष नसल्यामुळें जुन्या व अनुभवशीर लोकांचें ह्मणणें पडलें कीं प्रस्तुतकालच्या पेशवे-सरदार-मंडळांत प्रतिभीष्माचार्य जो परशुरामभाऊ तोच एक या आणीबाणीच्या प्रसंगाला योग्य असून त्याला खुला केलें असतां तो छत्रपतीला सहज जिंकील. शिवाय भाऊंनींही आनंदराव रास्त्याच्या

---

१ बाजीरावानें जुने प्रधान व मुत्सद्दी काढून टाकून नारोबा आवटी, बाळोबा कुंजर, माणकेश्वर इत्यादि नवीनच चांडाळचौकडी कारभारांत घातली व हीच मंडळी पुढें राज्य घालविण्यास कारण झाली असें ह्मणतात.

मार्फत बोलणें लाविलें कीं जरकरितां बाजीराव माझी सुटका करील तर मी छत्रपतीचा * पराजय करून पेशव्यांस या संकटांतून पार पाडीन.

बाजीरावाला पटवर्धनांचा अत्यंत तिटकारा होता व त्या घराण्यांतील पुरुषांचा *नयनाट करून

* ज्या पटवर्धनवीरांचा प्रतिपाल पेशव्यांनीं पोटच्या मुलाप्रमाणें करावा त्याच पटवर्धनांच्या नरडीचा घोट घेण्याविषयीं हा अधमाधमपाजी बाजीराव किती उद्युक्त असे याविषयीं पुढें दिलेल्या आख्यायिकेवरूनच वाचकांची खात्री होईल :— 'भाऊंची सुटका होऊन साताराची लढाई निकालास लागल्यावर सर्व पटवर्धनसरदार पुण्यामध्यें जमले होते. त्यावेळीं त्यांच्या जहागिरी हिसकावून घेण्याकरितां बाजीरावानें बरेच उपाय केले, परंतु पटवर्धन हे शूर लढवय्ये असल्याकारणानें त्याचा तो यत्न शेवटास जाईना. तेव्हां त्यांस मारेकऱ्यांकडून ठार मारवून जहागिरी उपटाव्या या इराद्यानें पटवर्धनांच्या घरच्या सर्व पुरुषमंडळीस वाड्यांत मेजवानीस बोलाविलें. त्यांच्याकरितां एक स्वतंत्र उत्तम जागेची योजना करून बाकी सर्व पात्रें दुसऱ्या दिवाणखान्यांत मांडिलीं.

बाजीरावाचें आचरण पटवर्धनमंडळीस सर्व माहीत होतेंच म्हणून त्यांनीं हा बेत अटकळींनेच जाणला. पण मनांत काडीइतकी कचर न आणतां खुशालपणें जेवायास गेले. पात्रें वाढून तयार झाल्याची खबर येतांच आलेली पटवर्धनमंडळी एकाचढीएक तेजःपुंज आणि सुरेख देखणे राजबिंडे पोषाख उतरून जरीकांठी पितांबर परिधान करून उत्तरीय वस्त्र म्हणून शाली आंगावर घेऊन नग्नतलवारी सोन्यारुप्याच्या कंबरपट्यांत कंमरेस लटकावून एकामागेंएक पात्रें मांडलीं होतीं तिकडे तडक चालते झाले! त्यांची हीं योजना व इभ्रत पाहून व बाजीरावाचा बेत भीतीमुळें सर्व फसला!! आणि तेव्हांपासून बाजीरावाला पटवर्धनांची दहशतच बसली!!

—बापू गोखले यांचें चरित्र-पान २२-२३ टीप—

अवांतर लोकांप्रमाणेंच त्यांच्याही जहागिरी घशांत टाकण्याचा त्याचा विचार होताच ! परंतु पूर्वी सांगितलेल्या साताऱ्याच्या धामधुमीमुळें त्याचा तो बेत तसाच राहून ह्यावेळीं अगदीं नाइलाजास्तव परशुरामभाऊंची सुटका करणें त्याला भाग पडलें.

* परशुरामभाऊंची सुटका होतांच त्यांनीं वाईजवळ मोठी फौज जमा केली. ते पाऊसकाळचे दिवस असून पावसाची मुसळधार सुरू होती. साताऱ्याच्या सभोंवार असलेल्या तिन्ही टेंकड्यांवर झिम्मड लागून राहिली होती. धुक्यानें दिशा धुंद होऊन गेल्या होत्या. वेण्या, कोयना आणि उरमोडी ह्या नद्या तुफान झाल्या होत्या. असा प्रकार असतांही दहा हजार लोकांसहित भाऊ उतार पाहून वेण्या नदीच्या पलीकडे गेले, सातारा शहराला वेढा घातला, आणि शिवछत्रपतींवर तुटून पडले.

साताऱ्याचा राजा ह्या प्रसंगीं अगदीं गैरसावध होता. रास्त्याचा पराभव केल्यामुळें व दौलतरावाची आंतून मदत असल्यामुळें पेशव्यांकडील कोणी छातीचा पुरुष आपल्यावर चालून येईल असें त्यास मुदलींच वाटलें नाहीं. शिवाय धुव्वाधार पाऊस, व नद्या तुडुंब भरलेल्या ! तेव्हां अशा समयीं

* पटवर्धनांच्या कागदपत्रांच्या आधारानें रचलेला मांडककृत कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास-पान ९४-९५ आणि मराठ्यांची बखर-भाग २८-कलम १९.

आपण निर्धास्त आहोंत असें वाटून छत्रपतींनें चांगलासा बंदोबस्त ठेविला नव्हता.

परशुरामभाऊंचा अकल्पित घाला येतांच राजाची मंडळी गडबडून गेली; परंतु राजेसाहेबांचे बंधु चतुरसिंग व त्यांचे दुसरे संबंधी जे एलाजी मोहिते, सेनाजी मोहिते, कुशाबा राजे, दुर्गाजी राजे, महाडीक, वगैरे मंडळींनीं तितक्यांत हिय्यानें फौजेची जमवाजमव केली, राजेसाहेबांस माणसांसह किल्ल्यावर पाठविलें, आणि आपण फौज घेऊन भाऊंच्या लोकांवर लगट करून एकदम कापाकाप आरंभिली !

ह्या वेळीं वयानें जरी भाऊ ६५ वर्षांवर होते तथापि त्यांच्या युद्धकौशल्यांत, त्यांच्या लढवय्येपणांत व त्यांच्या उत्साहांत काडीइतकी सुद्धां कमतरता न पडून ऐन भर ज्वानींत असलेल्या तरण्या बांडाप्रमाणें त्यांची तलवार एकसारखी चालत होती ! भाऊंप्रमाणेंच त्यांचा अवांतर बंधुवर्ग फार हिय्यानें समशेर फेंकीत होता. माधवराव रास्ते हे भाऊंबरोबर होतेच. त्यांनीं बरेंच नेटानें काम चालविलें होतें, छत्रपतीकडील लोक मर्दुमकीनें झगडत होते. परंतु भाऊंच्या पुढें त्यांचा कांहींच इलाज चालेना. एलाजी मोहिते ठार झाला. कुशाबा आणि दुर्गाजी महाडीक ह्यांना भयंकर जखमा

लागून ते रणभूमीवर विवळत पडले! तेव्हां चतुरसिंगाला सैन्य माघारें फिरविणें प्राप्त झालें. सेनाजी मोहिते मात्र शत्रूला पाठ न दाखवितां एकसारखा झुंजत होता. त्यानें माधवराव रास्त्यावर तुटून पडून त्याला ठार करण्याचा बेत आणला, परंतु भाऊंच्या तालमेंतील एकापेक्षां एक बरचढ मंडळी! रास्त्यांच्या आंगावर मोहित्याची तलवार पडते आहे तोंच त्याचा हात वरच्यावर उडवून त्यांनीं मोहित्याचे तुकडे तुकडे केले!! छत्रपतीच्या सेनानायकांची अशी दुर्दशा होतांच तें अवशिष्ट सैन्य दाही दिशा पळूं लागलें. भाऊंचे लोक सातान्यांत शिरून त्यांनीं धामधूम सुरू केली. साताऱ्च्या राजाला पूर्वीप्रमाणें किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेऊन त्याचा भाऊ चतुरसिंग* ह्याला कोल्हापुराकडे पिटाळून लाविलें, आणि पेशव्यास अनावर झालेल्या शत्रूचें अशा रीतीनें निर्दलन करून हा प्रतिभीष्म

* चतुरसिंग मोठा शूर, दीर्घद्वेषी व आवेशाचा पुरुष होता. त्यानें वाटेनें ५०० लोक जमविले व चोरवाटेनें डोंगरांतून पालीस गेला. तेथें रात्रीं देवाची पूजा करून कपाळीं भंडार लाविला. मग आवेशानें खालीं आला आणि वारणा नदीचे कांठीं रास्त्याची ५०००फौज सावध असतांही तिजवर ५००लोकांसहित अकस्मात पडून त्या सर्व लोकांना शौर्यानें लढून कापून काढलें व. तलवार पेलीत पेलीत कोल्हापुरच्या राजाला जाऊन मिळाला (मराठ्यांची बखर-भाग २९-पान २४२-कलम ११).

श्रीमंतांस सलामी ठोकण्याकरितां पुण्यांत येऊन थडकला ! ! !

एखाद्या पौरुषहीन पुरुषाच्या पदरीं सुगुणसंपन्न खपसुरत स्त्री पडली असतां तिच्या गुणांचें व लावण्याचें खरें चीज जसें होत नाहीं, त्याचप्रमाणें अविचारी राजाच्या पदरीं असलेल्या पराक्रमी पुरुषांच्या करतबगारीची चहा न होतां त्यांच्या गुणांची मातीमोल किंमत होते. ज्या वीरानें कारागृहवास भोगून पेशव्यांच्या जिवावरील संकट दूर करण्याकरितां गोत्रजांसहवर्तमान साताऱ्याकडे धांव घेतली आणि छत्रपतीची त्रेधा उडवून पेशवे व पेशवाईस जीवदान दिलें, त्या परशुरामभाऊंच्या तरवारबहादुरीबद्दल श्रीमंतांनीं बक्षीस काय दिलें ह्मणाल तर १० लक्ष रुपये (भाऊंना) *दंड ! ! ! सातारच्या राजाचा पराभव केल्यावर फौजेचा पगार तुंबला होता ह्मणून भाऊंनीं पगार पोंचेपर्यंत फौजेस फांटा दिला नाहीं, व देणें रास्तही नव्हतें. परंतु ह्याचा विचार करतो कोण? फौजेला लवकर फांटा न दिल्याचा टपका ठेऊन अविश्वासी रायबाजींनीं परशुरामभाऊंस गुन्हेगारीबद्दल १० लक्ष रुपये दंडाची शिक्षा ठोठावली ! ! ! अहाहा ! !

* मराठ्यांची बखर-भाग २८-उत्तरार्ध-पान २२७ ओळ १९ पहा व मोडककृत इतिहास-पान ९५-प्यारा २ पहा.

कालमहिमा किती चमत्कारिक आहे ! तरवार गाजविण्याबद्दल ज्या मर्दाला पालखी, जहागिरी, तैनाती, इतमाम आदिकरून वैभवाचीं बक्षिसें मिळावीं त्याच पुरुषाला उतार वयांत शूरत्वाबद्दल दंडाची बक्षिशी ! ! शाबास त्या बाजीरावाची व त्याच्या राजनीतीची !

असो. वर सांगितलेला परशुरामभाऊंस झालेला दंड बाजीरावाला माफ करणें लवकरच भाग पडलें. कारण टिपू मागल्याप्रमाणें पुनः त्रास देऊं लागला व त्यामुळें त्याचें पारिपत्य करण्यासाठीं पेशव्यांना पटवर्धनांच्या तोंडाकडे पहाणेंच पुनः प्राप्त झालें. टिपूवर जाण्याकरितां प्रथम परशुरामभाऊंचे चिरंजीव हरिपंत आप्पासाहेब यांची योजना झाली होती, परंतु कांहीं महत्वाच्या कारणानें त्यांनीं ती गोष्ट नाकारली, व "धारवाड व कर्नाटक प्रांतांत कांहीं गांवें जर जहागीर मिळतील आणि झालेला १० लक्ष रुपये दंड जर माफ होईल तर टिपूवरील मोहिमेचें काम मी जातीनेंच पतकरितों" अशाविषयीं भाऊंनीं श्रीमंताजवळ गोष्ट काढिली. तेव्हां अर्थातच नाक दाबलें म्हणजे तोंड उघडतें या म्हणीप्रमाणें दंडाची माफी करून भाऊंना टिपूवर धाडणें बाजीरावाला भाग पडलें.

याच सुमाराला दुसरी एक महत्वाची गोष्ट

घडली. ती कोणती तर नाना फडणिसांची कैदेंतून सुटका. तिचें कारण असें झालें कीः--*दौलतराव शिंद्याला तीन आया होत्या. त्या तिघींचा योग्य रीतीनें बंदोबस्त व मानमरातब न ठेविल्या कारणानें व त्या तिघींपैकीं धाकट्या आईवर दौलतरावानें वांकडी नजर ठेविल्यामुळें शिंद्याच्या घराण्यांत कलहाग्नि पेटला. बाजीरावाचा भाऊ अमृतराव यानें त्या तिघींचा पक्ष उचलिला, तेव्हां शिंदे आणि पेशवे यांचा अगदींच बेबनाव होऊन उभयतांत लढाई सुरू झाली. काशीराव होळकर अमृतरावास मिळाला, पेशव्यांनीं निझामाशींही आंतून संधान बांधलें, टिपूचें साहाय्य मिळावें म्हणून त्याचे दरबारीं दोघांकडूनही वकील येऊन थडकले. अशी घालमेल होत आहे इतक्यांत बाजीरावाला धास्ती पडावी म्हणून नानाफडणिसाला कैदेंतून सोडिलें आणि आपला पक्ष विशेष मजबूत केला.

'दोघांचें भांडण, तिसऱ्याला लाभ' या म्हणीप्रमाणें फडणीस बंदमुक्त होत आहेत इतक्यांत बाजीरावाला नानांची दहशत पडून त्यानें शिंद्याबरोबर मांडलेलें वैर सोडून दिलें. तेव्हां सर्वांची एकवाक्यता होऊन दौलतरावानें तिघी आयांची योग्य व्यवस्था ठेवण्याविषयीं वचन दिलें, आणि

* मराठ्यांची बखर-उत्तरार्ध-भाग २९-कलम १-४.

बाजीराव व नानाफडणीस यांची मैत्री पुनः जमली.

भाऊंचा दंड माफ होऊन ते टिपूवर स्वारी करणार तों मध्यंतरीं कोल्हापूरकरांनीं धामधूम सुरू केली व त्यामुळें भाऊंचें जाणें सुलतानावर न होतां करवीरकरांचा समाचार घेण्याविषयीं त्यांस पेशव्यांचा हुकूम झाला.

हें करवीरकथानक पुढें चालविण्यापूर्वी त्याच्या आदिवृत्ताचें थोडेंसें दिग्दर्शन करणें जरूर आहे. कोल्हापुरकर हे शिवछत्रपतीचे वंशज असून पेशव्यांचे ते जुनाट शत्रु. शिवाय पटवर्धनांच्या जहागिरी तिकडल्याच प्रांतांत असल्यामुळें त्यांना कोल्हापूरकरांनीं जहागिरींचा निर्वेध उपभोग कधींच घेऊं दिला नाहीं. पटवर्धन व कोल्हापूरकर ह्यांच्या हरहमेष झटापटी होत असून ते परस्परांचे निरंतरचे शत्रु बनून राहिले होते. पटवर्धनांप्रमाणेंच धोंडोपंत गोखले यांचाही मुलुख तिकडेच असून त्यांनीं वारंवार कोल्हापूरकरांवर स्वाऱ्या कराव्या. सवाईमाधवरावांच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या दरबारांत जीं कारस्थानें सुरू झालीं त्यांत सरदार—परशुरामभाऊंचें प्रधानपात्र असल्यामुळें तो पुण्यांतील राजकारणांत अगदीं गर्क होऊन गेला होता, व त्यामुळें करवीरकरांच्या छातीवरील दडपण कमी

होऊन त्यांनीं त्या संधीला बराच हात मारून घेत-ला. पटवर्धनांच्या दहा वर्षे ताब्यांत असलेला भुदरगड किल्ला त्यांनीं प्रथम काबीज केला. नंतर चिकोडी व मनोळी हे दोन तालुके भास्करराव निपाणकर याजपासून हिरावून घेतले. तेथून कर्नाटकांतील हुबळी आणि नलमधी शहरें लुटून फस्त केलीं व संकेश्वराजवळचा वल्लभगड घेतला! निपाणीच्या उत्तर दिशेस असलेल्या संवदलग्याच्या किल्ल्यावर हल्ला करून तो काबीज केला. इ० स० १७९७ सालीं गोकाकेवर स्वारी करून त्या प्रांतांतील १२,००० रुपये खंडणी घेतली. तेथून कितुराकडे मोहोरा फिरवून त्या ठिकाणाहूनही बरीच खंडणी गोळा केली. कोण्णूर लुटून फस्त केलें, तेथील देसायाला ठार केलें, आणि तहत पाच्छापुरापर्यंत खंडण्या घेण्याचा तडाका चालविला.

कोल्हापूरकरांची पुंडाई इतक्यानेंच संपली नाहीं. नानांचें व परशरामभाऊंचें वैमनस्य पडलें होतें त्या संधीला त्यांनीं तासगांव लुटून भाऊंच्या चंदनी वाड्याची राखरांगोळी केली! पुढें साताऱ्याच्या बंडांत छत्रपतीचा भाऊ जो चतुरशिंग याला पाठीशीं घालून रास्ते व प्रतिनिधि यांच्या लोकांवर छापा घालून वारणा नदीच्या कांठीं त्यांस कापून काढलें, आणि अशा रीतीनें हें करवीरकरांचें प्रस्थ वाढत

वाढत तें इतकें अनावर झालें कीं साताऱ्च्या बंडा-प्रमाणेंच कोल्हापूर्प्रकरणाचा बाऊ होऊन तो घालविण्याकरितां इ० स० १७९९ मध्यें भाऊसाहेबांची रवानगी झाली.

परशुरामभाऊंना ह्या वेळीं तेंच पाहिजे होतें. कोल्हापूरकरांनीं केलेली आवाडाव आणि पटवर्धनांचा वाडा जाळून तासगांवकरांचा केलेला छळ त्याबद्दल भाऊंना अत्यंत क्रोध येऊन करवीरकरांचीं हाडें पिचविण्याचा त्यांचा दृढनिश्चय झालेला होताच. ती संधी अनायासें आल्यामुळें भाऊंनीं कोल्हापुराकडे एकदम चाल केली.

टिपूवर जाण्याकरितां जी फौज तयार झाली होती ती भाऊंचे स्वाधीन करून त्यांची कोल्हापुराकडे रवानगी केल्यावर पाठीमागून पेशवे, शिंदे, व दुसरे कित्येक सरदार यांनीं ३०००० स्वार व ६००० पायदळ इतकें घेऊन भाऊंच्या मदतीस जावें असा बेत ठरला, परंतु त्या संधीला पर्जन्यकाळ असल्यामुळें दसऱ्यापर्यंत दम धरून नंतर लढाई सुरू करावी असा सर्वांचा विचार झाला.

एखादा चवताळलेला बुभुक्षित वाघ मेंढ्याच्या कळपाजवळ आला असतां धीर न धरतां कळपांतील मेंढ्यांचा जसा फन्ना उडवितो, त्याप्रमाणेंच कोल्हापूरकरांच्या मुलुखाजवळ येऊन ठेपतांच क्रो-

धानलानें व्याप्त झालेला परशुरामभाऊ करवीर-करांचे मुलुख उध्वस्त करून सोडूं लागला. ज्याला लहानपणापासून घे, मार, ठोक, धर, हाण, पकड, ह्याच गोष्टींची उत्कंठा, ज्याचीं ६५ वर्षें घनघोर युद्धसंग्रामांत आणि दंगलीच्या धामधुमींत गेलेलीं व करवीरकरांच्या पुंडाईनें ज्याचा क्रोधाग्नि अनिवार भडकलेला त्या शूर शिपायाला अपमान सहन करून शत्रूच्या दाराजवळ दसऱ्यापर्यंत माशा मारीत कोठचें बसवतें? त्या बहाद्दरानें मागेंपुढें न पहातां भरपावसाळ्यांतच दंड थोपटून करवीरकरांला भयंकर आरोळी ठोकली आणि घटप्रभेपासून मलप्रभेपर्यंत असा हाःहाःकार व हलकल्होळ उसळून दिला कीं भीष्माचार्यप्रमाणेंच हा जरठ भाऊसाहेब सर्व दक्षिण देशालाच दग्ध करून सोडतो कीं काय अशी सर्वांस दहशत पडली!!

हा वयोवृद्ध पटवर्धन घटप्रभेपासून मलप्रभेपर्यंत सर्व प्रांत हस्तगत करीत गेला हें पाहून कोल्हापूरकरांला अत्यंत शरम वाटली. त्यांचें धाबें दणाणून जाऊन पटवर्धनसरदार आज कोल्हापूरकरांचा पूर्ण उच्छेद करतो असें त्यांस वाटलें. कोल्हापूरकरांनीं घेतलेलीं सर्व ठाणीं भाऊ परत घेऊं लागला. सर्व किल्ले पटवर्धनांनीं पुनः हिसडले. जागोजाग करवीरकरांचा पराभव करून त्यांच्या पुंडाईचें पूर्ण

प्रायःश्चित्त मिळूं लागलें; आणि अशा रीतीनें भाऊसाहेबांचीच फत्ते चोहोंकडे होऊन त्यांच्या विमल किर्तीचा दुंदुभी मागल्याप्रमाणेंच पुनः दणदण वाजूं लागला !

आपल्या दुस्मानाचीच जागोजाग फत्ते होत असून आपण दुष्कीर्तीचे मात्र धनी होत आहोंत असें पाहून कोल्हापूरच्या राजाला बराच आवेश चढला. तो स्वतः महान शूर होताच, तशांत साताऱ्च्या राजाचा भाऊ जो चतुरसिंग तोही पटवर्धनांनीं तिकडून पिटाळून लावल्यावर कोल्हापूरच्या राजाचा आश्रय धरून राहिला होता. त्याला भाऊंची चांदी उडवावयाची होतीच. तो प्रसंग ह्यावेळीं आपोआप आल्यामुळें त्यानें राजाची (कोल्हापूर) एकदम उठावणी केली, व हे दोघे अहिरावण महिरावण फौजफांट्यासुद्धां सज्ज होऊन 'आज मारूं किंवा मरूं' अशा प्रतिज्ञेवर ते निघाले !

इतका वेळपर्यंत राजाच्या लोकांची व परशुरामभाऊंचीच झटापट होत होती; परंतु निपाणीहून पट्टणकुडी गांवाजवळ भाऊंचें सैन्य येतांच महाराज व चतुरसिंग हे दोघेही जातीनें पवित्रा ठोकण्याकरितां १६००० सैन्यानिशीं येऊन थडकले !

ज्या आह्माला प्रस्तुत काळीं बंदुकीचा बार एक-

ला तर पोटांत धडकी भरते व समशेर पाहूनच भोंवंड येते त्याच आमच्या पूर्वजांना लढाई ह्मणजे हातचा मळ किंवा परसांतली भाजी वाटे ! ज्या वेळीं महाराज आणि चतुरसिंग ह्यांनीं पट्टणकुडी येथें भाऊंवर चाल केली, त्या वेळीं आमचा धीरोदात्त वीरमणी काय करीत होता ह्मणाल तर तंबूमध्यें दाजीबा* लिमयाबरोबर निर्धास्तपणें बुदबळाचे डाव मारीत असून शहनाशहाची झोड उडवीत होता, व अंबराईंत खेळत बसलेल्या राबर्ट क्लाईव्हप्रमाणेंच खेळांतून न हालतां हुचमल्ली—घोडमल्ली करीत करीतच फौजेला हुकूम फर्मावीत होता ! ! !

कोल्हापूरचे महाराज व चतुरसिंग हे चालून आल्याची खबर समजल्यावर भाऊंनीं ती लटकी लढाई टाकून दिली आणि घोड्यावर स्वार होऊन खऱ्या लढाईंत खऱ्या राजाला खरा शह देण्याकरितां ते तंबूबाहेर पडले.

परशुरामभाऊ बाहेर पडतांच त्यांस कांहीं अपशकुन होऊं लागले, परंतु तिकडे लक्ष न देतां आपल्या पथकासह चालून जाऊन रत्नाकरअप्पा दिवाण ह्याच्या फळीवर त्यांनीं अकस्मात हल्ला केला

* हा भाऊंचा विश्वासु कारकून होता. तो नेहमीं भाऊंबरोबर असे. ह्यानें ह्या सर्व लढाईचें साद्यंत वर्णन दिलेली अशी एक बखर रचलेली आहे. ती इतिहासकारांस फार उपयोगी पडेल.

व एकदम कत्तल सुरू केली. भाऊंची व त्यांच्या निवडक स्वारांची तलवार चालू होतांच रत्नाकर अप्पाच्या लोकांची दाणादाण होऊन गेली. मोठमोठे योद्धे रणांगणीं पडले आणि कैक हत्ती व निशाणें पटवर्धनांनीं हिसकावून घेतलीं!

*रत्नाकर अप्पाच्या लोकांचा सप्पा उडतांच खुद्द शिवाजी महाराजांची स्वारी पुढें होऊन भाऊंच्या व त्यांच्या टकरा झडूं लागल्या. ज्यांचें हाडवैर कित्येक वर्षें हाडाला भिनून जाऊन परस्परांच्या नरडीचा घोट घेण्याविषयीं जे निरंतर उद्यक्त अशा शूर महाशूरांचा सामना झाल्यावर मग त्या दारुण संग्रामास काय पारावार! वाटरलूच्या लढाईंत जो बहार उडाला व केनी आणि झामा येथील दारुण संग्रामांत कार्थेजच्या पऱ्याचानें आणि रोमच्या वस्तादानें जें थैमान करून सोडलें तसाच प्रकार पट्टणकुडी येथील आखाड्यांत घडला. उभयसैन्यांत गंभीर सिंहनाद होऊं लागून ते मोठ्या वेगानें एकमेकांवर घसरले! कोल्हापूरकर आणि तासगांवकर ह्यांनीं त्यावेळपर्यंत एकमेकांची जी नासधूस केली होती ती मूर्तिमंत त्यांच्या डोळ्यापुढें उभी राहून घे घे करीत दोघेही

* कर्नाटकांतील राज्यांचा इतिहास-पटवर्धन सरदार-पट्टणकुडी येथील लढाई.-पान ९८-९९-१०० पहा.

मल्ल एकमेकावर चवताळून गेले! तरवार पेलण्यांत दोघांचाही हात खंडा असून झुंजण्याच्या कामांत दोघेही मुरलेले! शिवछत्रपति आणि परशुराम-भाऊ ह्यांचा भीष्मार्जुनांप्रमाणें भयानक घनघोर सं-ग्राम होत आहे इतक्यांत आपआपल्या स्वामिरा-जाचें रक्षण करून शत्रूचे तुकडे करण्याकरितां उ-भयतांकडील सरदार—सेनापती हरहर महादेव असा गंभीर शब्द करीत एकदम उसळले! एकच गर्दी होऊन जिकडे तिकडे धूळच धूळ माजली! सर्व वीर हातघाईवर आले! तोड, मार, काप ह्याशि-वाय गोष्ट नाहीं! सगळ्यांच्या समशेरी बिजली-सारख्या चमकूं लागून खण्-खण्-खण् असे शब्द होऊं लागले! हजारों सैनिकांचे तुकडे होऊन र-क्ताचे पाट व मासाचा चिखल होऊन गेला. पर-शुरामभाऊ तुफान होऊन दोन्ही हातांतील पट्ट्यां-च्या चौफेर फेंकीनें अनेक वीर ठार करूं लागला! इतक्यांत राजा शिवाजी, सेनापति, चतुरसिंग, ना-रायणराव गाइकवाड आणि विश्वासराव गाइकवाड ह्या पांचांजणांनीं परशुरामभाऊला घेरून त्यांच्यावर भयंकर शस्त्रप्रहार केले तेणेंकरून मूर्च्छित होत्सात। दिनदुनयेला ५० वर्षं एकसारखा हालवून सोड-

णारा हा प्रचंड वीर रणांगणीं ठार* झाला ! ! 'पडला ! पडला !' असा चोहोंकडे शब्द होऊन करवीर पक्षांत जयजयकार व तासगांव पक्षांत हाहाःकार झाला ! टिपूहैदरासारख्यांस कृतांतासारखा व पेशवाईच्या तक्तावर विराजित होणाऱ्यांस मित्रासारखा असा हा वीरश्रेष्ठ समरभूमीवर पडतांच पटवर्धनांकडील लोकांची वाताहत झाली. ज्याला जिकडे वाट फुटली तिकडे तो निघून गेला. भाऊंचे चिरंजीव रामचंद्रपंत आप्पा हेही ह्या लढाईत घायाळ होऊन मोठ्या मिनतवारीनें वांचले. करवीरकरांनीं एका ब्राह्मण सरदाराकडून भाऊंच्या प्रेताचें दहन करविलें, व त्यांची क्रिया करविली. पट्टणकुडीच्या रणभूमीवर ज्या स्थलीं ह्या प्रतापी पुरुषाचा देह

---

* परशुरामभाऊ पडल्यानंतर त्यांच्या प्रेतासंबंधाची हकीकत मोठी हृदयद्रावक आहे. गायकवाड यानें तें प्रेत उचलून एका बारगिराजवळ दिलें ! परंतु वाटेंत घाटग्यांनीं तें प्रेत घेऊन 'आपण एकट्यानेंच भाऊंचा प्राण घेतला' अशी फुशारकी मिरवीत तो महाराजाजवळ गेला. महाराज त्यांवेळीं हर्षानें वेडावून त्यांनीं तें प्रेत घोड्यावरून खालीं ढकलून दिलें ! व घाटग्यांकडून त्याचे तुकडे तुकडे करविले !!

या वरील गोष्टीच्या संबंधानें कित्येकांचें व वा. प्र. मोडक यांचें मत निराळें आहे. पण तें निराधार आहे असें निगुडकर यांनीं आपल्या इतिहासांत चांगल्या आधारानें सिद्ध केलें आहे.

भाऊंच्या प्रेताचे तुकडे नारो हरी करंदीकर यांनीं महाराजांच्या परवानगीनें गोळा करून त्यांचें विधिपूर्वक दहन केलें! याबद्दल त्यांस कांहीं उत्पन्नही मिळालेलें आहे.

पडला, त्या ठिकाणीं एक छत्री बांधिलेली असून एकेकाळीं हा अजब तारा महाराष्ट्र प्रदेशांत किती विलक्षण रीतीनें चमकला ह्याविषयीं हें छत्रीरूप जिवंत स्मारक अजून साक्ष देत आहे.

भाऊंच्या मृत्यूची दुःखकारक वार्ता एकून तासगांव, पुणें इत्यादि ठिकाणचे लोक फारच हळहळले. जन्मकाळापासून समरभूमीवर प्राण जाईपर्यंत ह्या पुरुषानें एकनिष्ठेनें व विश्वासूकपणानें स्वामिसेवा करण्यांतच आपला देह झिजविला. कोणाचाही घातपात न करितां *नीतीनें व सदाचरणानें वागून खऱ्या रणशूराचें वर्तन कसें असतें आणि तलवार पेलणारे एकेक ब्राह्मण सरदार पेशवाईत कसे होऊन गेले ह्याविषयींचें एक उत्कृष्ट उदाहरण ह्या पटवर्धनानें सर्व जगास दाखविलें. ब्राह्मण ह्मणजे मूळचेच नेभळे, भित्रे, कमजोर, कमकुवत, कुचकाम, इत्यादि नामुष्कीचीं विशेषणें जे कोणी लावीत असतील, व इतिहासाच्या अज्ञानामुळें आपली खरी स्थिति एकेकाळीं काय होती ती न ओळखून स्वदेशाविषयीं व आपल्या लोकांविषयीं जे हिंदु नेहमीं उदास असतील अशा पुरुषांनीं परशुरामभाऊ, हरिपंत फडके,

* पेशवाईत पटवर्धनांचें व गोखल्यांचें घराणें नीतीविषयीं व चालचलणुकीविषयीं प्रख्यात होतें. 'खरीं बालबोध घराणीं अशीं हींच दोन' अशी म्हण पडून गेली होती.—इति० गोष्टी०.

बापू गोखले इत्यादि वीरवरांचीं चरित्रें अवलोकन केलीं असतां त्यांस तेव्हांच कळून येईल कीं हें ब्रह्मबीज मूळचें तेजहीन व पौरुषहीन नसून एका शतकापूर्वीं तें अत्यंत पराक्रमी, तेजःपुंज, बलवान, कीर्तिवान्, व नीतिमान् होतें. ह्याकारितां प्रत्येक हिंदूनें, प्रत्येक महाराष्ट्रीयानें व प्रत्येक ब्रह्मवृंदानें ही विसरभोळेपणाची स्थिति टाकून देऊन आपण होतों कोण व आहोंत कोण हें जाणण्याविषयीं नेहमीं प्रयत्न करावा व गतवैभव प्राप्त करण्याविषयीं झटावें हें योग्य.

असो, ज्या परमेश्वरी सत्तेच्या योगानेंच तिन्ही अवस्थांतील पिंड-ब्रह्मांडरूप आकारांचा व ध्वनींचा एवढा मोठा हलकल्होळ देहबुद्धीकाळीं खरा खरा भासतो, त्या सत्तेलाच हीं लिहिलेलीं वेडीं वांकडीं अक्षरें अर्पण करून ग्रंथ संपवितों.

समाप्त.

पडला, त्या ठिकाणीं एक छत्री बांधिलेली असून एकेकाळीं हा अजब तारा महाराष्ट्र प्रदेशांत किती विलक्षण रीतीनें चमकला ह्याविषयीं हें छत्रीरूप जिवंत स्मारक अजून साक्ष देत आहे.

भाऊंच्या मृत्यूची दुःखकारक वार्ता ऐकून तासगांव, पुणें इत्यादि ठिकाणचे लोक फारच हळहळले. जन्मकाळापासून समरभूमीवर प्राण जाईपर्यंत ह्या पुरुषानें एकनिष्ठेनें व विश्वासूकपणानें स्वामिसेवा करण्यांतच आपला देह झिजविला. कोणाचाही घातपात न करितां *नीतीनें व सदाचरणानें वागून खऱ्या रणशूराचें वर्तन कसें असतें आणि तलवार पेलणारे एकेक ब्राह्मण सरदार पेशवाईंत कसे होऊन गेले ह्याविषयींचें एक उत्कृष्ट उदाहरण ह्या पटवर्धनानें सर्व जगास दाखविलें. ब्राह्मण ह्मणजे मूळचेच नेभळे, भित्रे, कमजोर, कमकुवत, कुचकाम, इत्यादि नामुष्कीचीं विशेषणें जे कोणी लावीत असतील, व इतिहासाच्या अज्ञानामुळें आपली खरी स्थिति एकेकाळीं काय होती ती न ओळखून स्वदेशाविषयीं व आपल्या लोकांविषयीं जे हिंदु नेहमीं उदास असतील अशा पुरुषांनीं परशुरामभाऊ, हरिपंत फडके,

* पेशवाईंत पटवर्धनांचें व गोखल्यांचें घराणें नीतीविषयीं व चालचलणुकीविषयीं प्रख्यात होतें. 'खरीं बालबोध घराणीं अशीं हींच दोन' अशी म्हण पडून गेली होती.—इति० गोष्टी०.

बापू गोखले इत्यादि वीरवरांचीं चरित्रें अवलोकन केलीं असतां त्यांस तेव्हांच कळून येईल कीं हें ब्रह्मबीज मूळचें तेजहीन व पौरुषहीन नसून एका शतकापूर्वीं तें अत्यंत पराक्रमी, तेजःपुंज, बलवान, कीर्तिवान्, व नीतिमान् होतें. ह्याकरितां प्रत्येक हिंदूनें, प्रत्येक महाराष्ट्रीयानें व प्रत्येक ब्रह्मवृंदानें ही विसरभोळेपणाची स्थिति टाकून देऊन आपण होतों कोण व आहोंत कोण हें जाणण्याविषयीं नेहमीं प्रयत्न करावा व गतवैभव प्राप्त करण्याविषयीं झटावें हें योग्य.

असो, ज्या परमेश्वरी सत्तेच्या योगानेंच तिन्ही अवस्थांतील पिंड-ब्रह्मांडरूप आकारांचा व ध्वनींचा एवढा मोठा हलकल्होळ देहबुद्धीकाळीं खरा खरा भासतो, त्या सत्तेलाच हीं लिहिलेलीं वेडीं वांकडीं अक्षरें अर्पण करून ग्रंथ संपवितों.

समाप्त.

# विक्रीस तयार.

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत विकत मिळतील.

**केसरींतील निवडक निबंध**—भाग १ व २. केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आह्मांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळगंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र ( ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत ) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यास चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

**डिमास्थेनीस याचें चरित्र**—हें लहानसें चरित्र प्रो० चिंतामण गंगाधर भानू बी. ए. "रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र" व "नीतिमीमांसा" या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें आहे. डिमास्थेनीस हा अथेन्स शहरच्या आणि ग्रीस देशाच्या इतिहासांत वर्णनीय पुरुष होऊन गेला. याच्या अंगीं मुख्य गुण वक्तृत्व. मुत्सद्दीपणांतही तो कमी होता असें नाहीं. यानें आपल्या हातून आपल्या देशाचें वैभव वाढविण्याविषयीं निदान राखण्याविषयीं काय काय केलें, देशाभिमान त्याच्या अंगीं कसा जाज्वल रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य राखण्याविषयीं त्याचें मन कसें स्फुरत होतें इत्यादि गोष्टी आमच्या महाराष्ट्रवाचकांनीं या चरित्रापासून घेण्यासारख्या आहेत. पुस्तक बारीक पण रुंद व जाड्या अक्षरांनीं छापलें आहे. किंमत ४॥ आणे. ट० हं० ॥.

**रिचर्ड कॉब्डेन यांचें चरित्र** —चिंतामण गंगाधर भानू बी. ए. प्रोफेसर, फर्ग्यूसन कॉलेज पुणें. यांनीं लिहिलें.

— रिचर्ड कॉब्डेन, ब्राइट साहेबांचा सार्थीदार. यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुंटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राजकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीय हिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अश्रांत देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल. किंमत १० आणे. ट० हं० एक आणा.

**सद्गुणमंजरी** —( एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र ). बांधणी कापडी पुठ्ठयाची, सुरेख, मजबूत, वर नांव सोनेरी अक्षरांचें. गणेश जनार्दन आगाशे बी. ए. कृत रा० ब० विष्णु मोरेश्वर भिडे यांची मृतभर्तृका कन्या आवडाबाई इचें हें चरित्र अनेक कारणांनीं वाचण्यासारखें झालें आहे. लहानपणींच वैधव्यरूपी दारुण प्रसंग आल्यामुळें तिचें मन गंभीर झालें होतें. त्रिविध जनांच्या नानाप्रकारच्या अनुकूळ प्रतिकुळ टीकेला पात्र झाली असतांही जिनें आपल्या मनाची समता व शांतता बाह्यत तरी कायम राखून उलटें आपल्या आप्तस्वकीयांचें सांतवन करावें, शिक्षणाच्या योगें जिच्या मनावर कोणत्याही प्रकारचा विपरीत परिणाम न होतां उलट जिनें आपल्या प्रगल्भ व शान्त विचारांनीं पोक्त लोकांसही थक्क करून सोडावें—अशा केवळ दुःखाचा भार वाहण्याकरितांच या जगांत जन्मलेल्या तथापि आपला दुःखभार निमुटपणें वाहून दुसऱ्याची सुटका करणाऱ्या अल्पकाल या जगांत राहूनही पुष्कळांस चटका लावून टाकणाऱ्या एका स्त्रीचा जीवनवृत्तांत सुहृदय वाचकांनीं अवश्य वाचण्यासारखा आहे.

यांत चरित्रनायिकेनें लिहिलेल्या रोजनिशींतील व तिनें प्रिय मैत्रिणींस धाडलेल्या पत्रांतील उतारे दिले आहेत. यायोगें तिचें अंतःकरण किती कोमल, किती पापभीरु, किती विवेकी, किती शांत व किती न्यायी होतें हें स्पष्ट दिसेल. किंमत ८ आणे, ट० हं० १ आणा.

| पुस्तकाचें नांव | किंमत रु० | आ. | ट० ख० आ, | पै. |
|---|---|---|---|---|
| अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी ( चिपळूणकर व वामनकृत ) ... | ४ | ० | १२ | ० |
| दुर्गानाटक ( गो. ब. देवलकृत ) .... ... | ० | ५ | ० | ६ |
| संगीत सौभद्र ( किर्लोसकरकृत ); ... | ० | १२ | ० | ६ |
| संगीत शाकुंतल ( किर्लोसकरकृत ). ... | ० | १२ | ० | ६ |
| धर्म आणि शास्त्र यांचा समेट ( स्पेन्सर ग्रंथावरून ) एन्. एल्. फडके बी. ए. यांचें व्य. विगन. ... ... ... ... | ० | १। | ० | ६ |
| तंट्या भिल्ल याचें चरित्र ( केसरी-धनुर्धारीरचित ) ... ... ... ... ... | ० | २॥ | ० | ६ |
| दौलतराव नाटक रा० रा० शंकर मोरो रानडे बी. ए. कृतः- .. ... ... | ० | १० | १ | ० |
| अधिकारदानविवेचना नाटक. स्थानिक स्वराज्याबद्दल यांत फार मजेदार विवेचन आहे. ... ... ... .. | ० | ५ | | |
| पतिशिक्षाप्रहसन . ... . . | ० | ४ | | |
| अनुतापशमन नाटक .. ... .. | ० | १२ | १ | |
| अतिपीडचरित नाटक शेक्सपिअरकृत किंगलियर नाटकाचें भाषांतर .. | १ | ४ | २ | ० |
| रतिमन्मथ नाटक ... .. ... ... | १ | ० | १ | ० |
| डाक्टर व वैद्यप्रहसन ... ... ... | ० | २ | ० | ६ |
| प्रेमगुटिका नाटक हास्यकारक ... ... | ० | ४ | ० | ६ |
| वीरोत्तंस नाटक ... ... ... .. | ० | १२ | १ | ० |
| चंडकौशिक नाटक ... ... .. .. | ० | ६ | १ | ० |
| लटपटाध्यायप्रहसन .. ... .. | ० | २ | ० | ६ |
| मोहविलसित नाटक ( Shakspear's Winter's tale ) रा. सा. वि. मो. महाजनी एम्. ए. कृत. ... ... ... | ० | १० | २ | ० |
| बहुमानानुनय ( All's well that ends well ) रा. सा. वि. मो. महाजनी एम्. ए. कृत . ... .. .. | ० | १२ | २ | ० |

# विक्रीस तयार.

## आर्यभूषण छापखान्यांतील पुस्तकें.

| | कि. रु. | [illegible] |
|---|---|---|
| केसरींतील निवडक निबंध भाग १ ... | ...१ | [illegible] |
| केसरींतील निवडक निबंध भाग २ ... | ...[illegible] | [illegible] |
| निबंधमाला—( कै० वि० कृ० चिपळूणकरकृत ) | ३ | [illegible] |
| रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र—( प्रो० वि० गं० भानू बी. ए. कृत ) ... | ...१० | [illegible] |
| सद्गुणमंजरी—( एका [illegible] सार्वे [illegible] [illegible] आगाशे बी. ए. कृत ) ... | [illegible] | [illegible] |
| [illegible] यांचें चरित्र—( प्रो० वि० गं० भानू बी. ए. कृत ) ... | ...[illegible] | [illegible] |
| सरदार परशुराम [illegible] यांचें चरित्र.— (दक्षिणा प्राइझ [illegible] मिळालेलें) | १२ | [illegible] |
| दुर्गा नाटक—( गो. ब. देवलकृत ) | [illegible] | [illegible] |
| [illegible] यांचें चरित्र ... | [illegible] | [illegible] |
| विलायतचा प्रवास.—भाग [illegible] ... | १२ | [illegible] |
| संगीत सौभद्र.—( किर्लोस्करकृत. ) ... | १२ | [illegible] |
| संगीत शाकुंतल.—( किर्लोस्करकृत. ) ... | [illegible] | [illegible] |
| धर्म आणि शास्त्र यांचा संबंध.—( [illegible] ग्रंथावरून ) ... | [illegible] | [illegible] |
| ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म.—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान ) ... | [illegible] | [illegible] |
| मोगल व मोगली धर्म.—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान ) ... | [illegible] | [illegible] |
| [illegible] व पारसी धर्म.—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान ) ... | [illegible] | [illegible] |
| षड्दर्शनसारनिष्कर्ष.—( महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर यांनीं दिलेलें व्याख्यान ) ... | [illegible] | [illegible] |